
# आशियांतील दीपस्तंभ



RFFBK-0008568

सं. क.

अनुक्रम
दिनांक
क्र.कि
नं. दि.

# आशियांतील दीपस्तंभ

लेखक :

## भालचंद्र गोपाळ बापट

बी एस्सी., [illegible] एड्., [illegible] एम. ई. डी.

टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे २.

'धडाड् धुम्!', 'मध्यपूर्वेतील टाइम बॉम्ब इराण',
'पश्चिम पॅसिफिकमधील स्फोट-बिंदु फोर्मोसा,'
'दुसरें जागतिक युद्ध', 'डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी' यांचे पुस्तकाचे लेखक.

९०००३
अनुक्रमांक
विभाग ६८०
२१।१०।५४
८५६८
REI BK-0008568

ज्योति प्रकाशन, पुणे २.

मुद्रक
श्री. ग. म. गुप्ते,
बी. ए., एल्.एल्. बी.
स्वाधीन मुद्रणालय,
१०१७ सदाशिव पेठ, पुणें २.

प्रकाशक
सौ. उषा जयराम नागपूरकर
ज्योति प्रकाशन
३४१ सदाशिव पेठ, पुणें २.

आवृत्ति पहिली
१५ ऑगस्ट १९५५

पहिली आवृत्ति सोडून
पुढील आवृत्तींचे आणि
इतर सर्व हक्क लेखक
श्री. भा. गो. बापट
यांचे स्वाधीन
( १९६।२६ सदाशिव, पुणें २. )

# लेखकाची भूमिका

स्वतंत्र भारताचा आठवा स्वातंत्र्यदिन आज आम्ही साजरा करीत असतांना गेल्या आठ वर्षांतील घडामोडींचें सिंहावलोकन भावी काळांतील मार्गदर्शनासाठीं आवश्यक आहे. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या आमच्या शेजारी राष्ट्रांत काय घडलें व तें कोणी घडविलें याची दखल आम्ही या प्रसंगीं घेणें इष्ट आहे. उपदेशापेक्षां आदर्शच अधिक महत्त्वाचे या भूमिकेंतून या पुस्तकांत सहा नेत्यांचें जीवन मांडलें आहे. त्यांच्याशिवाय इतर अनेक कार्यकर्ते त्या सर्व देशांत आहेत. स्वदेश व परदेश यांतील जनतेला मार्गदर्शक होणाऱ्या या सहा जागतिक नेत्यांचें दीपस्तंभासारखें असणारें कर्तृत्व तरुण भारतीयांनीं काळजीपूर्वक तपासून घ्यावें अशी लेखकाची इच्छा आहे.

भारताचे पं. जवाहरलाल नेहरू, इंडोनेशियाचे डॉ. सोकार्नो, इंडो-चायनांतील डॉ. हो चि मिन्ह, थायलंडचे फील्ड मार्शल सग्राम, चायनचे माओ त्से-तुंग व ब्रम्हदेशचे नू यांनीं आपल्या मायभूचें स्वातंत्र्य मिळवितांना व तें टिकवितांना किती असीम कष्ट सोसले याची काहीशी कल्पना वाचकांना या पुस्तकानें येऊं शकेल.

हें पुस्तक लिहितांना लेखकाची भूमिका उपदेशकाची नाहीं. त्याच-प्रमाणें कोणत्याहि विशिष्ट मतप्रणालीचा अट्टाहासाने प्रचार करण्याचीहि लेखकाची इच्छा नाहीं.

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामांत आजपर्यंत हजारों देशभक्तांनीं कर्तव्य-तळमळीनें देशासाठीं सर्वस्वाचा होम केला आहे. आमच्या शेजारच्या राष्ट्रां-तहि असेच महान् कर्तव्यशील वीर पुरुष निपजले आहेत. त्यांच्या कर्तृत्वाच्या अभ्यासानें आमच्या तरुण पिढींतील प्रामाणिक, कर्तव्यकठोर व शिस्तप्रिय कार्यकर्ते पुढे यावेत यासाठीं लेखकाचा हा प्रयत्न किंचित् उपयोगी ठरल्यास यांत लेखकास समाधान वाटेल.

हे पुस्तक आपल्या हातीं सुयोग्य रीतीनें पडावें यासाठीं कष्ट करणारे मुद्रक व त्याचे सहकारी, प्रकाशक, मुखपृष्ठ तयार करणारे चित्रकार या सर्वांचा मी आभारी आहे. अनेक पुस्तकें, मासिकें व स्फुट लेख यांचा हें पुस्तक लिहितांना उपयोग झाला. त्याच्या लेखकप्रकाशकाचाहि मी आभारी आहे.

१५ ऑगस्ट १९५५ — भालचंद्र गोपाळ बापट

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठांक |
|---|---|---|
| १. | पंडित जवाहरलाल नेहरू | १ |
| २. | डॉ. अबदुल रहमान सोकार्नो | २१ |
| ३. | डॉ. हो चि मिन्ह | ३५ |
| ४. | फील्ड मार्शल लुआंग पिबुन संग्राम | ५९ |
| ५. | चीनचे राष्ट्रपति मौ त्से-तुंग | ७२ |
| ६. | ब्रह्मी पंतप्रधान नू | ९५ |
| ७. | सूचि | १०७ |


सूचना:-पान १२, ओळ पहिली, 'पुकरा' ऐवजीं 'पुकारा' वाचावें.

# आशियांतील दीपस्तंभ

## १ पंडित जवाहरलाल नेहरू

### आधीं लगीन कोंडाण्याचें !

" आधीं लगीन कोंडाण्याचें, मग लावीन रायबाचें " अशी प्रतिज्ञा करून नरवीर तानाजीनें शिवाजी महाराजांचा निरोप घेतला आणि देशहितापेक्षां वैयक्तिक सुख-स्वास्थ्य कमी किंमतीचें असतें याचें प्रात्यक्षिक कोंडाणा किल्ल्यावर इ० सन १६७० सालीं आपल्या आत्माहुतीनें साऱ्या जगाला दाखविलें. त्या कोंडाण्याच्या-त्या सिंहगडाच्या-परिसरांत ठिकठिकाणीं भरून राहिलेल्या वीरवृत्तीचें-देशहितासाठीं आत्मत्याग करण्याच्या धीरोदात्त प्रवृत्तीचें-वारें भरून राहिलें आहे. त्या पुण्यभूमींत भारत सरकारनें भारताच्या संरक्षण-दलांतील अधिकारी शिकविणाऱ्या महाविद्यालयाची वास्तू बांधण्याचें ठरवून स्वतःचाच सन्मान करून घेतला. या महाविद्यालयाचा कोनशिला-समारंभ स्वतंत्र भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्तें झाला आणि त्या महाविद्यालयांतून शिकून बाहेर पडणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पहिल्या तुकडीचा दीक्षान्त विधीहि त्यांच्याच हस्तें झाला.



या दोन्ही घटना अत्यंत औचित्यपूर्ण आहेत. या समारंभास हजर असणाऱ्या सैनिकी अगर बिगर-सैनिकी भारतीयांना जुन्या इतिहासाचा साक्षात्कार झाल्याविना राहिला नसेल. नेहरूंच्या जीवनांत फार पूर्वीपासून "आधी लगीन कोंडाण्याचें" हें सूत्र बाणलेलें असल्याचें शेंकडों प्रसंगांतील त्यांच्या वागण्यावरून स्पष्ट झालेलें आहे. पिता व पत्नी आजारी असतांना कर्तव्य म्हणून देशबांधवांच्या दुःखांत सहभागी होण्याचे गुन्ह्याबद्दल पंडितजींना अनेकवार शिक्षा-तुरुंगवास भोगावा लागला. तरी त्यांचें जीवनध्येय विचलित झालें नाहीं. स्वातंत्र्यसंग्रामांत पंडितजींनीं जे कष्ट सोसले असतील त्याच्या कितीतरी पट अधिक कष्ट गेल्या आठ वर्षांत त्यांना सातत्यानें करावे लागले आहेत. सार्वजनिक काम दिवसाचे चोवीस तास महिनोंगणती केल्यामुळें पूर्वीं जो शारीरिक व मानसिक थकवा नेहरूंना येई तो अधूनमधून इंग्रज सरकारचे कृपेनें प्राप्त झालेल्या तुरुंगवासाचे विश्रांतींत भरून निघत असे. त्या मानानें १५ ऑगस्ट १९४७ नंतर आजपर्यंत त्यांच्या आयुष्यांत विश्रांति हा शद्बच उगवला नाहीं ! दिल्ली येथें असतांना २४ तासांपैकीं अठरा तास सतत काम हा त्यांचा खाक्या आहेच. परंतु दौऱ्यावर असतांनाहि त्यांना विश्रांति मिळणें माहीतच नाहीं. पंडितजींनीं १९५५ चे पहिल्या सहामाहींत इंडोनेशियाचा केलेला दौरा आणि रशिया वा युरोपांतील इतर देशांत केलेला कार्यक्रमांनीं भरगच्च झालेला दौरा पाहिला तर विमानप्रवासांतहि क्वचित मिळणारी विश्रांति त्यांनीं घेतली नाहीं असेंच दिसतें. वयाच्या ६६ व्या वर्षीं त्यांनीं दाखविलेलें हें कामाचें अगत्य जगांत फारच थोडया कार्यकर्त्यांनीं प्रकट केलेलें आहे.

आपण अधिकारपदावर आहोंत ते लोकांसाठीं आहोंत व लोक जेव्हां आपल्याकडे एकादी मागणी करतात तेव्हां ती योग्य असल्यास पुरविणें हें पहिलें काम; मग तें करतांना आपल्या वैयक्तिक अडीअडचणींची, गैरसोयींची परवा करावयाची नाहीं ही नेहरूंची प्रवृत्ति आहे खडकवासला येथील सैनिकी महाविद्यालयाच्या कोनशिला-समारंभप्रसंगीं पंडितजींची ही प्रवृत्ति इतक्या जोरानें दिसून आली कीं त्यामुळें नियोजित कार्यक्रमांत बिघाड होतो कीं काय अशी विवंचना समारंभाच्या व्यवस्थापकांना वाटल्याशिवाय

राहिली नाहीं. नरवीर तानाजीच्या सिंहगडाच्या साक्षीनें होणाऱ्या त्या समारंभानिमित्त शूर मावळ्यांचे हजारों वंशज खास निमंत्रणावरून हजर होते. त्याशिवाय लष्करी अधिकारी व सन्मान्य नागरिकहि शेंकडोंनीं आले होते. पंडितजी समारंभाचे शामियान्यापाशीं येताच त्यांना दिसलें कीं कांहीं निमंत्रितांना आवरणाचा शामियाना व बहुजनांना आकाशाचेंच छत लावलेलें आहे व त्यांना दोरीचे अंत ठेवतांना सैनिकांची त्रेधा उडालेली आहे! हजारोंनीं जमा झालेल्या जनतेला आपले पंतप्रधान डोळे भरून पहावयाचे होते आणि नेमके त्याच कार्यक्रमाला समारंभाचे व्यवस्थापकांनीं एकहि मिनिट ठेवलेलें नव्हतें! तिन्ही दलांच्या सैनिकांची मानवंदना, पहाणी, बरोबर घड्याळाचे ठोक्याला कोनशिला-स्थापन-समारंभ, त्याच वेळीं हवाई दलाची अंतरिक्षांतील सलामी या सर्व कार्यक्रमाची खूप पूर्वतालीम झाली होती. रंगीत तालीम झाली नव्हती जनतेच्या नेहरूंवरील प्रेमाची व नेहरूंच्या जनतेबद्दलच्या आपुलकीची!

## जनतेचे शिस्तशील नेहरू

पंडितजी आले व क्षणार्धांत त्यांनीं परिस्थिती पाहिली. एकदम संरक्षणमंत्री सरदार बलदेवसिंग यांचा दंड पकडून ते म्हणाले 'चलो! हम पहले जनताके साथ चले, बाद होगा प्रोग्राम!' शोभिवंत शामियान्यांत बसलेल्या सुप्रतिष्ठित निमंत्रितांकडे एक दृष्टिक्षेप टाकून पंडितजी घुसले दोरीच्या पलीकडे दाटीदाटीनें उभ्या असलेल्या ग्रामीण भागांतून आलेल्या आवडत्या जनतेकडे. पंडितजींनीं दोन्ही हात जोडून नमस्कार केला व "ठीक हैं" या शब्दांत त्यांचें कुशल पुसलें. समारंभासाठीं एवढ्या इतमामांत आलेल्या भारताच्या पंतप्रधानानें समारंभाची वास्तपुस्तदेखील न करता तडक आपल्याकडे धांव घ्यावी हें पाहून त्या मावळ्यांचीं अंतःकरणें गहिंवरून आलीं व दाटलेल्या गळ्यांनींच त्यांनीं जयघोष केला कीं "पंडित जवाहरलाल की जय!" समारंभ-मैदानाच्या सर्व बाजूंनीं गर्दीनें उभ्या असलेल्या जनतेला आदरून व त्यांचा हार्दिक प्रणाम स्वीकारून पंडितजी तिन्ही दलांचे सैनिक मानवंदनेसाठीं उभे होते त्या ठिकाणीं गेले. पुढील कार्यक्रम ठरल्याप्रमाणें

झाला. परंतु कोनशिला-समारंभाची बरोबर वेळ साधणार कशी ही समारंभ-चालकांची चिंता पंडितजींनीं जाणून त्या वेळचें भाषण इतकें आटोपतें घेतलें कीं, कोनशिला जमिनीस टेकतांच पूर्वीं ठरलेली तोफांची सलामी व आकाशांतील विमानांचा प्रणाम या गोष्टी तंतोतंत होऊं शकल्या !

पंतप्रधान झाल्यानंतरच नेहरूंनीं कामाची व वेळेची आस्था मानली अगर सभासमारंभांत शिस्त पाळली असें नसून कोणताहि कार्यक्रम शिस्तशीर व्हावा यासाठीं ते काळजी घेत सभेंत कांहीं गडबड झाली कीं ते किती रागावतात याचा अनुभव नेहरूंच्या १९५५ च्या रशिया दौऱ्यानंतर दिल्ली पालम विमानतळावर नागरिकांनीं त्यांचें जें बेशिस्त गोंधळी स्वागत केलें त्या वेळीं दिसून आलें. परंतु सभेची व्यवस्था ठीक ठेवल्याबद्दल नेहरूंनीं सभास्थानींच सभाव्यवस्थापकांना बोलावून घेऊन धन्यवाद दिलेले आहेत. १९३७ सालीं काँग्रेसच्या निवडणूक-प्रचारदौऱ्यांत त्यांनीं सर्व प्रांतांत व्याख्यानें दिलीं. निवडणूकसभा म्हटली कीं तींत कांहींतरी गडबड होण्याची शक्यता असतेच. पुणें येथील शनिवारवाड्यासमोर झालेल्या नेहरूंच्या सभेस पंचवीस हजारांचे आसपास श्रोते उपस्थित होते त्यांच्या तासाभराचे व्याख्यानाचे वेळीं सभेंत यत्किंचितहि दंगा-गडबड कोठेंच झाली नाहीं. पुण्यास येण्यापूर्वीं नेहरूंनीं आपल्या सभेंत कांहीं ठिकाणीं गडबड अनुभविली होती. त्यामुळें ते पुण्याचे व्यवस्थेवर एकदम खूष झाले. राग अगर लोभ आला की तो दाबून न ठेवता तत्काल दाखवावयाचा ही जवाहरलालांची फार जुनी संवय आहे. त्या वेळीं तसेंच झालें. त्यांनीं सभा संपताच सभेच्या चालकांकरवीं स्वयंसेवकप्रमुखास व्यासपीठावरच बोलावून घेतलें आणि सभेची व्यवस्था उत्कृष्ट ठेवल्याबद्दल त्याचें मनापासून अभिनंदन केलें.

## जीवनाचा धांवता आढावा

नेहरूंचें घराणें मूळचें काश्मीरी ब्राह्मणांचें. त्या वेळीं त्यांचें कुलनांव कौल असें होतें. सुमारें १७१६ च्या सुमारास दिल्लीचे बादशहांचे सूचनेनुसार कौल घराणें दिल्लीस आलें. त्यांना बादशहानें कालव्यानजीक जमीन इनाम दिली. कालव्यास हिंदींत 'नहर' म्हणतात. कालव्यावरचे म्हणजे नहरावरचे

ते 'नेहरू' असें नांव त्यांच्या कुलास पडलें व तेच पुढें चालू झालें. १८५७चे पूर्वी त्यांचे आजोबा दिल्लीस कोतवाल होते. पुढें नेहरू घराणें आग्र्यास व तेथून पुढें अलाहाबादेस येऊन स्थायिक झालें.

जवाहरलाल यांचे वडील कै. मोतीलाल नेहरू अलाहाबाद हायकोर्टांतील पहिल्या दर्जाचे वकील होते. कुशाग्र बुद्धिमत्ता, दीर्घ व्यासंग व अचाट परिश्रम यामुळें मोतीलाल महिन्यास हजारों रुपये मिळवीत आणि तसाच प्रचंड खर्चहि करीत. त्यांनीं अलाहाबादला 'आनंदभवन' हा श्रीमंती प्रासाद राहण्यासाठीं बांधला आणि घरांत सर्व राजेशाही खर्चही चालू ठेविला होता. अशा घरांत १४ नोव्हेंबर १८८९ रोजीं जवाहरलालांचा जन्म झाला. १९०५ पर्यंत त्यांचें राहणें व शिक्षण आनदभवनांतच झालें. संगोपनास इंग्लीश दाया व शिक्षणास इंग्रज शिक्षक असल्यामुळें त्यांचें इंग्रजांविषयीचें मत सुरुवातीपासूनच बरें होतें. वडिलांचेकडे येणाऱ्या मित्रमंडळींच्या चर्चेत कधींकधीं ब्रिटिश सरकारी अधिकाऱ्यांच्या उद्दामपणाविषयीं गोष्टी येत, परंतु त्या क्वचित्. लहानपणा आईबरोबर नेहरूंनीं कांहीं देवळें-घाट पाहिले असतील तेवढेच. परतु त्यांच्या मनावर अट्टाहासानें धार्मिक संस्कार घडविण्यांत आले नाहींत. वयाचे तेरावे वर्षीच ते थिऑसॉफिकल सोसायटीचे सभासद झाले. वयाचे सोळाव्या वर्षी वडील, आई व बहीण यांचेबरोबर १९०५ सालीं ते इंग्लंडला गेले. त्यांस हॅरो येथील विद्यालयात प्रवेश मिळाला. १९०७ सालीं हॅरोचा अभ्यासक्रम संपवून ते केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजांत पुढील अभ्यासासाठीं गेले. तेथें त्यांनीं तीन वर्षे रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र व भूस्तरशास्त्र या विषयांचा अभ्यास करून पदवी मिळविली. त्यानंतर दोन वर्षांत बॅरिस्टरीचा अभ्यास करून १९१२ सालीं ती पदवी मिळवून ते हिंदुस्थानला परत आले. १९१३ ते १९२० पर्यंत त्यांनीं कोर्टांत वकिली केली. महात्मा गांधींच्या असहकार चळवळींत भाग घेऊन त्यांनी वकिली सोडली ती पुन्हां दुसऱ्या महायुद्धानंतर इंडियन नॅशनल आर्मीच्या तिघा अधिकाऱ्यांवर १९४६ सालीं ब्रिटिश सरकारनें दिल्लीच्या लाल किल्ल्यांत खटला चालविला त्या वेळीं जवाहरलालजींनीं पुन्हां वकिली केली. घरची सुस्थिति आणि दुसऱ्या कामाची विशेष ओढ

नाहीं अशा स्थितींत जवाहरलालजींचा काल जात असता काँग्रेसच्या अधिवेशनास हजर राहून तिच्या कार्यांत भाग घेण्यास त्यांनीं सुरुवात केली. अलाहाबाद येथें १९१५ सालीं सरकारी निषेधाचे एका सभेंत जवाहरलालांनीं पहिलें सार्वजनिक भाषण केलें. त्या वेळीं कै. तेजबहादूर सप्रू यांनीं त्यांचें जाहीर अभिनंदन केलें. पुढील सालीं जवाहरलाल यांचा विवाह कमला कौल यांच्याशीं दिल्ली येथें मोठ्या थाटांत झाला.

१९२० नंतर गांधीजींच्या असहकार युगांतील चळवळींना नेहरूंनीं वाहून घेतलें. काँग्रेसचे कामांतहि त्यांनीं आपुलकीनें स्वतःस गुंतवून टाकलें. १९२१ सालीं पंडितजींच्या तुरुंगवासास सुरुवात झाली ती दुसऱ्या महायुद्धाचे अखेरीस १९ जून १९४५ पर्यंत नऊ वेळा त्यांनीं तुरुंगवास भोगला.

## तुरुंगवास व अनुभव

१९२१ सालीं काँग्रेस स्वयंसेवक संस्था बेकायदा ठरलीं होती. तेव्हां हरताळाच्या जाहिराती वाटल्याबद्दल त्यांस पहिली सहा महिन्यांची शिक्षा झाली. परदेशी कापडाच्या दुकानावर निरोधन केलें म्हणून १९२२ सालीं त्यास १८ महिन्यांची दुसरी शिक्षा झाली. त्या वेळीं नऊ महिन्यांतच त्यांची सुटका करण्यांत आली. १९२३ सालीं नाभा संस्थानची हद्द सोडण्याचा हुकूम मानला नाहीं म्हणून त्यास २॥ वर्षांची तिसरी शिक्षा झाली. परंतु तींतून लवकरच सुटका झाली. १९२३ ते २५ पर्यंत अलाहाबाद नगरपालिकेंत अध्यक्ष म्हणून त्यांनीं काम केलें. १९२६ च्या मार्चमध्यें सौ. कमला नेहरूंच्या आजारामुळें जवाहरलाल जीनिव्हा येथें पावणेदोन वर्षें राहिले. त्याला जोडूनच त्यांनीं इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स येथें दौरा केला. १९२७ च्या फेब्रुवारींत ब्रुसेल्स येथें भरलेल्या दलित राष्ट्रांच्या काँग्रेसला ते हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून हजर राहिले. याच वेळीं त्यांच्या अनेक आंतरराष्ट्रीय क्रांतिकारक कार्यकर्त्यांशीं ओळखी झाल्या व त्यांचा पुढील आयुष्यांत बरेच वेळा फायदाहि झाला. इंडोनेशियाचे उपाध्यक्ष डॉ.हाटा हेहि ब्रुसेल्सच्या परिषदेला आले होते व त्या ठिकाणीं त्यांची नेहरूंबरोबर जमलेली मैत्री

अद्यापहि कायम आहे. १९२७ सालीं पंडितजींनीं रशियांतहि दौरा करून मॉस्कोला भेट दिली. ( त्यानंतरची वैभवशाली स्वागताची त्यांची मॉस्कोभेट १९५५ सालींझाली.) १९३० सालीं सार्वत्रिक कायदेभंगाबद्दल (मीठ सत्याग्रह ) त्यांना चौथी शिक्षा ६ महिन्यांची झाली. १९३० सालीं ऑक्टोबरांत करबंदी चळवळ-पुरस्काराबद्दल त्यांस पांचवी अडीच वर्षांची कैद झाली. त्यांच्या वडिलांची प्रकृति फार बिघडली म्हणून त्यांची १९३१ च्या जानेवारीचे अखेरीस सुटका झाली. मोतीलालजी ६ फेब्रुवारी १९३१.ला मृत्यू पावले. १९३१ च्या २६ डिसेंबरला अलाहाबाद न सोडण्याचा निर्बंध मोडल्याबद्दल नेहरूंना २ वर्षांची कैद सांगण्यांत आली. १९३३ च्या ऑगस्ट मध्यें त्यांच्या मातोश्रीच्या आजारपणामुळें त्यांना मोकळे करण्यांत आलें. १९३४ च्या फेब्रुवारींत कलकत्त्याच्या भाषणाबद्दल त्यांस सातवी दोन वर्षांची शिक्षा सांगण्यांत आली. पुढल्याच वर्षी त्यांच्या पत्नीच्या आजारीपणामुळें त्यांची सुटका करण्यांत आली. ते पत्नीला घेऊन जर्मनीस गेले. याच आजारांत २५ फेब्रुवारी १९३६ ला कमला नेहरू निधन पावल्या. त्यानंतरची शिक्षा १९४१ ला चार वर्षांची सांगण्यांत आली परंतु पुढल्याच महिन्यांत त्यांची मुक्तता करण्यांत आली. १९४२ सालीं कॉंग्रेसनें पुन्हां देशव्यापी मोहीम सुरू केल्यामुळें पंडितजींना ९ ऑगस्ट १९४२ ला अटक करून स्थानबद्ध करण्यांत आलें. त्यांतून १९ जून १९४५ रोजीं त्यांची नगरच्या किल्ल्यांतून मुक्तता करण्यांत आली.

## निसर्गाशीं तन्मयता

या सर्व शिक्षा त्यांनीं निरनिराळ्या तुरुंगांत भोगल्या. त्यापैकी नैनी, डेहराडून व नगर येथील तुरुंगांत त्यांनीं बराच काळ काढला. तुरुंगांत असतांनाच त्यांनीं आत्मवृत्त व जगाचा इतिहास हे दोन मोठे, महत्त्वाचे ग्रंथ लिहिले. तुरुंगांतील जीवनाचें विस्तृत् चित्रण पंडितजींनीं आपल्या आत्मवृत्तांत केलें आहे. त्यावरून दिसतें कीं इतर लोकांप्रमाणेंच त्यांना सुखदुःख, राग लोभ, घरच्या मंडळींचे विचार इत्यादींनीं अनेकवार सतावलेलें आहे. निसर्गाची त्यांची आवड जेव्हां जेव्हां त्यांना पुरवून घेता आली

त्या वेळीं त्यांना कमालीचा आनंद वाटल्याचें त्यांनीं नमूद केलें आहे. तुरुंगांत व्यायाम करून प्रकृति ठीक राखण्याचें कामीं त्यांनीं नेहमींच कसोशी केली आहे. तुरुंगांतील कोठडींत अनुभवास आलेल्या निसर्गाच्या सोबतीचीं विरंगुळ्याचीं वर्णनें पंडितजींनीं पुढीलप्रमाणें केलीं आहेत. ते म्हणतात, "रात्रीं ताऱ्यांकडे टक लावून बसण्याची मला आवड होती . . . आवाराच्या तटावरून डोकावून पाहणारा ध्रुवतारा अंथरुणावर पडल्या पडल्या डोळ्यांना दिसत असे. सदोदित त्याच ठिकाणीं तो नजरेस पडत असल्याकारणानें त्याच्या दर्शनापासून मला फार समाधान होई व बदलत्या आकाशाच्या मध्यभागीं उभा ठाकलेला हा अविचल तारा म्हणजे चिकाटी व आनंदपूर्ण धिमेपणा या गुणांचें एक प्रतीकच आहे असें मला वाटत असे."

दुसऱ्या एका ठिकाणीं पंडितजी लिहितात कीं, तुरुंगांत सूर्योदय अथवा सूर्यास्त कधींच पाहवयास मिळत नसे. क्षितिजाचें दर्शन आम्हांला कधीं घडलें नाहीं. सकाळचा बराच काळ उलटल्यानंतर आमच्याभोंवती उभारलेल्या तटावरून जेव्हां सूर्य उगवे तेव्हां त्याचे किरण प्रखर झालेले असत. रंगवैचित्र्य तर कुठेंच नजरेस पडत नसे. मातीनें लिंपलेल्या भकास भिंतींकडे पाहण्याची संवय झाल्यामुळें डोळ्यांची रुचिग्रहणाची शक्ती जवळ जवळ नष्टच झाली होती. मनांतून मात्र छाया, प्रकाश आणि रंग यांचे खेळ पाहण्यासाठीं डोळे आतूर झालेले असावेत. त्यामुळें पावसाळी ढगांचीं शिडें जेव्हां मोठ्या दिमाखानें फडकू लागत व चित्रविचित्र मेघांच्या रांगा आकाशांत गर्दी करून इतस्तत: भटकून विविध रंगांत न्हाऊन जात, त्या वेळीं मी आनंदानें बेहोष होऊन डोळ्याची पापणी न हालविता समाधी लागल्याप्रमाणें त्यांच्याकडे पाहत राही! कधीं गर्द ढगांच्या फटींतून आकाशाच्या अगाध नीलिम्याचें दर्शन झालें कीं अनंताचा एक अल्पसा तुकडाच आपल्या हातीं आल्याचा भास होई!

## काँग्रेसचें राजकारण

पंडित जवाहरलाल यांचे वडील मोतीलाल नेहरू सुरुवातीस आपल्या वकिलीच्या व्यवसायांत दंग असत. तथापि पंजाबांत पहिल्या महायुद्धाचे

नंतर ब्रिटिश सरकारनें जो अत्याचारी धुमाकूळ घातला तेव्हांपासून मोतीलालजी सार्वजनिक कार्यांत प्रमुखपणें पुढाकार घेऊ लागले. वडिलांच्या बैठकींत म्हणून नव्हे तर स्वतंत्रपणें जवाहरलालांनीं सार्वजनिक कार्यांत भाग घेण्यास सुरुवात केली होती. १९१६ सालीं त्यांची व महात्मा गांधींची पहिली भेट झाली. तेव्हांपासून महात्मा गांधींच्या निधनापर्यंत जवाहरलाल व गांधीजी हे राजकारणांत एकमेकांपासून फारसे दूर कधींच गेले नाहींत. गांधीजींनीं वेळोंवेळीं 'आंतल्या आवाजा'च्या अनुरोधानें आपल्या मोहीमा सुरू करणें, बंद करणें, निरनिराळ्या घटनांचीं निदानें करणें अशा अनेक गोष्टी केल्या. त्यांतील बऱ्याच आपणांस कधींच पटल्या नाहींत असें जवाहरलालांनींच स्पष्टपणें आत्मचरित्रांत लिहून ठेवलें आहे. तथापि गांधीजींची लोकहिताची तळमळ व लोकांना संघटित करण्यांत वापरलेलें तंत्र व कौशल्य यामुळें बहुजनसमाजाचा पहिला मोठा संघटक म्हणून गांधींना अग्रमान देण्याची जवाहरलालजींची तयारी असे. १९१८ सालीं नेहरूंनीं होमरूललीगचें सेक्रेटरीपद पत्करलें होतें. १९१८ नंतर काँग्रेस कमिटीच्या कामांत त्यांनीं स्वतःला वाहून घेतलें तें काम अजूनहि चालूच आहे. १९२९ पूर्वी काँग्रेसचें वेळोवेळीं जें धोरण ठरविण्यांत आलें त्यांत नेहरूंचा प्रत्येक वेळीं महत्त्वाचा भाग होता असें म्हणतां येत नाहीं. परंतु १९२९ च्या ३१ डिसेंबरच्या मध्यरात्रीं लाहोर येथें रावी नदीच्या तीरावर भरलेल्या काँग्रेसच्या बैठकींत अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांनीं वसाहतीच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेस मूठमाती देऊन संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मंजूर करून घेतल्यानंतरच्या काँग्रेसच्या धोरणांत नेहरूंचा हिस्सा नेहमींच मोठा राहिला. १९३६, १९३७ व १९४६ असे तीन वेळां ते काँग्रेसचे अध्यक्ष झाले. त्यानंतर १९५१ सालीं त्यांना पुन्हां अध्यक्ष निवडण्यांत आलें. तें अध्यक्षपद गेल्या वर्षी श्री. ढेबर यांना देऊन पंडितजींनीं काँग्रेसच्या दैनंदिन कामापासून स्वतःस मुक्त करून घेतलें. आतांपर्यंत दोन तपें पंडितजींनीं काँग्रेस कार्यकारिणीचे सभासद म्हणून काम केलें आहे.

काँग्रेसचें राजकारण करतांना जवाहरलालजींनीं गांधीजींच्या सल्लामसलतीनुसार अनेक वेळां आपलें धोरण निश्चित केलें असलें तरी त्यांचा व

गांधीजींचा राजकारणी पिंड मुळांतच भिन्न होता असें स्पष्ट दिसतें. गांधीजींच्या धोरणांतील धार्मिक बाजू नेहरूंना कधीच मान्य झाली नाहीं. त्याचप्रमाणें राजकीय चळवळीला एकदा धार आणल्यानंतर क्षुल्लक, तांत्रिक दोषामुळें ती चळवळ एकदम बंद करण्याचें गांधीजींचें धोरणहि १९२२ सालीं नेहरूंना पसंत पडलेलें नाहीं. १९४२ सालीं कॉंग्रेसचें युद्धविषयक धोरण निश्चित करतांना गांधीजींपेक्षां नेहरूंची भूमिका आंतरराष्ट्रीय राजकारणावर जास्त आधारलेली होती.

## पुढारी ‘ लोकप्रिय ’ नव्हे, पण ‘ जनतेचा ’

शहरीं लोकांच्या गाऱ्हाण्यांपेक्षां खेडुतांच्या दु:खाचें स्वरूप नेहरूंना प्रतापगड जिल्ह्यांतील तालुकदारांच्या जुलुमाविरुद्ध तक्रारी घेऊन आलेल्या शेतकऱ्यांनीं अलाहाबादच्या घाटावर प्रथम दाखविलें. तेव्हांपासून पंडितजी बहुजनसमाजाच्या दु:खाशीं, अडीअडचणींशीं एकरूप होण्याचा प्रयत्न करूं लागले. बहुजनसमाजाची स्थिति ‘मुकीं बिचारीं कुणी हांका ’ अशी नेहमींच असल्यामुळें योग्य भूमिका व दृष्टि असलेल्या नेत्याला या बहुजनांकडून कोणतेंहि देशकार्य चांगल्या रीतीनें करून घेणें जितकें शक्य असतें त्यापेक्षां जातीय किंवा धार्मिक दृष्टिकोनांतून तात्पुरता फायदा बेफामपणें रंगवून सांगितला गेला तर हाच बहुजनसमाज स्वार्थी पुढाऱ्यांच्या आहारीं सहजपणें जाऊं शकतो याचा अनुभव पंडितजींना आल्याशिवाय राहिला नाहीं. लोकप्रिय पुढारी होण्यापेक्षा जनतेच्या निकडीच्या हक्कांसाठीं झगडा करून ‘जनतेचा पुढारी’ होण्याचें नेहरूंनीं पत्करलें. नेहरूंनीं स्वत: कामगारवर्गाच्या जागृतीचें काम फारसें कधीं केलें नव्हतें. परंतु बंगालमधील कामगार कार्यकर्त्यांचे आपसांतील हेवेदाव्यामुळें त्यांना १९२८ सालीं झालेल्या निवडणुकींत ट्रेड युनियन कॉंग्रेसचे अध्यक्षपदीं निवडण्यांतहि आलें होतें. त्याबाबत नेहरूंनीं लिहिलें आहे कीं ‘ नव्या व बिगर–कामगार माणसाला एकदम कामगार संघटनेच्या अध्यक्षपदीं नेऊन बसविणें ही गोष्ट माझ्या दृष्टीनें शिष्टपणाला शोभणारी नाहीं. ’

**पं. जवाहरलाल नेहरू**

अनुक्रमांक ... विभाग ... क्रमांक ... नों. दि.

## आंतरराष्ट्रीय भूमिकेचा पुरस्कार

हिंदुस्थानचे पंतप्रधान व परराष्ट्रमंत्री झाल्यानंतरच पंडित जवाहर-लाल नेहरू यांना आंतरराष्ट्रीय राजकारणाची आवड वाटूं लागली किंवा त्यांत ते नव्यानें पुढें आले अशी वस्तुस्थिति नसून जवळ जवळ गेलीं तीस वर्षें आंतरराष्ट्रीय भूमिकेवरून आपले प्रश्न हाताळण्याची त्यांची भूमिका स्पष्ट दिसून येते. १९२७ सालीं जगांतील दलित राष्ट्रांच्या प्रतिनिधींची कॉंग्रेस युरोपांत ब्रुसेल्स येथें भरली होती. तत्पूर्वी ते इंग्लंडांत असतांना १९०५ ते १९१२ पर्यंत हिंदुस्थानांतील साहसी क्रांतिवाद्यांनीं परदेशांत राहून व तेथून मदत मिळवून भारताचें स्वातंत्र्य सिद्ध करण्यासाठीं ज्या खटपटी केल्या होत्या त्यांतील कित्येकांना त्यांनीं जवळून पाहिलेंहि होतें. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न स्वतंत्र नसून तो आशियाच्या व पर्यायानें जागतिक राजकारणाशीं दृढ रीतीनें संबंधित आहे असे विचार त्यांनीं १९३३ सालीं लिहिलेल्या ‘ व्हिदर इंडिया ’ या पुस्तिकेंत स्पष्टपणें मांडलेले होते. जगांतील साम्राज्यशाही व सोटेशाही राज्यकर्त्यांना जागतिक आघाडीवर व भूमिकेंतून साऱ्या पददलितांनीं शक्य तर संयुक्तपणें विरोध करावा अशी आंतरराष्ट्रीयवाद्यांची भूमिका होती. पंडितजी या भूमिकेपासून फारसे दूर नव्हते. १९२६–२७ सालीं त्यांनीं इटली, जर्मनी, स्वित्झर्लंड व रशिया या देशांत जमेल तेवढा दौरा करून आंतरराष्ट्रीय घडामोडींचा सूर जवळून ऐकला होता. १९३६ सालीं युरोपांतून परत येतांना ते रोममध्यें थांबले होते. त्या वेळीं भेटीसाठीं इटलीचा मुसोलिनी तयार असतांहि तो फॅसि-झमचा पुरस्कर्ता आहे व त्यानें अबिसीनियावर केलेलें आक्रमण अन्याय्य आहे म्हणून त्याच्या निषेधार्थ पंडितजींनी मुसोलिनीची भेट घेण्यास नकार दिला. १९३८ सालीं स्पेन व १९३९ चीनला भेटी देऊन नेहरूंनीं त्या ठिकाणीं जगांतील मोठ्या राष्ट्रांनीं बनविलेल्या रणचंडीच्या प्रयोगशाळाहि जवळून पाहिल्या होत्या. त्या वेळीं त्यांनीं त्या वेळचा चीनचा प्रमुख मार्शल चियांग कै शेक याची भेट घेतली होती.

## समाजवादाचा पुकारा

आंतरराष्ट्रीय राजकारणांतच नेहरू फॅसिझमविरोधी झाले होते असें नसून भारतीय राजकारणांतहि त्यांचा कल समाजवादाकडे १९३३ सालापासून विशेष स्पष्ट होऊं लागला होता. भगतसिंग–फांशीमुळें झालेला क्षोभ आवरण्यासाठीं गांधीजींच्या पुरस्कारानें शेतकऱ्यांच्या हक्काचा एक विस्तृत व महत्त्वाचा ठराव १९३० च्या कराची काँग्रेसचे अधिवेशनांत स्वीकृत करण्यांत आला असला तरी त्याची अंमलबजावणी करण्याची व्यवस्था काँग्रेसनें नंतर केली नव्हती. १९३३ च्या ऑक्टोबरमध्यें संयुक्त प्रांतांतील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या बैठकींत समाजवादी धोरणाचा ठराव मान्य करण्यांत आला त्यांत जवाहरलाल भागीदार होते. या प्रकरणीं जुन्या काँग्रेस पुढाऱ्यांना त्यांचें धोरण पसंत पडेना. या प्रसंगाला अनुसरून नेहरूंनीं आत्मचरित्रांत लिहिलें आहे कीं "माझ्या समाजवादी मतप्रचाराच्या परिणामाकडे पाहून काँग्रेस कार्यकारिणीमधील माझे काहीं सहकारीसुद्धा बिथरले.... माझ्या सहकाऱ्यांचा समाजवादावर मुळींच विश्वास नाहीं हें मला माहीत होतें! पण मी वर्किंग कमिटीचा सभासद असलों तरी माझ्या मतप्रचारानें तिचा हात कोणत्याहि प्रकारें गुंतण्याचा संभव नसल्यामुळें मला समाजवादाचा प्रचार करण्याची पूर्ण मुभा आहे अशी माझी समजूत होती. परंतु माझ्या काहीं सहकाऱ्यांचें मत निराळें असल्याचें पाहून मला नवल वाटलें."

१९३३ सालच्या या घटनांविषयीं आश्चर्य प्रदर्शित करणाऱ्या जवाहरलालजींनीं १९२९ च्या लाहोर काँग्रेसच्या आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हटलें होतें कीं "मी समाजवादी व प्रजासत्ताकचा पुरस्कर्ता आहे असें मी स्पष्ट सांगू इच्छितों...जगाचे व भारताचे प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविण्यासाठीं समाजवादाचीच कास धरावी लागेल याविषयीं माझी खात्री झालेली आहे!" १९२९ सालीं भारताच्या प्रश्नाची सोडवणूक समाजवादानें करण्याचें उद्दिष्ट सांगणाऱ्या नेहरूंनीं त्यानन्तर बरोबर सव्वीस वर्षांनीं भरलेल्या १९५५ च्या जानेवारीतील मद्रासनजीकच्या आवडी येथील काँग्रेसच्या ७० व्या अधिवेशनांत, भारतांत समाजवादी व्यवस्थेची

उभारणी करण्यांत यावी असा ठराव स्वीकृत करून घेतला. आज १९५५ सालीं पंडित नेहरू जगांतील फक्त समाजवादी सरकारांच्या बाजूनें उभे न राहतां भांडवलशाही व समाजवादी राष्ट्रांना या पृथ्वीतला-वर सहजीवनानें जगता येईल असा आशावाद प्रगट करीत आहेत. समाज-वादावरची त्यांची तात्त्विक श्रद्धा प्रत्यक्ष व्यवहारांत अंमलबजावणी कर-ण्याचे वेळीं बरीचशी पातळ झाली तरीहि पंडितजींच्या समाजवादी प्रवृ-त्तीच्या मूळच्या पिंडाला बाध येत नाहीं हें जातां जातां सांगणें जरूर वाटतें.

## आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जवाहरलाल

गांधीजींच्या हयातींतच पंडित जवाहरलाल नेहरू ४ सप्टेंबर १९४६ रोजीं हिंदुस्थानच्या हंगामी मंत्रिमंडळाचे प्रमुख बनले आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजीं निर्माण झालेल्या खंडित भारताचेहि ते पंतप्रधान झाले. १९२७ पासून १९४७ पर्यंत वीस वर्षांच्या काळांतील आंतरराष्ट्रीय राज-कारणांतील चढउताराचा सखोल अभ्यास असणाऱ्या पंडित नेहरूंनीं हिंदु-स्थानच्या फाळणीस मान्यता कां दिली याविषयींचें समाधानकारक उत्तर अद्याप मिळूं शकलें नाहीं. कॉंग्रेसच्या इतर पुढाऱ्यांना स्वातंत्र्यसंपादनाची घाई झाली होती आणि 'फाळणी नाहीं तर स्वातंत्र्य नाहीं' असा पेंच ब्रिटिश सरकारनें घातल्यामुळें आम्ही नाइलाजानें फाळणीस मान तुक-विली अशी भाषा कॉंग्रेसच्या इतर पुढाऱ्यांनीं केली तरी ती नेहरूंना बोलता येणार नाहीं. गांधीजींच्या सत्याग्रहाच्या चळवळीला भिऊन ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांतून आपला गाशा गुंडाळण्यास सुरुवात केली नव्हती. त्यापेक्षांहि अत्यंत प्रभावी अशा युद्धोत्तर आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळें, भारताच्या संर-क्षकदलाच्या मनोरचनेंत युद्धामुळें झालेल्या महत्त्वाच्या क्रांतिकारक फरका-मुळें, पूर्वींसारखें बंदुकीचें राज्य पुढें चालविणें अशक्य झाल्याची खूणगांठ ब्रिटिशांनीं मनाशीं बांधली. तिची ओळख पंडित नेहरूंना पटली होती. तरीहि फाळणीचें दुर्दैव भारतीय नागरिकांच्या गळीं उतरविण्यांत आलें. या फाळणी-पूर्वीं नेहरूंच्या पुरस्कारानेंच दिल्ली येथें १९४७ च्या मार्चमध्यें आशियांतील

राष्ट्रांची अनौपचारिक संबंध-परिषद भरविण्यांत आलेली होती. आंतरराष्ट्रीय घडामोडींचे फटके साऱ्या जगाला बसत असतां त्यापासून हिंदुस्थानला वेगळा काढून त्याची फाळणी करण्यांत येऊन १५ ऑगस्ट १९४७ रोजीं भारत व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रें बनविण्यांत आलीं.

स्वतंत्र भारताचे पंतप्रधान व परराष्ट्रमंत्री म्हणून गेल्या आठ वर्षांत पंडितजींनीं आंतरराष्ट्रीय राजकारणांत खूप नांवलौकिक मिळविण्याइतकें काम आतांपर्यंत केलें आहे. दुसऱ्या महायुद्धांत दोस्त म्हणून खांद्यास खांदा लावून जर्मनी-जपानविरुद्ध लढलेल्या रशिया-अमेरिकेच्या दरम्यान जगाचें वांटप करण्याचा मनसुबा युद्धोत्तरकालांत जोरांत होऊं लागला. त्यासाठीं अमेरिकेनें उत्तर अॅटलांटिक करार, मध्यपूर्व करार, आग्नेय आशिया संरक्षक करार असे राष्ट्रगटांचे करार घडवून आणले. हिंदुस्थानच्या फाळणींतून निर्माण झालेल्या भारताच्या भावंडाशीं-पाकिस्तानशीं लष्करी मदतीचा करार करून अमेरिकेनें भारत-अमेरिका संबंधांतील सौहार्द बऱ्याच प्रमाणांत कमी केलें. हा भारतहितविरोधी करार होण्यापूर्वीं पंडित नेहरूंनीं १९४९ च्या आक्टोबर-नोव्हेंबरांत अमेरिकेंत दौरा केला होता ही गोष्ट विसरता येत नाहीं. समाजवादी पिंड असणाऱ्या नेहरूंच्या भारतापेक्षां मध्ययुगीन राज्यपद्धतीचा पुरस्कार करणाऱ्या पाकिस्तानी मुस्लीम लीगवाल्या पुढाऱ्यांशीं लष्करी करार करून पाकिस्तानला आपल्या लगामीं लावून घेणें अमेरिकेला सोईस्कर गेलें असावें. आंतरराष्ट्रीय राजकारणांतील दुसऱ्या महायुद्धानंतरच्या महत्त्वाच्या घडामोडी म्हणजे रशिया-अमेरिकेच्या दरम्यान चालणाऱ्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष चकमकी होत, युरोपच्या भूमीवर जर्मनींत, ऑस्ट्रियांत या चकमकी प्रत्यक्ष झाल्या आणि आशियांत चीनचे भूमीवर, कोरियांत, इंडोचायनांत त्या अप्रत्यक्ष रीतीनें झाल्या अगर चालू आहेत. चीनच्या राज्याचा भाग असलेल्या फोर्मोसा बेटाचे रक्षणाविषयीं अमेरिकेनें निरर्थक अट्टाहास चालविल्यामुळें पूर्व आशियाच्या राजकारणांतील तंग अवस्था फारशी कमी झालेली नाहीं.

युद्धोत्तर स्वतंत्र झालेल्या आशियांतील देशांपैकीं रशिया-अमेरिकेच्या आहारीं न गेलेल्या राष्ट्रांत भारत हेंच एक प्रचंड (लोकसंख्येच्या मानानें)

राष्ट्र आहे. या देशांतील अंतर्गत स्वास्थ्य सध्यां बऱ्यापैकीं आहे हें निश्चित. परंतु आंतरराष्ट्रीय राजकारणांत भारताच्या शब्दाला, मध्यस्थीला वजन यावें एवढी शक्ती भारतापाशीं १९५५ सालीं देखील निर्माण झालेली नाहीं ही गोष्ट पोर्तुगालसारखें पिटुकलें राष्ट्र भारत सरकारच्या गोवें प्रकरणींच्या निर्वाणीच्या खलित्यांना फारसें मानीत नाहीं त्यावरून दिसून येतें. तथापि रशिया–अमेरिकेच्या दरम्यानचे तेढीमुळें निर्माण झालेली कोरिया–इंडोचायनांतील कोंडी भारताच्या मध्यस्थीमुळें काहीं अंशीं सोडवणुकीचे मार्गास लागली असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंडोनेशियांतील स्वातंत्र्यवाद्यांना ठेचणाऱ्या डचांविरुद्ध भारतानें मोठा गहजब केला व इंडोनेशियाला प्रकट सहानुभूति दाखविली. त्याचा परिणाम त्या झगडयांत अमेरिका–ऑस्ट्रेलियानें मध्यस्थी करून स्वतंत्र इंडोनेशियाची प्रस्थापना होण्यांत झाला आहे.

कोरिया--इंडोचायनांतील वडयांच्या वादांत भारताला तटस्थाची कामगिरी मिळाली व तींत कांहीं प्रमाणांत यशहि आलें. परंतु भारताचे शेजारचें पाकिस्तान, सेतुबंध रामेश्वराचे दक्षिणेस असलेलें सीलोनचें छोटें राज्य व दक्षिण आफ्रिका सरकार या ठिकाणच्या राज्यकर्त्यांनीं गेल्या आठ वर्षांत आपल्याकडून होईल तितकी भारताची वदनामी, नालस्ती व अपमान करण्याचाच अट्टाहास केला आहे. पूर्वेच्या शेजारी ब्रह्मदेशला भारताचें मित्रत्व हवें आहे व चीनला हवा असणारा तिबेट भारतानें विनातक्रार त्यास घेऊं दिल्यामुळे ब्रह्मदेशनें व चीननें पंतप्रधान नेहरूंच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारांतील पंचशिलेचा पुरस्कार जोरानें चालविला. तथापि या पंचशिलेच्या तत्त्वांची अंमलबजावणी करण्याचें कोणतेंहि प्रकट बंधन कोणावरच नाहीं, सर्वच व्यवहार केवळ सदिच्छेच्या पायावर अवलंबून आहे ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.

## पंचशिलेचा चीन–रशियाकडून पुरस्कार

चीनचे पंतप्रधान व परराष्ट्रमंत्री चौ एन लाय यांनीं १९५४ च्या जून महिन्यांत भारतास भेट दिली. त्या वेळीं चौ एन लाय व पं. नेहरू या

दोघांच्या स्वाक्षरींनीं पंचशिलेचा कार्यक्रम उभय राष्ट्रांना मान्य असल्याची घोषणा करण्यांत आली. या घोषणेंत पुढील पांच तत्त्वें अंतर्भूत करण्यांत आलेलीं आहेत: (१) परस्परांच्या प्रदेशाची एकता व सार्वभौमत्व याविषयीं परस्परांनीं आदरभाव बाळगणें. (२) अनाक्रमण. (३) एकमेकांनीं दुसऱ्या देशाच्या अंतर्गत घडामोडींत हस्तक्षेप करूं नये. (४) उभयतांनीं परस्परांस बरोबरीचें मानावें व परस्परांस साहाय्य करावें. (५) दोघांनींहि शांततेनें सहजीवन कंठावें.

पंडित नेहरूंनीं चीनला भेट दिली तेव्हां त्यांचें चीन सरकारनें व जनतेनें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें व चीनच्या प्रदेशांतील प्रगति त्यांना दाखविली. नेहरूंनीं जुलै १९५५ चे सुरुवातीस केलेला रशियाचा दौरा भारत रशियाच्याच काय परंतु जागतिक राजकारणांतील महत्त्वाच्या घडामोडींत दूरगामी ठरला. कारण नेहरूंच्या मॉस्कोभेटीनंतर जीनिव्हा येथें अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन व रशिया या राष्ट्रांच्या प्रमुखांची जी यशस्वी वैठक जुलैंत आठवडाभर झाली तिची बरीच पूर्वतयारी नेहरूंच्या मॉस्को-भेटींत घडून आली होती. रशिया-दौऱ्यानंतर नेहरूंनीं रशियन नेत्यांच्या बदललेल्या शांततेच्या धोरणाची ग्वाही स्वानुभवानें जगाला दिल्यामुळें आंतरराष्ट्रीय वातावरण काहीसें स्वच्छ होण्यास निश्चितपणें मदत झाली असें म्हणावें लागेल.

स्वतंत्र भारताचा कारभार गेलीं आठ वर्षें पंतप्रधान नेहरू जवळ-जवळ एकखांबी तबू पद्धतीनेंच चालवीत आले आहेत. भारताची घटना लोकशाहीची असली तरी भारतीय जनतेच्या रक्तांतच विभूतिपूजा पिढ्यान्-पिढ्या भिनलेली असल्यामुळें आपल्याला काय वाटतें यापेक्षां आपल्या पुढाऱ्यांना काय वाटतें याकडेच या देशांतील लहानमोठ्या, सुजाण व वेड्या अशा सर्व नागरिकांचें लक्ष लागून राहिलेलें असतें. अशा परिस्थितींत या देशांत खरी लोकशाही किंवा खऱ्या अर्थानें समाजवाद नांदणें व रुजणें शक्य नाहीं ही गोष्ट द्रष्टया नेहरूंना समजलेली आहे. आवडी काँग्रेसच्या अधिवेशनाचें समारोपाचे भाषणांत पंडितजींना या गोष्टीची जाणीव झालेली दिसते. ते २५ जानेवारी १९५५ला आपल्या भाषणाचे शेवटीं तरुण पिढीला

उद्देशून म्हणाले कीं, " आमच्या देशाच्या स्वातंत्र्याची ही ज्योत आतां यापुढें तरुण पिढीनेंच आपल्या हातीं घेतली पाहिजे. आम्ही खूप चुका केल्या आहेत. तें कसेंहि असलें तरी भारताची इभ्रत आम्हांस नेहमींच महत्त्वाची वाटत असल्यामुळें तिला धक्का बसेल अशा तऱ्हेचें एकहि कृत्य आम्ही आणि कॉंग्रेसच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनीं अद्याप केलेलें नाहीं. भारताची बेअब्रू होईल अगर अवमान होईल अशा तऱ्हेचें कोणतेंहि कृत्य तुम्ही करणार नाहीं अशी आशा मी करतों. फार काळापूर्वी पेटविण्यांत आलेली भारताच्या स्वातंत्र्याची ही ज्योत तुम्ही स्वाभिमानानें तेवत ठेवाल असा माझा विश्वास आहे."

## तरुण पिढीला नेहरूंची विनवणी

१९५४ च्या नोव्हेंबर महिन्यांत चीनचा दौरा करून परत आल्यानंतर जवाहरलाल नेहरूंनीं नव्या भारतासाठीं ऐक्याची जरूरी कशी आहे हे पुढीलप्रमाणें सांगितलें . ते म्हणतात " एकजुटीमुळेंच देश मोठा होतो हें चीन व इतर देशांना दिलेल्या भेटींत मला आढळून आलें. देशांतील तरुणांनीं क्षुल्लक गोष्टी विसरून पुढें आलें पाहिजे आणि नव्या भारताची उभारणी केली पाहिजे. गेल्या कांहीं वर्षांत गुलामगिरीच्या शृंखलांतून मुक्त झालेल्या आशियाप्रमाणेंच हिंदुस्थानहि कसोटीच्या काळांतून जात आहे. हिंदी जनता कोणत्या मार्गानें जात आहे याकडे जगांतल्या प्रत्येकाचें लक्ष आहे. हिंदी तरुणांनीं संघटित व शिस्तबद्ध होऊन राष्ट्रप्रेम, कामाबद्दल ज्वलंत उत्साह आणि राष्ट्रीयत्वाची भावना अंगीं बाणविली पाहिजे. राष्ट्राचें अंतिम सामर्थ्य लष्करी शक्तींत किंवा शस्त्रास्त्रांच्या सांठ्यांत नसून जनतेच्या एकजुटींत आहे. आम्हांला आमची समाजव्यवस्था बदलावयाची असेल, कांहीं गोष्टी लौकर घडवून आणावयाच्या असतील तर तो बदल आमचा आम्हीच घडवून आणूं. परकीयांना आमच्या कारभारांत हस्तक्षेप करण्याचा हक्क नाहीं.

" आपल्या आजच्या हिंदी राष्ट्राची वाढ गेल्या पन्नास वर्षांच्या अहिंसेच्या लढ्यानें झाली. पण इतरांनीं आपल्या अहिंसात्मक लढ्याच्या आद-

र्शांचें अनुकरण करावें अशी आपली अपेक्षा असेल तर ती मात्र चुकीची आहे. प्रत्येक राष्ट्राची उभारणी त्याच्या प्राचीन इतिहासावर झालेली असते.

"कोणत्याहि विशिष्ट सरकारकडे किंवा तेथील जनतेकडे आम्ही संशयानें पाहत नाहीं. तसेंच राज्यपद्धतीबद्दल नापसंति व्यक्त करीत नाहीं. आमचें धोरण इतरांवर लादण्याची आमची इच्छा नाहीं.आंतरराष्ट्रीय प्रश्नांसंबंधीं आमचा दृष्टिकोन नेहमींच सनदशीर व शांततेचा आहे."

पंडित जवाहरलाल नेहरूंचें वय आज ६६ असलें तरी त्यांचा उत्साह व काम करण्याची पद्धत विशींतल्या तरुणाला लाजविणारी आहे. त्यांच्या--इतकें काम त्यांचे सर्व सहकारी व हाताखालील नोकरवर्ग निष्ठेनें व आस्थेनें करील तर कारभारांत कांहीं वेळा दिसणारी चालढकल नष्ट होऊं शकेल असें निरीक्षकांना वाटतें. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या इतर राष्ट्रांतील पुढारी व जनता यांच्या काम करण्याच्या वेगाशीं भारतीयांनीं चढाओढ करणें अगत्याचें आहे. परदेशांत दौरा करून आलेल्या प्रत्येक समंजस भारतीयाला नेहमीं असेंच वाटत असतें. रशियाच्या दौऱ्याचें प्रस्थान ठेवण्याआधीं पंतप्रधान नेहरूंनीं खडकवासला लष्करी महाविद्यालयांत ५ जुलै १९५५ रोजीं दीक्षांत समारंभाचे वेळीं सैनिकी अधिकाऱ्यांपुढें भाषण करतांना सांगितलें कीं, "आपण ज्या ऐतिहासिक परिसरांत कार्य करीत आहांत त्या भागांत पूर्वी महान् कामगिरी झालेली आहे. पुन्हां तीच पराक्रम व राष्ट्रकार्य करण्याची संधि आपणांस मिळाली आहे. तिचा आपण सदुपयोग करून घ्यावा. आपण नवजवान आहांत. तेव्हां देशासाठीं असीम परिश्रम व जरूर पडली तर आत्मत्याग करण्याचीहि आपण सिद्धता ठेवावी. ज्यामुळें देशाचा विकास व भरभराट होईल असेंच कार्य आपलें शिक्षण झाल्यावर करा. आपणाला ३५ कोटी जनतेला सुखी करावयाचें आहे हें ध्यानांत ठेवा.

"भारतांत अनेक प्रांत, अनेक धर्म, विविध जाती असल्या तरी त्यांचा एकमेकांशीं विरोध असता कामा नये. आपण भारताच्या भूभागांत कोठेंहि राहत असा; सर्व भारत एक आहे ही भावना जागृत ठेवा. सर्व

भारताची एकच लोकसभा आहे. सर्वांचा एकच झेंडा आहे. ही एकत्वाची भावना आपण सतत मनांत ठेवा."

## बालकांच्या नेहरूकाकांचें धाडस

पं. नेहरूंचें राजकारण, आंतरराष्ट्रीय महत्त्व, दौरे, मुलाखती यांतून त्यांचें होणारें दर्शन पूर्ण नाहीं याचा अनुभव या देशांतील हजारों बालकांना व तरुणांना आलेला आहे.' बालकांचे आवडते नेहरूकाका ' अशी त्यांची ख्याति केवळ भारतांतच नव्हे तर चीन-रशिया–युरोपांतील दौऱ्यांत सर्वत्र झालेली आहे. नेहरूंच्या स्वभावांतील धाडशीपणा जुन्या काळापासूनचा आहे. घोडदौड व बर्फमय प्रदेशांत संचार या गोष्टी त्यांच्या अत्यंत आवडीच्या आहेत. सृष्टीशीं एकरूप होण्याची त्यांची प्रवृत्ति त्यांच्या एकांतवासांतील तुरुंगांत त्यांना फार उपयोगी पडलेली आहे. धाडसी जीवनाची त्यांची आवड तरुणपणापासूनची कशी आहे याची एक सुंदर आठवण त्यांनीं आत्मचरित्रांत पुढीलप्रमाणें दिली आहे. १९१६ सालीं त्यांचा विवाह दिल्ली येथें झाल्यावर नेहरू कुटुंब काश्मीरांत गेलें. त्या वेळीं जवाहरलाल व त्यांचा एक चुलत-भाऊ असे दोघेजण बरेच आठवडे बर्फमय डोंगरांत हिंडत होते. ते लडाख घाटहि त्या वेळीं चढून गेले. झोजीला घाट चढून गेल्यानंतर मातायानपाशीं गेल्यावर त्यांनीं ' मैलांवर असलेल्या अमरनाथला जाण्याचें ठरविलें. वाटेंत एक प्रचंड हिमाच्छादित पर्वत आडवा होता. ११५०० फूट उंचीवरचा तळ सोडून हे दोघे अमरनाथकडे निघाले. सतत बारा तास चालून ते व त्यांचे हमाल थकून गेले. पण फळ काय मिळालें तर अर्धा मैल बर्फमय प्रदेश तुडविण्याचें शिल्लक राहिलें होतें ! त्यांतील खोल व रुंद चराबरोल बर्फाचा थर न समजल्यानें पंडितजींचा पाय बर्फरापुद्रा फाडून खालीं एका चरांत गेला. त्यांनीं सावधगिरीनें चराच्या कडांना घट्ट धरून ठेवल्यामुळें ते थोडक्यांत बचावले. त्यांना मग वर ओढून घेण्यांत आलें. पंडितजींनीं या प्रसंगाविषयीं लिहिलें आहे कीं," ती भेग खूप खोल व विस्तृत होती. तिच्या तळाशीं गेलेली वस्तु कांहीं युगें तरीं सुरक्षित राहिली असती याविषयीं शंका घेण्याचें कारण नव्हतें."

## पौर्वात्य–पाश्चिमात्य संस्कृतींचा संगम

" जवाहरलाल नेहरू हे माझे वारसदार आहेत " ही महात्मा गांधींची उक्ती पंडितजींनीं अधिकांशानें खरी करून दाखविली आहे. त्यांनीं पुष्कळ वर्षांपूर्वीं स्वत:विषयींचें वर्णन करणारा एक लेख टोपणनांवानें छापला होता. त्याचा एक उतारा त्यांच्या भगिनी सौ. कृष्णा हाथीसिंग यांनीं आपल्या एका लेखांत दिला आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं " जवाहरलाल हे प्रवृत्तीनें लोकशाहीचे भोक्ते नाहींतच. त्यांचा तो पिंड नव्हे व त्यांच्या भोंवतालच्या परिस्थितीनेंहि त्यांना लोकशाहीनिष्ठ बनविलेलें नाहीं. ते एक प्रकारचे सोटेशहाच आहेत. "

पंडितजींनीं स्वत:चेंच केलेलें हें वर्णन त्यांच्या चाहत्यांना प्रसंगोपात्त पटल्याशिवाय राहत नाहीं.

जवाहरलालजींचें वर्णन इतरांनीं अनेकविध केलें आहे. तथापि तें पुरेसें होण्यासाठीं त्यांचें मत पहा. त्यांनीं स्वतः आत्मचरित्रांत आपल्याविषयीं असें म्हटलें आहे कीं," मी एका तरी व्यक्तीचा प्रतिनिधी आहे कीं काय अशी शंका पुष्कळ वेळां माझ्या मनांत उत्पन्न होते. अनेकांच्या मनामध्यें माझ्यासंबंधीं मित्रत्वाची अथवा आपुलकीची भावना वसत असली तरी पण मला कोणा-चाहि प्रतिनिधी म्हणतां येणार नाहीं. पौर्वात्य आणि पाश्चात्य संस्कृतींच्या संमिश्र रांध्यापासून मी निर्माण झालों आहे. माझें सूत कुठेंच जमत नाहीं, मी कोठेंहि नांदत नाहीं. माझे विचार व माझा जीवनविषयक दृष्टिकोन पौर्वात्य संस्कृतीपेक्षां पाश्चात्य संस्कृतीशींच अधिक मिळताजुळता असावा. परंतु हिंदभूच्या कोटयवधि अपत्यांप्रमाणेंच मीहि अनेक पाशांनीं तिच्या अंत:करणाशीं संबद्ध होऊन गेलेलों आहे. माझ्या अंतर्मनाचा एक धागा आतांपर्यंत होऊन गेलेल्या ब्राह्मणांच्या शेंकडोहजारो पिढयांच्या स्मृतीशीं संलग्न होऊन राहिलेला आहे. तें इतिहासाचें ऋण मला विसरता येत नाहीं आणि आधुनिक संस्कृतीचे सस्कारहि मला पुसून टाकता येत नाहींत. इतिहास व वर्तमानकाळ माझ्या रक्तांत एकरूप झालेले आहेत. "

# २ डॉ. अब्दुल रहमान सोकार्नो

## जुन्या वैभवशाली संस्कृतीचा वारसा

बांडुंग येथें १९५५ च्या एप्रिल महिन्यांत भरलेल्या आफ्रिका–आशियांतील २९ राष्ट्रांच्या प्रतिनिधींचें स्वागत करतांना इंडोनेशियाचे अध्यक्ष डॉ. सोकार्नो यांनीं एका नवीन युगास सुरुवात झाल्याचें सांगितलें. १ जानेवारी १९५० ला स्वतंत्र झालेल्या इंडोनेशियाच्या प्रदेशांत पांच वर्षांच्या आंत दोन खंडांतील २९ राष्ट्रांच्या परिषदेची बैठक भरावी ही गोष्ट या नवीन प्रजासत्ताकाला निःसंशय भूषणभूत आहे. इंडोनेशियाचें आधुनिक स्वातंत्र्य फक्त पांचच वर्षांचें जुनें असलें तरी शेंकडों वर्षांपासूनचा वैभवशाली जुना इतिहास, संस्कृति व भाषा या राष्ट्राच्या पाठीशीं उभी आहे. स्वातंत्र्यलढ्यांतील सोकार्नो यांची भूमिका विविध स्वरूपाची आहे.



आधुनिक इंडोनेशियाचे प्रश्न व त्यांच्या अध्यक्षांचा जीवनपरिचय समजावून घेण्यासाठीं आपणांस या राष्ट्राच्या पूर्वेतिहासाकडे संक्षेपानें पाहिलें पाहिजे.

इंडोनेशियांतील बहुसख्य प्रजा सध्यां मुसलमानी धर्माची असली तरी या लोकांनीं आपल्या जुन्या वैदिक व बौद्ध संस्कृतीबरोबरचे आपले संबंध अजूनहि दृढ ठेवले आहेत. या दोन्ही संस्कृतीचें आद्यपीठ असणाऱ्या भारतांत या संस्कृतींचे अवशेष आजच्या काळांत जितके सांपडतात त्याच्या कितीतरी पटींनीं अधिक अवशेष केवळ दगडधोंड्यांत नव्हे तर प्रत्यक्ष भाषेंत-वागण्यांत इंडोनेशियांतील जनतेमध्यें आढळून येत आहेत. ख्रिस्तशकाचे सुरुवातीस भारतीय हिंदूंनीं आपल्या वसाहती इंडोनेशियांत स्थापिल्या. महाभारतांतील शूर वीरांनीं जावा बेटांत वस्ती केली अशा कथा आहेत. तेथें प्रथम कलिंगांनीं पाऊल टाकलें.कलिंगाच्या युवराजानें वीस हजार कुटुंबांची जावा बेटांत पाठवणी केली व त्यांचीच प्रजा पुढें वाढली. इ. स. १३२ मध्यें जावाचा राजा देवरमण यानें चीन सरकारकडे आपला वकील पाठविला होता. सुमात्रा बेटांत चौथ्या शतकांत श्रीविजयचें राज्य महशूर होतें. तें घराणें सातव्या शतकापर्यंत टिकलें. या राज्याचीं जहाजें चीन व भारत या देशांपर्यंत जात असत. काश्मीरचा युवराज गुणवर्मा हा राज्यत्याग करून भिक्षु झाला व त्यानें जावा बेटांत बौद्ध धर्माचा मोठा प्रसार केला. इ. स. ४२४ या वर्षीं चीनचे बादशहानें त्यांस चीनमध्यें येण्याचें निमंत्रण दिलें होतें. नालंद विद्यापीठांतील प्राध्यापक कांचीचा धर्मपाल व दक्षिण भारतांतील वज्रबोधी हा भिक्षु या दोघांनीं चीनमध्यें तांत्रिक पंथ स्थापला. वैदिक व बौद्धधर्मांची जोडीनेंच भरभराट होत होती. पुढें बौद्धधर्मीयांची चलती झाली. आग्नेय आशियांतील मलायावर राज्य करणाऱ्या शैलेंद्रानें इ. स.७८२ सालीं जावा जिंकला. त्याचें आरमार फार मोठें होतें. सुवर्णद्वीपाची राजकीय एकता त्यानेंच राखली. जावामधील चांडी कालासा व बोरो बोदूर येथील कलाकुसरीचीं प्रचंड बांधकामें याच्याच कारकीर्दींत झालीं. या राज्यावर पुढें चोलांनीं स्वारी केली. अकराव्या शतकाचे अखेरीस शैलेंद्र घराणें पराभूत झालें.

कामंदकाचें राजकर्तव्य, इंद्रलोकनें लिहिलेला राजनीतिवाद, नीतिप्राय यानें सांगितलेलीं शत्रूविषयींचीं राजाचीं कर्तव्यें इत्यादि अनेक ग्रंथांतील तत्त्वज्ञानाचा तेथील कारभारावर परिणाम होत असे. साहित्यक्षेत्राकडे नजर

टाकली तर असें दिसतें कीं कालिदासाचीं नाटकें, महाभारत, रामायण, रघुवंश, कुमारसंभव यांची जुन्या जावा भाषेंत भाषांतरें झालीं होतीं. ठिकठिकाणीं सांपडलेल्या शुद्ध संस्कृत शिलालेखांवरून तेथील समाजजीवनाशीं एकरूप झालेल्या हिंदु संस्कृतीची साक्ष पटते. तेथील लोकांना हिंदु पंचांग, अतरें मोजण्याचीं परिमाणें माहीत होतीं. देवनागरी लिपीचाहि वापर केला जाई. गोमती, चंद्रभागा, जयनगारा, कर्नाटक, कलिंग हीं नांवें इंडोनेशियांत आजहि प्रचलित आहेत.

हिंदु व बौद्ध संस्कृतींवर पहिला आघात पंधराव्या शतकांत हिंदुस्थानांतील मुसलमान व्यापारी जावांत व्यापारासाठीं गेले त्या वेळीं झाला. १४१६ सालीं त्यांनीं जावा बेटांत मोठी वसाहत केली. व्यापाराबरोबर धर्मप्रसारहि आला. त्यांनीं १५२२ मध्यें मजाफन राजाचा पराभव केला. मलाया–सुमात्रा येथेंहि इस्लामचा प्रचार चालू होताच. मात्र या भागांतील इस्लामवर भारतीय सामाजिक कल्पना, धार्मिक आचारविचार, सांस्कृतिक साहित्य व लोकवाङमय यांचा पक्का ठसा उमटलेला आहे. जावाचे मुसलमानी राजे पांडवांना मानीत. युधिष्ठिर मुसलमान होऊन निधन पावला असें तेथील लोकगीतांत आहे. भारतीय वाङमयाची उलटसुलट मांडणीहि लोकगीतांत व कवनांत क्वचित् झालेली आहे. रामानें पंचवटींतील वनाचे संरक्षणासाठीं अर्जुनाची योजना केली होती असें तेथील गीतांत आढळतें !

## पाश्चात्यांनीं घांस घेतला

इंडोनेशियाच्या निरनिराळ्या बेटांवर इस्लामचा पगडा बसतो न बसतो तोंच युरोपांतील निरनिराळ्या देशांतील धाडसी नाविक व व्यापारी यांनीं या बेटांकडे आपला मोर्चा वळविला. सोळाव्या शतकाचे पहिल्या दशकांत पोर्तुगीज या बेटांवर उतरले. पुढें १५२१ मध्यें स्पॅनिश, १५३० मध्यें फ्रेंच, १५९२ सालीं डच व १६०२ च्या सुमारास इंग्रज व्यापारी येथें आले. 'मसाल्याचीं बेटें' म्हणून येथील संपत्तीच्या आशेनें आलेल्या पाश्चात्य राष्ट्रांतील लोकांपैकीं पोर्तुगीजांनीं ख्रिश्चन धर्मप्रसाराचा अट्टाहास केल्यानें त्यांनीं सुरुवातीसच मार खाल्ला. फ्रेंच, इंग्रज व डच यांनीं

सुरुवातीस व्यापारी धोरण ठेवलें तरी त्यांतूनच येथें साम्राज्य कमाविण्याची महत्त्वाकांक्षा दाखविण्यास सुरुवात करतांच मोठ्या लढायांना तोंड लागलें. हिंदुस्थानांत इंग्रजांनीं जसा भेदनीतीचा अवलंब केला तसल्याच कारवाया डच लोकांनीं येथें केल्या. इंग्रजी कवायती फौजेप्रमाणें डच कवायती फौज विजयी होऊं लागली. डचांविरुद्ध इस्लामी राजांनीं प्राणपणें लढा दिला. परंतु १८९९ च्या फेब्रुवारी ११ ला शेवटचा विरोधक टेंकू उमर लढाईंत मारल्यानें इंडोनेशियाचे प्रदेशांत डचांचें साम्राज्य निर्वेध झालें.

डचांनीं या प्रदेशांतून हॉलंडसाठीं जास्तींत जास्त संपत्ति कशी नेता येईल यासाठीं नित्य नव्या योजना आंखून लोकांची पुरी नागवणूक केली. देश मूळचाच सुपीक व समृद्ध. त्यांत डचांनीं ऊंस, कॉफी यांची मोठी लागवड केली. या बेटांपैकीं अनेक भागांत तेलाच्या विहिरीहि सांपडल्या. त्यामुळें इंडोनेशियाला फारच महत्त्व प्राप्त झालें. सर्व तऱ्हेच्या सुखसंपत्ति-साधनांचें आगर असलेल्या इंडोनेशियाचें राज्य हॉलंडचें वैभव वाढवीत होतें. परंतु त्याच वेळीं तेथील जनतेला दारिद्र्यांत व पारतंत्र्यांत कुजवीत होतें. त्याची साहजिक होणारी प्रतिक्रिया म्हणजे स्वातंत्र्य-लढा. तिची पहिली ठिणगीं जपाननें १९०५ सालीं रशियाचा पराभव केला त्या वेळीं पडली. इंडोनेशियाच्या स्वातंत्र्य--भुकेचा हा स्फुल्लिंग पुढें फुलता फुलता अनेक अडचणींना टक्कर देऊन १ जानेवारी १९५० रोजीं त्यानें डचांच्या साम्राज्याची होळी केली आणि स्वतंत्र इंडोनेशियाचा ध्वज पुन्हां मोठ्या डौलानें त्या दिवशीं सर्वत्र फडकूं लागला. स्वातंत्र्याचे लढ्यासाठीं सशस्त्र आणि निःशस्त्र, मवाळ आणि जहाल, व्यक्तिगत आणि गटागटांनीं सारखे प्रयत्न चालूं होते. या स्वातंत्र्यमोहिमेंत शब्दशः शेंकडों देशभक्तांचे बळी रणांगणांत व तुरुंगांत पडले आहेत. डच साम्राज्यवाद्यांनीं अनेक देश-भक्तांना जिवंतपणीं मृत्यु दाखविणारे तुरुंग व हद्दपारीचीं ठिकाणें शोधून काढलीं होतीं. भेदनीतीचा अवलंब वेळोवेळीं केला जाई. परंतु त्यांतूनच देश-प्रेमी इंडोनेशियन जनतेनें मार्ग काढला. १९०५ सालीं जपाननें जशी स्फूर्ति दिली तशीच दुसऱ्या महायुद्धांत जपान्यांच्या ताब्यांत कांहीं काळ राहिल्या-मुळें इंडोनेशियन जनतेला आपल्या स्वातंत्र्यलढ्याची फार मोठ्या प्रमाणा-वर तयारी करणें शक्य झालें.

जपाननें इंडोनेशियाच्या बहुतेक प्रदेशाचा ताबा १९४२ च्या पहिल्या तिमाहींत घेतला आणि आपल्या अखत्यारीखालीं आलेल्या ब्रह्मदेश-फिलिफाईन्सप्रमाणें इंडोनेशियालाहि संपूर्ण स्वातंत्र्य देण्याची घोषणा जपानी पंतप्रधान तोजो यानें केली. डचांनीं दिलेला स्वातंत्र्यसोपानाच्या पायऱ्यांचा अनुभव इंडोनेशियन जनतेनें पूर्वींच घेतला होता. तेव्हां इंडोनेशियाच्या कांहीं विचारी पुढाऱ्यांनीं आपले दोन गट करून डॉ. सोकार्नोस जपान्या-बरोबर सहकार्य करण्यास सत्रड दिली व शारियप्रभृति दुसऱ्या गटांतील नेत्यांनीं भूमिगत राहून स्वातंत्र्यलढयाची तयारी सुरू केली.

## ' भीम ' टोपण नांवानें लिहिणारा सोकार्नो

अबदुल रहमान सोकार्नोचा जन्म ६ जून १९०१ रोजीं एका गरीब कुटुंबांत सुरबाया शहरांत झाला. त्याचे वडील शिक्षक होते. ते इस्लाम-धर्मीय असून आई बाली बेटांतून आलेल्या हिंदु कुटुंबांतील होती. सोकार्नोच्या जीवनांत हा इस्लाम–हिंदु सहजीवनाचा परिणाम अजूनपर्यंत टिकून आहे. लहानपणीं त्यांस डचांनीं चालविलेल्या शाळेंत धाडण्यांत आलें.शालेय जीवनांतील मार्गक्रमण चालू असतां तरुण सोकार्नोला आपल्या बांधवांचें दारिद्रय आणि पिळवणूक दिसत होती. शाळेंतील वरच्या वर्गांत गेल्यानंतर सोकार्नोच्या वक्तृत्वास वाव मिळाला. त्यानें छोटेमोठे लेखहि लिहिण्यास सुरुवात केली. ' ऑएटोएसान हिंदिया ' नांवाच्या पत्राचे संपादक हाजी ओएमंर सय्यद जोक्रोआमिनोटो यांच्या घरीं तो राहत असे. तरुण सोकार्नोनें त्यांचा आदर्श आपल्यापुढें ठेवला. याच देशभक्तानें पार्टाय सारेकत हा राजकीय पक्ष काढण्यांत मोठा पुढाकार घेतला होता. या संपादकानें तरुण सोकार्नोचे लेख ' भीम ' या टोपणनांवानें छापण्यास मदत केली. महा–भारतीय पांडवांतील शक्तिमान ' भीमा ' चें नांव सोकार्नो यांनीं लेखांचे शिरोभागीं घालण्यास सुरुवात केली. त्या लेखांतील " भीम " पणामुळें सोकार्नो पोलिसांचे डोळयांवर येऊं लागला. लेखनाबरोबर सभांत व्याख्यानें देण्यास सोकार्नो पुढें आला. शाळेंत असतांना त्यानें कष्ट करून वक्तृत्वकला चांगली संपादिली होती. तिच्यामुळें सोकार्नोच्या सभा गाजूं लागल्या.

एकदां तर त्याची सभा उधळून लावण्यासाठीं सुरवाया शहरचे पोलिस-प्रमुखांनीं धांव घेतली होती. उधळल्या गेलेल्या सभेंतील वक्ते म्हणून सोकार्नोचें नांव लोकांत गाजलें. परंतु त्याच्या प्राध्यापकांनीं त्याला नांवें ठेविली. पहिल्या महायुद्धानंतर इंजिनिअरिंगचें शिक्षण घेण्यासाठीं सोकार्नोला हॉलंडला धाडण्यांत आलें. हिंदुस्थानांतील हजार विद्यार्थ्यांना आपलें उच्च शिक्षण पुरें करण्यासाठीं इंग्रजांचे अंमदानींत इंग्लंडमध्यें जावे लागे. अशा शिक्षणासाठीं इंग्लंडला गेलेल्या अनेक तरुणांना तेथील स्वातंत्र्यवाद व चळवळी यांचें आकर्षण वाटे व आपल्या मातृभूमीच्या गुलामगिरीची चीड येत असे. त्यामुळें शिक्षणासाठीं गेलेल्यांपैकीं अनेक विद्यार्थी क्रमिक अभ्यासाबरोबरच स्वातंत्र्याचे व लोकशाहीच्या लढ्याचे धडे घेत असत. इंग्लंडप्रमाणेंच इंडोनेशियांतील विद्यार्थ्यांची स्थिति हॉलंडमध्यें गेल्यानंतर होई.

हॉलंडला शिक्षणासाठीं गेलेल्या तरुण सोकार्नोला हाच मार्ग अनुसरावा लागला. तेथें इंडोनेशियाच्या स्वातंत्र्यासाठीं लढा देणाऱ्या तरुणांच्या 'इंडिशे वेरीनिगिंग' या नांवाच्या राजकारणी गटाशीं त्याचा जवळून संबंध आला. या संस्थेनें १९२४ सालीं आपलें नांव बदलून 'पेहरिंपोरे इंडोनेशिया' असें घेतलें. या संस्थेचे सभासद होणाऱ्यांना इंडोनेशियाच्या स्वातंत्र्यासाठीं लढा देण्याची शपथ घ्यावी लागे. या संस्थेंत हिंदु व मुसलमान या दोन्ही धर्मांची मंडळी सभासद होती. इंडोनेशियांतून परक्या डचांना हांकलून देणें व देश स्वतंत्र करणें यासाठीं पडतील ते कष्ट करण्याची तयारी संस्थेच्या सभासदांनीं चालविली होती.

## राष्ट्रगीत व राष्ट्रध्वजाची निश्चिति

१९२७ सालीं सोकार्नो यानें स्वत: पार्टाय नॅशनल इंडोनेशिया नांवाचा राजकीय पक्ष स्थापन केला. परमेश्वरावर श्रद्धा, राष्ट्रीयत्व, लोकशाही, सामाजिक सुरक्षितता ही या पक्षाचीं मुख्य सूत्रें होतीं. पक्षानें तांबडा व पांढरा पट्टा असलेलें निशाण निश्चित केलें. हेंच निशाण पुढें इंडोनेशियाचा राष्ट्रध्वज झालें आहे. या पक्षानें स्वीकृत केलेले 'इंडोनेशिया राया' हें गीत स्वतंत्र इंडोनेशियाचें राष्ट्रगीत पुढें ठरविण्यांत आलें. सोकार्नोच्या या पक्षां-

तूनच पुढें इंडोनेशियाचा राष्ट्रीय पक्ष निघाला. डचांच्या साम्राज्यशाहीला प्रकटपणें धोका निर्माण करणाऱ्या या तरुणाला फार काळ मोकळें सोडणें डच कारभाऱ्यांना शक्य नव्हतें. १९२९ सालीं गुप्त कट केल्याचे आरोपावरून त्यांस चार वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा फर्माविण्यात आली. राजकीय प्रांगणांत उभे राहिल्यानंतर तुरुंगवास, हद्दपारी आणि हालअपेष्टा यांच्याशिवाय देशभक्तांचे वांट्यास दुसरें कांहींच येत नसतें. तरुण सोकार्नो या सर्व तपस्येंतून पार गेला. चार वर्षांची शिक्षा पुरी होण्यापूर्वींच त्यांस मुक्त करण्यांत आलें.

त्याच सुमारास जागतिक मंदी व आर्थिक तंगीमुळें इतर देशांप्रमाणेंच इंडोनेशियांतील जनताहि आर्थिक हलाखी व डचांची पिळवणूक यामुळें कमालीची संत्रस्त झाली होती. सोकार्नोला आपल्या देशबांधवांचें गाऱ्हाणें वेशीवर टांगून आपत्तींतून त्यांची मुक्तता व्हावी म्हणून जोराची राजकीय उठावणी करणें जरूर वाटलें आणि त्यानें तें काम मोठ्या धडाडीनें अंगावर घेतलें. तो एक उत्कृष्ट वक्ता होता. आपल्या देशबांधवांच्या दु:खानें, आपत्तीनें तो स्वत:च गांजला गेल्याचें स्पष्ट दिसत होतें. समाजाची आर्थिक पुनर्घटना केल्याखेरीज नित्य नव्यानें येणारे आर्थिक आघात सहन करण्याची शक्ति इंडोनेशियांतील जनतेच्या अंगांत राहणार नाहीं हें त्याच्या या वेळच्या प्रचाराचें सूत्र होतें. इंडोनेशियाच्या प्रजेच्या आर्थिक पुनर्घटनेमागें राजकीय हक्कांची बैठक येतच होती. राजकीय व आर्थिक क्षेत्रांतील डचांच्या मिरासदारीला त्यामुळें मोठा धोका निर्माण झाला. साम्राज्यसत्तेला जो धोका तोच त्या साम्राज्यसत्तेच्या रुळांखालीं भरडल्या जाणाऱ्या गरीब जनतेलाहि धोका आहे असा पुकारा साम्राज्यवादी करीत असतात. सोकार्नो यास १९३३ सालीं डच सरकारनें अटक केली व त्याला फ्लोरेस बेटावर हद्दपार केलें. पांच वर्षांनंतर ३० एप्रिल १९३८ रोजीं त्यास बानकोलिन या दुसऱ्या ठिकाणीं हलविलें. परंतु तेथेंहि त्यास स्थानबद्ध करून ठेवलें. तुरुंगवासांत खंबीर प्रवृत्तीचे देशभक्त मनाला शांति व विचारांना स्थिरता मिळविण्यासाठीं धार्मिक ग्रंथांच्या अभ्यासाचा उद्योग करीत असतात. त्यामुळें, शत्रूकडून होणाऱ्या छळाच्या

परिणाम त्याच्या शरीरावर भरपूर झाला तरी मनावर मात्र शून्य होतो. सोकार्नोनें स्थानबद्धतेच्या काळांत जगांतील धर्मांचा तौलनिक अभ्यास करून आपल्या राष्ट्रीय कार्याच्या योजनेला अध्यात्मिक बैठकीची जोड दिली.

## युद्धकाळांतील सोकार्नोंची भूमिका

जपान्यांनीं डच ईस्ट इंडीजवर हल्ला केला त्या वेळीं त्यांच्याशीं दोन हात करण्याइतकी शक्ति डचांपाशीं नव्हती. नव्या परक्या आक्रमकास योग्य रीतीनें थोपविण्यासाठीं डच व इंडोनेशियन प्रजा यांनी एकजूट करावी अशा भूमिकेवरून सोकार्नो यांनीं डच सरकारला कांहीं सूचना केल्या होत्या. परंतु त्या साम्राज्यसत्तेनें झिडकारल्या. जपान्यांनीं तडाक्याचा टोला हाणून डच ईस्ट इंडीजमधील डच साम्राज्याला मोक्ष दाखविला. जपान्यांनीं या राज्याचा ताबा घेतला तेव्हां सोकार्नो स्थानबद्ध होते. जपान्यांनीं त्यांना बंधमुक्त केलें आणि त्यांच्याकडे सहकार्याविषयीं विचारणा केली, सोकार्नोंची कार्यकुशलता, लोकप्रियता आणि स्वदेशाभिमान यांची जपान्यांना माहिती होती. त्यांचें सहकार्य मिळालें तर इंडोनेशियन जनतेकडून आपल्याला फारसा उपद्रव होणार नाहीं असा त्यांचा अंदाज होता. आपल्यास आग्नेय आशिया आपल्या ताब्यांत आणावयाचा आहे व तें करतांना अमेरिकन, फ्रेंच, डच व ब्रिटिश अशा चार साम्राज्यांबरोबर कडाक्याचा सामना द्यावयाचा ही गोष्ट जपानी जाणून होते. या चार पाश्चात्य शत्रूंच्या जोडीला त्या त्या ठिकाणच्या स्थानिक आशियावासी लोकांबरोबर झगडा करण्याची वेळ येऊं नये या हेतूनें जपानी मुत्सद्यांनीं आग्नेय आशियांतील आपल्या ताब्यांत येणाऱ्या प्रदेशांतील जनतेला युद्धकालांत स्वायत्तता व युद्धानंतर स्वातंत्र्य देण्याचीं आश्वासनें देण्याची योजना आंखली होती.

पाश्चात्य साम्राज्यवाद्यांनीं पिळून काढलेल्या इंडोनेशियांतील जनतेला जपानी अमल प्रथम बरा वाटला. इंडोनेशियाच्या पुढाऱ्यांना जपान्यांचा स्वार्थ समजला होता. तरीहि सोकार्नोसारख्यांनीं उघडया डोळ्यांनीं जपान्यांचे कलानुसार वागण्याचें ठरविलें. सर्वच पुढाऱ्यांनीं निकरानें विरोध केल्यास कदाचित् काहीं स्वार्थी गट पुढें येऊन जपान्यांचे हस्तक बनून जनतेला पिळून-छळून काढतील ही भीति होतीच. शिवाय कदाचित् जपान्यांनीं सारा कार-

भार आपल्या हातीं घेतला तर देशांत युद्धकालांत लष्करशाहीचेंच राज्य होऊन लोकांचें धैर्य खचेल अशीहि आशंका पुढाऱ्यांच्या मनाला चाटून गेली असली पाहिजे. त्यामुळें सोकार्नोचें जपानला प्रकट साहाय्य व शारियरप्रभृतीचें भूमिगत स्वातंत्र्यलढ्याचें संघटन असा दुहेरी स्वातंत्र्यलढा देण्याचें इंडोनेशियाचे नेत्यांनीं ठरविलें. हे दोन प्रकार करणाऱ्या पुढाऱ्यांची आंतरिक एकजूट होती म्हणूनच त्यांच्या कार्यांत एकोपा राहूं शकला व अखेरीस स्वातंत्र्यवाद्यांच्या शक्तींत भर पडूं शकली ही महत्त्वाची गोष्ट विसरून चालणार नाहीं.

## विविध संघटनांचे प्रमुख

जपान्यांबरोबर सहकार्य करण्याचें सोकार्नो यांनीं मान्य केल्यानंतर जपान्यांनीं त्यांना टोकिओ येथें बोलाविलें. जपानी बादशहानें त्यांचा सत्कार करून त्यांना उगवत्या सूर्याचें सन्माननीय पदक दिलें. जपान्यांशीं सहकार्य करतांना भावी स्वतंत्र इंडोनेशियाची मजबुती करण्याचा निश्चय त्यांनीं टोकियोहून परतल्यावर केला. जपान्यांनीं मुलकी कारभारासाठीं दीवान-पूसत नांवाचें केंद्रीय कारभारीमंडळ व अनेक स्थानिक मंडळें स्थापन केलीं. २४ सप्टेंबर १९४३ ला हें केंद्रीय मंडळ स्थापण्यांत आलें. सोकार्नो यास त्याचे अध्यक्ष करण्यांत आलें. नवें सैन्य संघटित करणें, देशाची कामगार-शक्ति एकत्रित करणें, कारभारांत काटकसर वगैरे कामें या मंडळाकडे जपान्यांनीं सोपविलीं होतीं. जपान्यांनीं 'पूतेरा' ही तरुणांची संघटना १९४३ च्या मध्यें स्थापन केली. डॉ. सोकार्नो यांनाच याहि संघटनेचे अध्यक्ष करण्यांत आलें. पूतेरा संघटनेचा चांगलाच फायदा इंडोनेशियाचे पुढाऱ्यांनीं घेतला. अपेक्षेपेक्षा पूतेराचें काम कमी पडलें म्हणून जपान्यांनीं 'सुका-रेला' नांवाची नवीन सैन्यभरती केली पण तो प्रयोग फसला. त्यानंतर जपान्यांनीं कामगार-सहकार्यासाठीं 'जावा हकोकाई' संघटना सुरू केली. पूतेरा वगैरे संघटना व दीवान पूसत हें मंडळ जपान्यांनीं पुढें बरखास्त केलें तरी या संघटनांचे प्रमुख म्हणून सोकार्नो यांस कामाचीं जीं क्षेत्रें मोकळीं मिळालीं तेथें त्यांनीं भूमिगत स्वातंत्र्य-सैनिकांचीं भरपूर केंद्रें निर्माण केलीं. भूमिगत संस्थांत 'इंडोनेशियन यूथ असोसिएशन' ही महत्त्वाची संघटना होती.

## युद्धसमाप्तीपासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत

१५ ऑगस्ट १९४५ ला जपानी शरण गेले. शक्य तर जपानी अंमलांतच स्वतंत्र इंडोनेशियन राज्याची घोषणा करावयाची अशी योजना पुढाऱ्यांनीं आंखली होती, परंतु तें न जमल्यामुळें युद्ध संपतांच १७ ऑगस्ट १९४५ रोजीं डॉ. सोकार्नो यांनीं इंडोनेशियन लोकसत्ताक राज्याची घोषणा करून हंगामी सरकारचीहि नेमणूक केली. या नव्या सरकारनें अनेक जपानी अधिकाऱ्यांना व सैनिकांना कैद करून त्यांचीं हत्यारें व दारूगोळा आपल्या ताब्यांत घेतला. १९२७ सालीं युरोपांत ब्रुसेल्स येथें दलित राष्ट्रांच्या कॉंग्रेसला गेलेले इंडोनेशियाचे प्रतिनिधी डॉ. हाटा यांचें मोठें सहकार्य सोकार्नो यांस या वेळीं लाभलें. पुढील चार वर्षांच्या स्वातंत्र्ययुद्धांत डॉ. हाटा यांच्या नेहरू-स्नेहाचाहि इंडोनेशियाला खूप फायदा झाला.

इंडोनेशियांतील डच सैन्यांची संख्या फारच थोडी होती. त्यामुळें इंडोनेशियन प्रजासत्ताकचा सुरुवातीस मोठा जोर होता. प्रजासत्ताकाची जनताधिष्ठित तात्पुरती घटना तयार करण्यांत येऊन संघटना-मत-सभा-स्वातंत्र्याची घोषणा करण्यात आली. महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण आणि नागरिकहितानुरूप अर्थव्यवस्था केली जाईल असेंहि घोषित झालें. १५ ऑक्टोबर १९४५ रोजीं २५० सभासदांच्या इंडोनेशियन नॅशनल कन्व्हेन्शनची (राष्ट्रीय मंडळ) बैठक बोलाविण्यांत आली. स्वतंत्र इंडोनेशियन प्रजासत्ताकास जगांतील इतर देशांनीं मान्यता द्यावी अशी विनंति या मंडळानें केली. या मंडळानें निवडलेल्या राष्ट्रीय मध्यवर्ति समितीची बैठक १८ ऑक्टोबरला झाली. विजयी दोस्त राष्ट्रांच्या सेनेच्या इंडोनेशियाचे प्रदेशांतील कामांत जनता साहाय्य देईल असें जाहीर करण्यांत आलें. डॉ. सोकार्नो यांनीं दोस्तांचे सरसेनापती सर फिलिप ख्रिस्तिसन यांना सुचविलें कीं इंडोनेशियांत डच सेना पुन्हां येऊं नये, तेथें असलेलें डच लष्कर परत नेण्यांत यावें, डचांचे जुने नोकर आपोआप पुन्हां कामावर येऊं नयेत व प्रजासत्ताकास प्रस्थापित राज्य म्हणून दोस्तांनीं मान्यता द्यावी. २३ नोव्हेंबर १९४५ ला अध्यक्ष डॉ. सोकार्नो यांनीं पंतप्रधान डॉ. शारियर यांच्या मंत्रिमंडळाची नेमणूक केली.

डचांनीं युद्धसमाप्तीनंतर पुनश्च आपल्या जुन्या साम्राज्यावर अंमल गाजविण्याचा अट्टाहास १९४५ च्या आक्टोबरपासून सतत चार वर्षे चाल-विला होता. या कालांत त्यांनीं इंडोनेशियन सैन्याबरोबर अनेक लढाया केल्या; अनेक करार केले व मोडले. इंडोनेशियाचे राज्यांत मोडणाऱ्या निरनिराळ्या बेटांत फुटीर प्रवृत्तीचीं स्थानिक राज्यें स्थापण्याच्या कारवाया डचांनीं केल्या. धर्मवेड्या मुस्लीम गटालाहि त्यांनीं चेतविलें होतें. शेवटीं भारत व ऑस्ट्रेलिया यांच्या सुरक्षा समितींतील दडपणामुळें डचांनीं माघार घेतल्यानें १ जानेवारी १९५० रोजीं स्वतंत्र इंडोनेशियन सरकार पूर्णपणीं सत्ताधिष्ठित झालें. त्यानंतरहि सहा महिने इंडोनेशियांत डच सैन्य होतें परंतु तें निरुपद्रवी राहिलें. मात्र डच ईस्ट इंडीजपैकीं न्यू गिनीचा पश्चिम भाग नवीन इंडोनेशियन प्रजासत्ताकच्या स्वाधीन करण्याचें डचांनीं नाका-रलें आणि गेलीं पांच वर्षे त्यासाठीं उभय राष्ट्रांच्या दरम्यान कागदी वाटा-घाटी अधूनमधून चालू आहेत.

१ जानेवारी १९५० रोजीं स्थापन करण्यांत आलेलें प्रजासत्ताक निरनिराळ्या बेटसमूहांचें बनविण्यांत आलेलें होतें. फुटीर प्रवृत्तीचें हें रोपटें डचांनीं अट्टाहासानें लावलें होतें; परंतु देशांतील डच सैन्य परत जातांच अध्यक्ष डॉ. सोकार्नो यांनीं १५ ऑगस्ट १९५० रोजीं निरनिराळ्या घटकांचे बनविण्यांत आलेलें राष्ट्र विसर्जन करून सर्व इंडोनेशियाचें मिळून एकसंध राष्ट्र स्थापन झाल्याचें जाहीर केलें. इंडोनेशियाच्या राष्ट्रध्वजाला द्विवर्णी म्हणतात. त्यांत पांढरा व तांबडा असे दोन पट्टे आहेत. हें निशाण चौदाव्या शतकापासून म्हणजे मज्जोपहित या हिंदुबौद्ध साम्राज्याच्या वेळेपासून चालत आलेलें आहे. इंडोनेशियाचें राजचिन्ह गरुडाचें आहे. हा गरुड पंखविस्फारित पक्षाच्या आकृतीचा दाखवितात.

इंडोनेशियाच्या राष्ट्रीय ब्रीदवाक्याला 'पंच शिला' म्हणजे राष्ट्रीय-त्वाचे पांच आधारस्तंभ म्हणतात. त्यांत पुढील तत्त्वें आहेत: (१) परमे-श्वरावर श्रद्धा, (२) लोकशाही, (३) राष्ट्रीयत्व, (४) न्यायनिष्ठ सामाजिक समता (५) विश्वबंधुत्व आणि सर्वांना सारखी संधि.

आंतरराष्ट्रीय जगांतील सोकार्नो

इंडोनेशियन जनतेला खरेंखुरें स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कांहीं महान् व्यक्ति पुढें आल्या. त्यांत भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरूंचा भाग फार मोठा होता. इंडोनेशियांतील स्वातंत्र्यवाद्यांविरुद्ध लढण्यासाठीं डच फौजा नेणाऱ्या विमानांना त्यांनीं भारतावरून उड्डाण करण्यास बंदी केल्यामुळें डचांना व त्यांच्या पाठीराख्यांना आपल्या भूमिकेचा फेरविचार करावा लागला. इंडोनेशियाचे उपाध्यक्ष डॉ. हाटा हे पंडितजींचे स्नेही. नेहरूंनीं इंडोनेशियाच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाच्या पुरस्कारार्थ १९४७ च्या २४ जुलैला पुढील घोषणा केली होती: " कोठल्याहि युरोपियन राष्ट्रानें आशियांतील राष्ट्रांविरुद्ध शस्त्र उपसलें तर यापुढें आशियांतील कोणतेंहि राष्ट्र तें सहन करणार नाहीं ! " या घोषणेस नेहरू-तत्त्व म्हणण्यापर्यंत मान्यता देण्यांत आली आहे. भारत सरकारनें इंग्लंड–अमेरिकेस डच–इंडोनेशियन भांडणांत मध्यस्थी करण्यास सांगून शिवाय स्वत: सुरक्षा समितीपुढें इंडोनेशियन स्वातंत्र्याचा प्रश्न धसास लावून तो शेवटास नेला. भारतानें जें साहाय्य केलें त्याबद्दल डॉ. सोकार्नोंना भारताविषयीं गाढ प्रेम वाटतें. इंडोनेशियन प्रजासत्ताकचे अध्यक्ष म्हणून सोकार्नो यांना १९५० सालीं नेहरूंनीं दिल्ली येथें बोलावून त्यांचा सत्कार केला होता. नेहरूहि स्वत: इंडोनेशियांत गेले त्या वेळीं इंडोनेशियन सरकार व जनता यांनीं त्यांचें भव्य स्वागत करून आपली कृतज्ञता प्रदर्शित केली.

डॉ. सोकार्नो यांनीं तरुणपणीं ज्या टोपणनांवानें लेख लिहिले त्या 'भीमा'सारखी त्यांची ताकद आहे.सातत्यानें कष्ट व हाल सोसल्याचा फारसा परिणाम त्यांच्या शरीरावर झालेला आढळत नाहीं. प्रत्येक देशभक्त नेत्याला परक्या राजवटीकडून तुरुंगवास-हद्दपारीचा प्रसाद घ्यावाच लागतो. सोकार्नोंनें तो पुष्कळच घेतला आहे. देशांतील विविध पक्ष व त्यांचे पुढारी यांच्याबरोबर प्रेमानें वागून देशहितार्थ त्यांचें आवश्यक तें सहकार्य सोकार्नो यांनीं वेळोवेळीं मिळविलें.

अनुक्रम

## डॉ. अबदुल रहमान सोकार्नो

इंडोनेशियाचे अध्यक्ष सोकार्नो यांचेपुढें दोनतीन महत्वाचे प्रश्न सध्या आ वासून उभे आहेत. त्या प्रश्नांची सोडवणूक ते कशी करतात यावर केवळ इंडोनेशियाचेंच भवितव्य अवलंबून नसून आग्नेय आशियांतील स्वास्थ्यहि बऱ्याच प्रमाणांत अवलंबून आहे.

बांडुंग येथें भरलेल्या आशिया–आफ्रिका परिषदेचे यजमान या नात्यानें इंडोनेशियानें आपण स्वतः रशिया किंवा अमेरिका यापैकीं कोणत्याच गटांत सहभागी होऊं इच्छित नाहीं, तटस्थ राहू इच्छितों हें दाखविलें आहे. पंडित नेहरूंच्या तटस्थतेला इंडोनेशियाचा पक्का पाठिंबा सतत मिळेल अशी खात्री वाटते. कोरिया–इंडोचायना प्रकरणांतील आपला हस्तक्षेप फुकट गेला असें वाटल्यामुळें निराश झालेल्या अमेरिकेनें आग्नेय आशियांतील थायलंडला हाताशीं धरून जी आग्नेय आशिया संरक्षण–योजना मॅनिला करारानें जन्मास घातली त्यांत भागीदारी नाकारून सोकार्नो यांनीं त्या कराराचा फोलपणा जगाला दाखवून दिला. इंडोनेशियाला भेडसावणारा एक महत्वाचा प्रश्न तेथील मुस्लीम गटांपैकीं 'दारुल इस्लाम' संघटनेच्या पुरस्कर्त्यांचा आहे. डच लष्करी अधिकारी कॅप्टन वेस्टर्लिंग्च्या पुरस्कारानें पेटलेल्या या मुस्लीम संघटनेची भूमिका इंडोनेशियांत मुसलमानी राज्याची प्रस्थापना करण्याची आहे. इंडोनेशियाचे ८ कोटी वस्तीपैकीं ९० टक्के वस्ती मुसलमानांची आहे. परंतु या मुस्लीमांची आजची संस्कृति कोणत्या तऱ्हेची आहे हें सुरुवातीस सांगितलें आहेच. नसलेलें धर्मवेड त्यांच्यांत घुसविण्याची योजना दारुल इस्लामनें भयंकर अत्याचारी धोरणानें आंखली आहे. डचांचें या अत्याचारांना बरेंच पाठबळ होतें म्हणून ती चळवळ पूर्वीं फोफावली. इंडोनेशियांतील राजकारणी पुढाऱ्यांमध्यें मुस्लीम बहुसंख्य असले तरी त्यांना केवळ मुसलमानी राजवट अंमलांत यावी असें वाटत नाहीं. इंडोनेशियाच्या राज्यांतील अल्पसंख्य हिंदु, चिनी, ख्रिस्ती यांची संख्या लहान असली तरी त्यांचें महत्त्व मोठें असल्यामुळें त्यांना दुखवून मुद्दाम मुस्लीम राज्य निर्माण करण्यास तरुण पिढीचे नेते फारसे तयार नाहींत. सोकार्नोसारख्या जुन्या पिढीच्या नेत्यांनीं यापूर्वीं कधींच कट्टर मुस्लीम प्रेमाचा आव आणला नव्हता. भारताच्या फाळणीनंतर

निर्माण झालेल्या पाकिस्ताननें मुस्लीम जगताचा केलेला हिरीरीचा पुरस्कार कांहीं कार्यकर्त्यांना आकर्षित करतो हें खरें; त्यामुळें डॉ. सोकार्नो यांना दारुल इस्लाम व त्याचे पुरस्कर्ते यांचा बंदोबस्त ठीकपणीं करावा लागेलच.

आणखी एक महत्त्वाचा प्रश्न सोकार्नो यांच्यापुढें आहे आणि तो म्हणजे कम्युनिस्टांचा. इंडोनेशियांत सध्यां तीस लक्ष चिनी लोक आहेत. त्यांच्याबाबत बांडुंग परिषदेस आलेले चीनचे पंतप्रधान चौ एन लाय यांच्याबरोबर वाटाघाटी करण्यांत आल्या व चिनी कम्युनिस्ट इंडोनेशियांत आक्रमक प्रवृत्तीनें वागणार नाहींत असें आश्वासनहि इंडोनेशियाला मिळालें आहे. इंडोनेशियांतील तेलखाणी, साखर कारखाने व इतर उद्योगधंदे यांची मोठ्या प्रमाणावर पुनर्रचना करण्यासाठीं इंडोनेशियाला बऱ्याच भांडवलाची गरज आहे. लहानमोठ्या सहा हजार बेटांचें बनलेलें इंडोनेशियाचें राज्य लष्करीदृष्ट्या अद्याप मजबूत नाहीं. राजधानीचे जकार्ता शहरांतहि फार कडक बंदोबस्त ठेऊन नागरिकांचें रक्षण करण्याची पाळी सरकारवर येते. सर्व बेटांतील बंडाळी मोडून काढून अंतर्गत सुरक्षितता निर्माण केल्याखेरीज आंतरराष्ट्रीय जगांत आपल्या राष्ट्राचें वजन वाढणार नाहीं याची जाणीव डॉ. सोकार्नो यांना आहे. त्यांचा कम्युनिस्टांकडे ओढा नसला तरी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांचा देशहितासाठीं उपयोग करून घेण्यास त्यांचा विरोध नाहीं.

ईस्ट इंडीज बेटांतील डचांचे राज्यांतील न्यू गिनी बेटाचा पश्चिम भाग डच सरकारनें इंडोनेशियाचे राज्यांत सामील करण्यास साफ नकार दिला. त्यामुळें इंडोनेशियाचे पूर्वेस असलेल्या पश्चिम न्यू गिनींतील डचांचे ताब्यांतील हा भाग नवोदित इंडोनेशियन राज्याचे छातीवर एक प्रकारची धोंड होऊन बसला आहे. पश्चिम न्यू गिनींत डचांची फारच थोडी वस्ती आहे. तेथे जंगली लोक अधिक आहेत. पश्चिम न्यू गिनीचा ताबा इंडोनेशियास मिळावा म्हणूनहि डॉ. सोकार्नो यांच्या सरकारास बरेच कष्ट करावें लागतील.

# ३ डॉ. हो चि मिन्ह

अणुबाँबचा रोकडा हिशोब

१९४५ च्या ऑगस्ट नऊचा तो दिवस. फ्रेंच इंडोचायनांतील जपानच्या ताब्यांतील हॅनोईनजीकच्या प्रचंड विमानतळावर हिंदी कैदी व स्थानिक र जंदारीचे अनामी स्त्री--पुरुष--मुलें मजूर जपानी सैनिकांचे देखरेखीखालीं लष्करी उपयोगाचीं अनेक कामें करीत होते. ( प्रस्तुत लेखक १९४२ च्या मे पासून हॅनोई येथील विमानतळावर असलेल्या हिंदी लष्करी कैद्यांतील एक अधिकारी होता. ) जपानांतील हिरोशिमा गांवावरील अमेरिकेच्या अणुबाँबहल्ल्याची बातमी हॅनोईच्या वृत्तपत्रांत ८ तारखेलाच आली होती. आम्हांसहि अनाम कामगार व जपानी सैनिक यांच्याकडून समजलें होतें कीं एका अणुबाँबमुळें हिरोशिमांतील एक लक्ष लोक ठार झाले होते. सकाळीं दोन तास काम झाल्यावर नित्याप्रमाणें थोडा वेळ सुट्टी झाली. तेव्हां एक ९-१० 



वर्षाचा अनाम मुलगा घाईघाईनें मजकडे आला. तो माझ्याबरोबर बरेच महिने काम करीत असे.

जपानी भाषेंत त्यानें मला मोठ्या उत्साहानें सांगितलें, " आतां आम्ही निश्चितपणें लवकरच स्वतंत्र होणार आहोंत ! "

इंडोचायनांतील खेडोपाड्यांत स्वातंत्र्यवाद्यांची मोठी जोराची संघटना चालू असल्याचें आम्ही १९४३ पासून पाहत होतों. या संघटनेंतील अनेक पदवीधर स्त्रीपुरुष कार्यकर्ते विमानतळावर काम करणाऱ्या हजारों अनाम कामगारांबरोबर कामाला येत आणि आपल्या कमाईच्या पैशातून जपान्यांनीं सवलतीच्या दरानें विकलेला तांदूळ घेऊन दररोज निरनिराळ्या खेड्यांत जाऊन शिजवीत. त्या खेड्यांतील लोकांना आठवड्यांतून एक दिवस तरी चार घांस भात मिळेल अशा रीतीनें त्याचें वांटप करीत असत.

मी त्या मुलास विचारलें, "आज नवीन असा काय शोध तुला लागला आहे? सध्यां फ्रेंचांचाहि सर्व कारभार संपला आहे. जपानी हेच तर येथें सर्वसत्ताधीश आहेत. तुला माहीत आहेच कीं अमेरिकेनें आतां लाख लोक ठार करणारा बाँब शोधला आहे. मग तुझ्या देशाच्या स्वातंत्र्यकमाईची गोष्ट नक्की म्हणून कशी म्हणतोस ?"

त्यावर तत्परतेनें त्यानें उत्तर केलें कीं "अहो! म्हणूनच तर मी म्हणतों कीं आतां आम्ही निश्चित स्वतंत्र होणार म्हणून!"

"तुझा हिशोब जरा समजून सांगशील?" मी म्हटलें.

"हो. त्यांत काय आहे ? सर्व देशांतील प्रमुख संहारक शक्ति अमेरिकेपाशीं अणुबाँबचे रूपानें आहे. असे किती अणुबाँब अमेरिकेपाशीं तयार असतील असें तुम्हांला वाटतें ?"

त्याचा तो प्रश्न नीट समजला नाहीं तरी मी त्यांस म्हटलें, "असतील आणखी दोन-चार बाँब अमेरिकेजवळ !"

तो उत्तरला: "तुम्ही दोन-चार म्हणता, तर मी समजून चालतों कीं असतील आणखी दहा अणुबाँब तयार. पण अमेरिकेनें सारे अणुबाँब अनामचे प्रदेशांत वापरले तरी जपानांतील हिशोबाप्रमाणें त्यामुळें दहा लक्ष अनाम लोक ठार होतील ! आमची लोकसंख्या दीड कोटी म्हणजे दीडशें लक्ष असल्यामुळें त्यांतील दहा लक्ष मेल्यानें आम्ही नष्ट होणार नाहीं. उलट उरलेले १४० लक्ष अनाम लोक एकजुटीनें फ्रेंच, जपानी, चिनी यांचे-

बरोबरच अणुबाँबवाल्या अमेरिकेलाहि पॅसिफिक महासागरांत ढकलून देऊं शकतील. मग आम्ही निश्चितपणें स्वतंत्र होऊं कीं नाहीं ?" अनाममधील त्या लहानग्याचा हा व्यवहारी हिशोब मला बराच वेळ नीट समजला नाहीं. पण जेव्हां तो समजला तेव्हां स्वातंत्र्यवाद्यांच्या चळवळीचें लोण समाजाच्या कोणत्या थरापर्यंत जाऊन पोचलें आहे आणि साऱ्या जगाचा थरकांप उडविणाऱ्या अणुशक्तिसंपन्न अमेरिकेचेंहि भय आपण बाळगण्याची कशी जरूरी नाहीं याबद्दलचा भाबडाच परंतु मनास पटणारा हिशोब करून साऱ्या देशाची-जनतेची-एकता तिच्या लहानग्या घटकांतहि कशी भिनलेली आहे याचें साक्षात् दर्शन त्या मुलाच्या निवेदनानें मला होऊं शकलें.

## बछडींच सूड घेतील !

अनाममधील शहरांतील व खेड्यांतील जनतेंत भूमिगत कार्यकर्त्यांनीं स्वातंत्र्याकांक्षेचें वारें कसें भिनविलें होतें याचा अनुभव त्यापूर्वींहि मला व आमच्या बरोबरच्या हिंदी कैद्यांना अनेकवार आला होता. विमानतळा-नजीकच्या हॅनोईच्या ज्यालम् या उपनगराचें रेल्वेस्टेशन उध्वस्त करण्या-साठीं अमेरिकन वैमानिकांनीं एक दिवस सायंकाळीं कमालीची बाँबवृष्टि केली. या हल्ल्यांत जवळजवळ ६०० अनाम हमाल त्या स्टेशनांत ठार झाले. कांहीं जपानी व फ्रेंचहि मेले. दुसऱ्या दिवशीं पुनश्च पंधरावीस बाँब-फेकी मोठालीं विमानें व जवळजवळ शंभर लहान लढाऊ विमानें मशीन-गनच्या गोळ्यांचा पाऊस पाडीतच स्टेशनाभोवतींच्या शेतांवरून वेगानें घिरट्या घालूं लागलीं. मोठीं विमानें स्टेशनचा विध्वंस करीत असतां लढाऊ विमानें चौफेर आग ओकीत होतीं. त्या वेळीं मी एका लहान गांवानजी-कच्या बांबूचे बनापाशींचे खड्ड्यांत जीव वांचविण्यासाठीं बसलों होतों. वर निवाऱ्यासाठीं कांहींच नव्हतें. आमच्या डोक्यावरून अमेरिकन लढाऊ विमानें सतत गोळ्या झाडीत दोन तास गरागरा फिरत होतीं. हें चालू असतांच नजीकचे गांवांतील अनेक स्त्रिया अंगावर दूध पिणाऱ्या मुलांसह गांवच्या बाहेर आल्या. त्यांचीं लहानमोठीं अनेक मुलेंहि आलीं व तीं आकाशाकडे बोटें करून किती लढाऊ विमानें गरगर मृत्युपाश फेकीत आहेत तीं मोजूं लागलीं. मी त्या स्त्रियांना बांबूच्या आडोशाआड जाण्यास

विनविलें असतां त्यांतील एका बाईनें मला समजावून दिलें कीं आतां जपान्यांना हटविण्यासाठीं अमेरिकन हे हल्ले चढवीत आहेत; असले हल्ले जीवघेणी आहेत हें आम्हांस समजतें. परंतु आमच्या मायभूचें संरक्षण करण्याची जबाबदारी माझ्या आसपास असणाऱ्या या छोट्यामोठ्यांचीच आहे. आपल्या देशाचा विध्वंस करणाऱ्या जपान-अमेरिकेचें हें भीषण कृत्य त्यांना पाहूं द्या. तें पाहतांना यांतील कोणी मेलें तरी पर्वा नाहीं. या सर्वांचा सूड हींच बच्छडीं घेतल्याशिवाय राहणार नाहींत, मात्र तो कसा घ्यावयाचा तें आतां पाहण्यासाठींच आम्ही उघड्या मैदानावर उभें आहोंत !

अनाम मातेच्या त्या लोकविलक्षण निवेदनानें मला तेव्हां आश्चर्याचा धक्का बसला. साक्षात् मृत्यूचें दर्शन घेण्यास अनामांतील महिला आपल्या बालकांसह तयार होण्याइतकी खोल जाणारी जागृति करणारे ते कार्यकर्ते धन्य होत असा विचार मनांत आला आणि त्या वेळीं हिंदुस्थानांतील कार्यकर्त्यांच्या कामाची आठवण झाल्याशिवाय राहिली नाहीं.

अनामच्या ग्रामीण व शहरी जनतेंतील स्त्रीपुरुषमुलांमध्यें साऱ्या परक्यांविरुद्ध द्वेषाची व मायभूच्या स्वातंत्र्यासाठीं सर्वस्वाचा होम करण्याची शिकवण भूमिगत कार्यकर्ते दुसऱ्या महायुद्धकालांत सतत देत होते. त्यांचा एक प्रमुख नेता म्हणजेच डॉ. हो चि मिन्ह हा होय.

## पंधरा वर्षांच्या त्यागाचें फळ काय दिसलें ?

१९४० पासून अनाम ( उत्तर इंडोचायना ) प्रांतांतील भूमिगत कार्यकर्त्यांनीं जनतेंत जी स्वातंत्र्याकांक्षा रुजविली तिच्या जोरावर फ्रेंच, जपानी आणि युद्ध संपल्यानंतर गेलीं ९ वर्षें फ्रेंच व अमेरिकन या साऱ्यांना पुरून उरल्यानंतर हो चि मिन्हनें जीनिव्हा परिपदेनुसार जें स्वातंत्र्य देशाला मिळवून दिलें त्याचा प्रत्यक्षांतील देखावा (हो चि मिन्हनें हॅनोई शहरांत प्रवेश केल्यानंतरचा) एका तटस्थ निरीक्षकानें वर्णन केला आहे. त्यावरून इंडोचायनांतील स्वातंत्र्यलढ्याचें काम व त्याची फलप्राप्ति कोणती याचा कांहींसा अंदाज बांधता येईल.

निरीक्षक म्हणतो कीं जीनिव्हा परिषदेंत ठरल्याप्रमाणें उत्तर इंडो-चायनांतून फ्रेंचांनीं माघार घेतली. त्या वेळीं हो चि मिन्हच्या सैनिकांनीं हॅनोई शहरांत प्रवेश केला. शहरांतील सर्व घरांवर, बंगल्यांवर स्वातंत्र्य-ध्वज फडकविण्यांत आले. मौ त्से तुंग, मालेन्कोव्ह व हो चि मिन्ह यांचीं मोठालीं चित्रें ठिकठिकाणीं फडकविण्यांत आलीं होतीं. एक फर्मान काढून हो चि मिन्हनें शहरांतील वेश्याव्यवसाय आणि भीक मागणें व जुगारीचे अड्डे बंद केले.श्रीमंत व गरीब या दोघांची लूटमार करणारे व अनीतीचे अड्डे बन-लेले रात्रींचे क्लबहि बंद झाले. रोज रात्रीं ८ ते १० सार्वजनिक जागीं व्हिट-मिन्ह सैनिकांचे देखरेखीखालीं जनतेसाठीं नाच-गाण्याचे जाहीर कार्यक्रम केले जाऊं लागले. आठवडयांतून दोन दिवस हॅनोई नॅशनल थिएटरमध्येहि काव्यगायन होऊं लागलें.

पूर्वीं व्हिटमिन्हांचे गोटांत असलेला परंतु आतां त्यांच्या विरोधी अशा फ्रेंच गोटात गेलेल्या एका अधिकाऱ्यानें व्हिटमिन्हांच्या कारभाराविषयीं म्हटलें आहे कीं " व्हिटमिन्हांची कारकीर्द कांहीं निराळ्या अनपेक्षित पद्धतीचीच चालू झाली. ते स्त्रियांवर अत्याचार करीत नाहींत. ते रयतेकडून कांहींच हिसकावून घेत नाहींत. त्यांनीं आज केवळ कपभर पाणी उसनें मागून नेलें तर तें दुसऱ्या दिवशीं परत करतील. पण ते सारखे सर्वकाळ तुमच्यावर पहारा करतील.तुम्ही काय करता, काय खाता, तुमच्या जेवणांत रोज भाज्या किती, धान्य किती, मांसमांसे किती असतात, तुम्हाला नोकर किती लागतात या सर्व गोष्टींवर त्यांची कडक नजर आहे.तुमच्या चुका होत असतील, तुमच्या जीवनांत भडकपणा येत असेल तर ते दुरुस्ती सुचवितील. तुम्ही साधे कपडे घालावे व सर्वांनीं काम करावें याविषयीं ते सुचवितील. पण त्याची सक्ती कर-णार नाहींत. देशहिताचे कामासाठीं तुम्ही उत्साह दाखविला नाहीं तर तुम्हांस त्याविषयीं प्रत्यक्ष न बोलतां तुमच्या गांवांतील इतरांपाशीं तुमच्या प्रवृत्ती-विषयीं गुणगुणतील कीं, तुम्हांस एकटयालाच श्रीमंती चाळे सुचले आहेत. तुमच्या कृत्याची गांवांतील चावडीवर, पाणवठयावर चर्चा होऊं लागेल. त्यामुळें तुमचे शेजारीपाजारीहि तुमच्यावर बहिष्कार टाकतील. येवढयानें तुमची प्रवृत्ति सुधारली नाहीं असें जर त्यांना वाटलें तर गांवकऱ्यांकडून

तुमच्या नांवानें इतकें काम तुमच्यावर लादतील कीं तुम्हांस तें कधींच पुरें करतां येऊ नये आणि या सगळ्या तंत्रांत कम्युनिस्ट कार्यकर्ते केव्हांहि पुढें येणार नाहींत. सारा कारभार गांवकऱ्यांकडूनच गांवाचे हितासाठीं म्हणून करविला जाईल."

व्हिटमिन्हांचा विजय झाल्यामुळें ते आतां कमालीचे क्रूर अत्याचार करून विरोधकांचा आणि गेल्या दहा वर्षांत जे तटस्थ राहिले त्यांचा सूड घेतील अशी सर्वसामान्य लोकांची अपेक्षा होती. परंतु प्रत्यक्षांत निराळेंच घडलें. त्यांनीं समाजाचें सतत शोषण करणाऱ्यांच्या घातकी उद्योगांना प्रथम पायबंद घातला. लोकांनीं नीतिमत्तेनें कसें वागावें याविषयींचीं हो चि मिन्हचीं फर्मानें त्याच्या शिपायांनीं नागरिकांना पोंचविलीं. कम्युनिझम, वर्गयुद्ध याची अंधुक भापाहि कोणी काढली नाहीं. साक्षात् गांधीयुगच हॅनोईंत व आसपास अवतरलें असल्याची रयतेची खात्री होईल असें वर्तन हो च्या सैनिकांनीं केलें. हॅनोई शहरांतून हिंडतांना हो चि मिन्ह ताशीं साठ मैल वेगानें जाणाऱ्या बंद मोटारींतून जातो हें खरें; परंतु कोणत्याहि वस्तींत तो केव्हां आपल्या साध्या कपड्यांत अवतरेल याचा मुळींच नेम नाहीं याची खात्री जनतेला व त्याच्या सैनिकांना अनुभवानें पटल्यामुळें जनतेची दानत सुधारण्यासाठीं त्यानें जारी केलेले सर्व हुकूम व कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठीं त्याचे सैनिक झटूं लागले.

हो चि मिन्हच्या शेतकरी सैनिकांनीं रणांगणांवर लढतांना असीम शौर्य प्रगट केलें. परंतु युद्ध संपवून ते जेव्हां उत्तर व्हिएटनाममध्यें सर्वत्र विखुरले तेव्हां स्थानिक गडबड व गोंधळ नष्ट करून सुव्यवस्था निर्माण करण्याचे कामीं त्यांनीं कमालीचा आत्मसंयम व विवेक दाखविला. कम्युनिस्ट व्हिटमिन्हांची राजवट आतां सुरू होणार म्हणून फ्रेंच प्रचारानें घाबरून सैरावैरा धांवणाऱ्या व दक्षिणेची वाट धरणाऱ्या नागरिकांना अडवून व्हिटमिन्ह सैनिकांनीं त्यांचेवर गोळ्या झाडल्या नाहींत. उलट या घाबरलेल्या नागरिकांमध्यें सुजाणपणें जाऊन त्यांना निर्भयता प्राप्त करून देण्यासाठीं व त्यांची समजूत घालून त्यांनीं उत्तर भाग सोडून जाऊं नये याविषयीं विनवणीच केली. या अनपेक्षित वागणुकीचा पुष्कळ नाग-

रिकांवर चांगला परिणाम झाला आणि ही मंडळी मोठ्या प्रमाणांत परत आपल्या पूर्वापार आलेल्या घरादारांकडे माघारी फिरली.

दक्षिण व्हिएटनामकडे धांव घेणाऱ्या कांहीं नागरिकांनीं त्यांची समजूत घालणाऱ्या दहापांच व्हिटमिन्ह सैनिकांवर अत्याचार केले तरीहि शेंकडों नागरिकांची सहानुभूति मिळविण्यासाठीं हो चि मिन्हनें त्या अत्याचारांकडे तात्पुरतें दुर्लक्षहि केलें. " शत्रूचे जे हेर असतील त्यांचा पत्ता जरूर काढा; परंतु ह्या कामासाठीं सर्वसामान्य जनतेचा केव्हांहि छळ होता कामा नये " अशी सक्त आज्ञा हो चि मिन्हनें आपल्या सैनिकांना दिलेली असून तिची अंमलबजावणी यथायोग्य रीतीनें केली जाते कीं नाहीं याकडे त्यानें जातीनें लक्ष पुरविलें. हो चि मिन्हनें तयार केलेल्या युवकदलांतील मुलें ग्रामीण भागांत संचार करून नागरिकांना सांगू लागलीं कीं आपल्या मातृभूमीवर अत्याचार करणारे दुष्मन आता सीमापार हाकलून देण्यांत आले आहेत. आतां भिण्याची, दुःख करण्याची काडीमात्र जरूर नाहीं. आपण आतां स्वतंत्र झालों असून सहकार्यानें आपली व आपल्या राष्ट्राची प्रगति करण्यासाठीं आपण सर्वांनीं हंसतखेळत आतां काम–कष्ट करावयाचे आहेत.

## हो चि मिन्हचें व्यक्तिमत्व

जवळजवळ चौदा वर्षें चाललेल्या स्वाऱ्या–लढाया, यादवी युद्ध यांनीं इंडोचायनांतील जनता त्रासून गेलेली होती. १९४० सालीं जपानी स्वारी आल्यानंतर सतत या प्रदेशांत फ्रेंच, जपानी व नंतर अमेरिकन पुन्हां फ्रेंच–अमेरिकन अशा सैनिकांच्या ल्रढाया, बाँबफेक, गोळीबार आणि त्या साऱ्यांच्या जोडीला स्थानिक सरदार-सैनिकी अधिकाऱ्यांचा सासुरवास; यामुळें बहुतेक नागरिकांत ' नको हें जीवन ' अशी भावना निर्माण झाली होती. सर्व संकटांना तोंड देऊन निर्लोभी वृत्तीनें देशसेवेसाठीं व देश स्वतंत्र करण्यासाठीं शक्ति खर्च करणारीं शेकडों माणसें हो चि मिन्हनें आपल्या मायभूमीच्या कुशींतच रात्रंदिवस कष्ट करून जागोजाग जिवंत केलीं होतीं. मातृभूमीचे हे निःसीम सेवक हो च्या सुजाणपणाचा

डंका आपल्या कृतीनें देशभर पसरवीत आहेत. स्वत: हो चि मिन्ह अगदीं निर्विकार वृत्तीनें अखंड काम करीत असल्यामुळें सर्वसामान्य जनतेचा त्याच्यावर गाढ विश्वास बसला आहे. त्यानें एकदां पत्रप्रतिनिधींशीं बोलतांना सांगितलें कीं, ' आतां माझा देश हाच माझा सर्व संसार आहे. त्याला स्वतंत्र, वैभवशाली करणें हीच माझ्या जीवनाची इतिकर्तव्यता आहे. '

हो चि मिन्हनें आपली सारी हयात देशासाठीं खर्ची घातली असल्यामुळेंच व्हिटमिन्ह प्रदेशांतील लहान मुलांच्या गीतांपासून मोठ्यांच्या पोवाड्यांपर्यंत त्याच्याच चरित्राचें गुणगान करण्यांत येत असतें. हॅनोई-सारख्या मोठ्या शहरांत किंवा त्याच्या उपनगरांतच हो च्या यशाचें गुणगान थांबलें नाहीं. डोंगरकपारीस असलेल्या खेड्यांत व घनदाट जंगलांतील वस्त्यांमध्यें हो च्या देशप्रेमाची साक्ष सर्वसामान्य माणसाला स्वानुभवानें पटलेली आहे. त्याचा शांत, सभ्य स्वभाव. लीन प्रवृत्ति, साधी राहणी व सदा देशकल्याणाचें चिंतन यामुळें त्याच्या जीवनाच्या कम्युनिझमचे तत्वज्ञानाकडे लोक आकर्षितच होतात असा त्याच्या विरोधकांचा अनुभव आहे. त्यानें आतांपर्यंत क्रूर कृत्यें अगर मोठ्या प्रमाणांत हत्या केली नाहीं असें नाहीं. परंतु त्या सर्वांत त्याचा वैयक्तिक स्वार्थ यत्किंचितहि नव्हता, देशहितरक्षणार्थच त्यानें तीं कृत्यें केलीं अशी लोकांची, बरीवाईट कां असेना पण, श्रद्धा बनलेली आहे हें खास. हो चे सारे सहकारी व सैनिक सर्वसामान्य जनतेला सार्वजनिक हितासाठीं पूर्वीचे मानानें अधिक त्याग, अधिक कष्ट करण्यासहि भाग पाडीत आहेत, परंतु तें सर्व समाजाच्या-देशाच्या हितासाठींच आहे अशी भावना, ते जी पद्धति वापरीत आहेत, त्यामुळें सगळ्यांची झाली आहे. उध्वस्त नैतिक जीवनाची पुन्हां प्रतिष्टापना करण्यांत हो बऱ्याच अंशीं यशस्वी झाल्यामुळें त्याच्या कृत्यास लोक माना डोलवितात.

## देशप्रेम, कष्ट, साहसांनीं भरलेलें जीवन

हो चि मिन्हचें सारें जीवन देशप्रेम, कष्ट व साहस यांनीं कसें भरून गेलें आहे याची कल्पना त्याच्या पूर्वजीवनाकडे पाहिलें असतां नजरेस

येते. त्याचें खरें नांव हो चि मिन्ह नाहीं. हें नांव त्यानें दुसऱ्या महायुद्ध-काळीं काम करण्यास सुरुवात केली त्या वेळीं घेतलें. त्याचें मूळचें नांव न्गूयेन तात थान्ह असें आहे. त्याचा जन्म केव्हां झाला याविषयीं आतां त्याचे सहकारी सांगतात कीं अनाममधील किमलीन गांवच्या न्गुयन सिन या नांवाच्या शेतकऱ्याचे पोटीं १५ जुलै १८९२ रोजीं हो चा जन्म झाला. त्याचे वडील वृत्तीनें धार्मिक व सदाचारसंपन्न होते. त्यांनीं कन्फ्यूशिअसच्या धर्मग्रंथांचें चांगलें अध्ययन केलें होतें. शेतीचे कामहि ते करीत परंतु परक्या फ्रेंच राजवटीविरुद्ध उठावणी करणाऱ्यांशीं हो चे वडील नेहमीं संबंधित असत. अनाममध्यें क्रांतिकारकांच्या बैठकी वारंवार निरनिराळ्या जागीं भरत असत. त्यांचे निरोप पोंचविण्याचें काम हो करीत असे. हो आपल्या बापाचा तिसरा मुलगा. त्याचें पाळण्यांतलें नांव 'यशवंत' या अर्थाचें ठेवलें होतें. इंडोचायनांतील फ्रेंच सत्ताधाऱ्यांविरुद्ध उठावणी करणाऱ्या क्रांतिकारकांनीं आपल्यापैकीं कांहींना परराष्ट्रांत धाडून त्यांच्याकरवीं साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न चालविला होता.

वडिलांना अटक होतांच होनें फ्रान्सला जाणाऱ्या 'द ऑर्नगाँ' बोटीवर केबिनबॉयची नोकरी धरली व तो १९११ फ्रान्सला पोंचला. त्या वेळीं त्याच्या खिशांत पुरे दहा फ्रँकहि नव्हते. त्यानें ठिकठिकाणीं नोकऱ्या करून उपजीविका चालविली. परंतु तो केवळ पोट भरण्यासाठीं स्वदेश सोडून परागंदा झालेला नव्हता. इंडोचायनांतील फ्रेंच अधिकाऱ्यांपेक्षां त्याला फ्रान्समधील फ्रेंचांची वागणूक अगदीं निराळी वाटली. फ्रेंचांच्या आफ्रिकेंतील मुलुखांतहि तो जाऊन आला. तेव्हां त्यास समजलें कीं जे फ्रेंच लोक स्वदेशांत सभ्यतेनें वागतात ते वसाहतींत गेले कीं साक्षात् सैतान बनतात आणि दंडुक्यांच्या व जुलमाच्या जोरावर आपल्या ताब्यांतील दीन प्रजेला पिरगाळून काढीत असतात. फ्रान्समध्यें हाव्र येथें त्यानें बगीच्यांत नोकरी केली. त्यानंतर त्यानें पॅरीसमध्यें एका फोटोग्राफरचे हाताखालीं काम केलें. रस्त्यांत उभे राहून फोटो विकण्याचें कामहि तो करी. हॉटेलांत स्वयंपाक्याचें, वाढप्याचें अशी विविध काम त्यानें केलीं. एकीकडे नोकऱ्या करून पोट भरण्याचा उद्योग चालू असतांच त्याचा विविध विषयांचा अभ्यास चालू होता.

पॅरिस येथें त्यानें फ्रेंच वाङ्मय व तत्वज्ञान यांचा चांगला अभ्यास केला. साम्यवादी लेखकांचीं पुस्तकें त्यानें अभ्यासिलीं. त्यानें फ्रेंच समाजवादी पक्षाचें सभासदत्व पत्करलें. त्या पक्षांत त्याचा आल्फ्रेड रोसमर, बोरिस सोव्हेरिन, जीन लॉरीऑत यांच्याशीं चांगला परिचय झाला. तो अधूनमधून भाषणें करीत असे. नैतिकदृष्टचा उच्च दर्जाची राहणी त्याच्या अंगवळणीं बालपणापासूनच इतकी बसली होती कीं त्याच्या बोटीवर मार्सेल्स येथें फ्रेंच वेश्या आलेल्या पाहताच तो संतापाने म्हणाला होता कीं " या फ्रेंच लोकांनीं आम्हांला सुधारण्याच्या गप्पा मारण्याऐवजीं आपलीं घरें अगोदर सुधारावींत "

१९१४ सालीं हो लंडनला गेला व तेथें त्यानें 'दि ओव्हरसीज वर्कर्स' या गुप्त संघटनेंत आपलें नांव नोंदलें. बर्फ उकरणें, भट्टींत कोळसे भरणें, हॉटेलांत फरशी धुणें अशीं निरनिराळीं कामें त्यानें केलीं. लंडन येथील कार्लटन रेस्टॉरंटचा मालक हो वर निहायत खूष झाला व त्यानें हो ला कामगार–क्रांतिकारक संघटना सोडून सुखानें नोकरी करण्यास सूचवूनहि पाहिलें. लंडन येथील क्रांतिकारकांच्या संघटनेचा अनुभव घेऊन हो परत फ्रान्सला परतला. इंडोचायनांतून परदेशी गेलेल्या क्रांतिकारकांची एकजूट निर्माण करण्यासाठीं त्यानें बरेच प्रयत्न केले. मातृभूमीला फ्रेंचांच्या जोखडाखालून कसें मुक्त करता येईल हाच एक ध्यास त्यास लागला होता. दिवसा कष्ट करावे व रात्रीं विद्वान–कलावंतांच्या क्लबांत जाऊन चर्चा-विनोद करावा हा त्याचा उद्योग होता. खगोलशास्त्र व हिप्नॉटिझम या विषयांतहि त्यानें वादविवाद केले. पुढें पुढें साऱ्या चर्चेचा विषय इंडोचायनाचे स्वातंत्र्यसंपादनापर्यंत आणण्याची त्याला संवयच झाली. फरान्समध्यें असलेल्या सुमारें एक लक्ष व्हिएटनामी नागरिकांची संघटना करून त्यानें इंडोचायनाच्या स्वातंत्र्याची एक योजना तयार केली व पहिल्या महायुद्धाचे अखेरीस पॅरिसनजीक व्हर्सायिचे राजवाड्यांत युद्धतहाकरितां आलेले अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांना हा खलिता सादर केला. विल्सननें त्याचा चांगला विचार केला. परंतु तहासाठीं जमलेल्या इतर राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं इंडोचायनाचे प्रश्नास स्पर्श करण्याचे नाकारल्यामुळें तडजोडीचे वाटाघाटीनें स्वातंत्र्य

मिळविण्याचा हो चा हा प्रयत्न फुकट गेला. त्यानें आपलें मागणीपत्र प्रसिद्ध केलें व त्याच्या समर्थनार्थ वृत्तपत्रांत खूप लेखहि लिहिले.

## कम्युनिस्ट कार्यकर्त्यांच्या सहवासांत

१९२० सालीं तुअर्स येथें भरलेल्या सोशालिस्ट काँग्रेसच्या थर्ड कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे बैठकीस तो हजर राहिला. त्यानंतर त्याचा अनेक आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट कार्यकर्त्यांशीं संबंध येऊं लागला. त्यांचा स्थानिक कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या मास्को गटाशीं धोरण-नियंत्रणाबाबत सतत वाद चाले. होनें हें सर्व पाहिलें पण तो दोघांपैकीं कोणत्याच गटांत गेला नाहीं. स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं कोठून साहाय्य घ्यावें याकडे त्याचें लक्ष होतें. १९२२ सालीं मॉस्को येथें भरलेल्या कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या चौथ्या काँग्रेसला तो हजर राहिला. त्या ठिकाणीं आग्नेय आशियांत कम्युनिस्ट संघटना करण्यासाठीं नेमण्यांत आलेल्या मंडळावर त्याची नेमणूक झाली. या जागेवर असतांना त्याला फरेंच कम्युनिस्ट पक्षाच्या अल्जीरियन व इंडोचायनाचे गटाशीं सहकार्य ठेवावें लागलें. १९२५ सालीं त्यानें अल्जीरियांतील कम्युनिस्ट कार्यकर्ता मेसाली हादज याच्या मदतीनें ल पारिआ नांवाचें वसाहतीविरोधी मासिक सुरू केलें. अल्जीरिया, मोरोक्को व इंडोचायना या तीन ठिकाणच्या फरेंच साम्राज्यवाद्यांच्या कृत्यांविरुद्ध व धोरणाविरुद्ध या नियतकालिकांतील लेखांत कडक टीका करण्यांत येऊं लागली. या मासिकांत हो नें 'न्गुयेन ओ-फाप' या टोपणनांवानें एक लेख लिहिला. या नावाचा अर्थ 'फ्रान्सचा द्वेष करणारा शेतकरी' असा होता. फरेंच कम्युनिस्ट कार्यकर्ता दोरिओत यांस हें टोपणनांव आवडलें नाहीं. तेव्हां होनें 'न्गूयेन आइ-क्वॉक' या टोपणनांवानें लिहिण्यास सुरुवात केली.

१९२२ च्या सुमारास होनें फरेंच कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांपुढें आपली इंडोचायनाचे स्वातंत्र्यलढ्याची कल्पना मांडली होती. त्याचा असा विश्वास होता कीं, इंडोचायनाचें राष्ट्रीय स्वातंत्र्य प्रस्थापित करून तेथें लोकशाही राजवट प्रस्थापित करण्यासाठीं प्रथम तेथील फरेंच वसाहतवादाला--फरेंच अधिसत्तेला मूठमाती द्यावयाची आणि त्यानंतर

राष्ट्रवादाविरुद्ध दुसरी क्रांति करून तेथें संपूर्ण समाजवादी राष्ट्र निर्माण करावयाचें. या धोरणामुळेंच १९३० सालीं फ्रेंचविरोधी जो उठाव राष्ट्र-वाद्यांनीं इंडोचायनांत केला तेव्हां हो अगदीं तटस्थ राहिला आणि फ्रेंच जुलमाखाली राष्ट्रवादी त्या वेळीं चांगलेच भरडून निघाले.

रशियास गेल्यानंतर त्यानें मॉस्को येथें दोन वर्षें राहून रशियन भाषेचा व कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा चांगला अभ्यास केला. चीनच्या चौ एन लाय प्रमाणें हो यानें कम्युनिस्ट क्रांतिकारकांचें जीवन अभ्यासिलें. थर्ड इंटरनॅश-नलच्या अध्यक्षाशींहि होनें वाटाघाटीं केल्या. पूर्वेकडील कामकऱ्यांची संघटना तयार करण्याची रशियन योजना त्यानें उचलून धरली. त्याच्याविषयीं एका अमेरिकनानें या वेळीं म्हटलें कीं हो नें फ्रेंच, जर्मन व रशियन तत्त्व-ज्ञानांचा अभ्यास केल्यानंतर आपलें ध्येय कम्युनिझमचा पुरस्कार हेंच ठरविलें आणि तें सिद्ध करण्यासाठीं आपल्या पुढील आयुष्यांत असीम कष्ट करण्याचाच निश्चय केला.

चीनमधील कुओमिटांग पक्षाचा रशियन सल्लागार बोरोडिन यानें हो यांस आपल्याबरोबर चीनला नेलें. तेथें असतांना डॉ. सन्यत्सेन व चियांग कै शेक आणि मॉस्को सरकार यांच्या संबंधांचें स्वरूप त्याला जवळून पाहता आलें. चीन व रशियन सरकारांचें वितुष्ट कसें विकोपास गेलें हें त्यानें चांगलें अभ्यासिलें. त्यानंतर हो मॉस्कोला गेला. मॉस्कोतील रशियन पुढा-ऱ्यांच्या आपसांतील स्पर्धेत तो कोणत्याच गटांत सामील झाला नाहीं. त्यामुळ त्याला झिनोवीव्ह, बुखारिन, राडेक, ट्रॉटस्की व शेवटी स्टालिन या सर्व रशियन नेत्यांबरोबर चांगले संबंध टिकविता आले. चीनमध्यें असतांना हो चे मनावर डॉ. सन्यत्सेन यांच्या वागणुकीचा फार मोठा परिणाम झाला. तो आजहि बराचसा टिकून आहे. हो नें सन्यत्सेनच्या ग्रंथांचें व्हिएटनामी भाषेंत भाषांतरहि केलें आहे.

चिनी कम्युनिस्टांची चियांग कै शेकनें कत्तल केल्यामुळें चीनमधील कम्युनिस्टांचे प्रचारास पायबंद बसला. तेव्हां हो नें आग्नेय आशियांतील बँकॉक, रंगून, सिंगापूर, सायगांव या ठिकाणीं भूमिगत राहून इंडोचाय-

न्यांतील कम्युनिस्टांची संघटना नव्यानें सुरू केली. त्यानें आपल्या पक्षाचें नांव डाँग डूआँग–काँग-सान-डांग असें ठेवलें. फ्रेंच कम्युनिस्ट पक्षापासून ही शाखा त्यानें स्वतंत्र व स्वायत्त ठेविली. १९३१ सालीं तो हाँगकाँगला आला असता पोलिसांच्या हातीं सांपडला. या वेळीं त्याला पकडून देणारास फ्रेंच सरकारनें पन्नास हजार पियास्तर इनाम देऊं केलें होते. तेव्हां हाँगकाँगमधून हद्दपार होतांच तो भूमिगत झाला. त्यानंतर त्यानें अमेरिका-मार्गे फरान्स गांठून तेथून तो मॉस्कोस गेला.

१९३१ सालीं जपाननें मांचुरियावर स्वारी केल्यानंतर अमेरिकेनें चीनमधील जपानविरोधी चिन्यांबरोबर सहकार्य करण्याची तयारी दाखविली. चीनचे मोठ्या भागावर सत्ता चालविणाऱ्या चीनच्या मार्शल चियांग कै शेकला कम्युनिस्टांशीं सहकार्य मुळींच नको होतें. चिनी कम्युनिस्टांना ठेचण्यासाठीं त्यानें अनेक मोहीमा केल्या होत्या, परंतु पुढें दुसऱ्या महायुद्धांत जपान्यांनीं चियांगला चुंकिंग येथें कोंडल्यानंतर त्यास अमेरिकेच्या मदतीवरच पुढील जपानविरोधी लढा चालविणें भाग पडलें व त्या वेळीं त्यानें चिनी कम्युनिस्टांशीं सहकार्य केलेंहि. तथापि महायुध्द समाप्त होतांच पुनश्च कम्युनिस्ट व चियांग यांचें भयंकर यादवी युद्ध होऊन त्यांत शेवटीं चियांगला चीनची मुख्य भूमि सोडून फोर्मोसा बेटांत आश्रय घ्यावा लागला व आज तो केवळ अमेरिकेच्या शस्त्रबळावरच फोर्मोसांत राहून चीनची मुख्य भूमि जिंकून घेण्याच्या वावड्या उडवीत असतो.

## इंडोचायनावरील फ्रेंच अधिसत्तेचें स्वरूप

१८५८ सालीं फरेंच व स्पॅनिश सैनिकांनीं इंडोचायनाचे पॅसिफिक किनाऱ्यावरील तुरान या नांवाचें बंदर घेतलें. फरेंचांनीं हा पहिला पाय इंडोचायनाचे भूमींत रोवला. तो आता जवळजवळ शंभर वर्षें कायम आहे. गेल्या वर्षीं त्यांना जीनिव्हा करारानुसार उत्तर अनाममधून पाय काढता घ्यावा लागला तरी अद्याप दक्षिण भागांतील सत्ता सोडण्यास ते तयार नाहींत. १८५९ मध्यें सायगांव घेतल्यानंतर फरेंचांनीं हळूहळू लाओस, कांबोडिया, कोचीन चायना हा भागहि आपल्या अंमलाखालीं आणला व

१८९९ सालीं संपूर्ण इंडोचायनाचा अंतर्भाव त्यांनीं फ्रेंच साम्राज्यांत करून टाकला. या राज्यांत कांहीं ठिकाणीं हिंदुस्थानांतील राजेरजवाडयाप्रमाणें नामधारी राजे सर्व जुन्या इतमामानें कायम ठेवण्याची दक्षता फरेंचांनीं घेतली होती.

फरेंच लोक स्वदेशांत स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांचा कितीहि जोरानें जयघोष करीत असले तरी आपल्या साम्राज्यांतील प्रजाजनांना अत्यंत क्रूरतेनें वागविण्यांत त्यांचा हात इतर फारच थोडीं राष्ट्रें धरूं शकतील. इंडोचायनांतील फरेंचांनीं तेथील नागरिकांचे मूलभूत हक्कहि पायदळीं तुडविले होते. त्यांनीं नागरिकांचे दोन वर्ग केले होते. एक फरेंच नागरिकांचा व दुसरा बिगर-फरेंच नागरिकांचा. पहिल्या वर्गांत फरेंच लोक, सरकारी वरिष्ठ अधिकारी, इंडोचायनांतील संस्थानिक, सरदार, श्रीमंत व्यापारी व जमीनदार यांचा अंतर्भाव होई. दुसरा नागरिकांचा वर्ग उरलेल्या लोकांचा असे. युद्धकालांतील या दोन्ही वर्गांच्या नागरिकांना फरेंच सरकार देत असलेली वागणूक कमालीची आश्चर्यकारक होती. खुल्या बाजारांत तांदळाचे भाव तीस सेंट किलो ( शेर ) वरून तेराशें सेंट किलो इतके कडाडले असता रेशनिंगमध्यें सरकार नियंत्रित दरानें २०० सेंट किलो भावानें तांदूळ विकीत असें. परंतु दोन वर्गांच्या नागरिकांसाठीं रेशनिंग-मधील तांदळाचें जें प्रमाण आंखण्यांत आलें होतें तें मात्र फरेंच नागरिकांना महिन्यास दरडोई तीस किलो ( शेर ) व बिगर-फरेंच नागरिकांना दर महिन्यास दर डोई फक्त पांच किलो. होतें. गरीबांना अधिक नाडणाऱ्या या फरेंच अधिकाऱ्यांच्या न्यायबुद्धीवर जनतेचा विश्वास न बसल्यास त्यांत नवल तें काय ? फरेंच इंडोचायना दुसऱ्या महायुद्धांत जपान्यांनीं आपल्या अखत्यारीखालीं आणला तरी १९४५ च्या ९ मार्च पर्यंत स्थानिक कारभार सर्वस्वी फ्रेंचांचेच ताब्यांत होता. सुरक्षिततेला धोका येईल तेथें फक्त जपानी लष्कर हस्तक्षेप करी. तरीहि सरकारदरबारीं रीतसर नोंदलेल्या व्यापारी महामंडळाच्या वार्षिक बैठकीची पूर्वसूचना सहा महिने अगोदर फरेंच कमिशनरला दिली पाहिजे असे निर्बंध होते. सभा-संघटना-मुद्रण-स्वातंत्र्य केवळ नाममात्र होतें आणि आपल्या या रामराज्याला अनामी लोक कां कंटाळतात याचें कोडेंच फ्रेंच सरकारला समजत नसे.

फ्रेंचांच्या या जुलमी कारभारामुळें दडपल्या गेलेल्या व्हिएटनामी लोकांनीं अनेकवार उठावणी केली व प्रत्येक वेळीं फ्रेंचांनीं अघोरी उपाय योजून क्रांतिकारकांचा व स्वातंत्र्यवाद्यांचा उच्छेद केला.

विसाव्या शतकाचे सुरुवातीपासून स्वातंत्र्यवाद्यांनीं मोठ्या जोराची चढाई करण्यास सुरुवात केली. १९०३ सालीं हो आंग हो आ थाम यानें गनिमी काव्यानें लढाई सुरू केली. ती पुष्कळ वर्षे चालविली. १९१०, १९१७ व १९३० या तीन वेळां राष्ट्रवाद्यांनीं केलेल्या उठावास फ्रेंचांनीं क्रूरतेनें हाणून पाडलें. तथापि त्यामुळें इंडोचायनांतील जनता व तिचे स्वातंत्र्यवादी पुढारी नामोहरम झाले नाहींत. दुसऱ्या महायुद्धांत जपानी फौजांनीं इंडोचायना ताब्यांत घेतला तेव्हां स्थानिक जनतेनें मोठ्या प्रमाणावर संघटित होऊन फ्रेंच व जपानी या दोघांशीं लढा दिला. जपान्यांनीं देशाचा बहुतेक कारभार फ्रेंचांचे हातीं १९४५ च्या मार्चपर्यंत ठेवला होता. तेव्हांहि फ्रेंचांनीं आपला जुलूम पूर्वीसारखाच चालू ठेवला. फ्रेंचांचा पूर्ण पाडाव केल्यानंतर जपान्यांनीं राष्ट्रवाद्यांशीं जमवून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु स्वातंत्र्याचा लढा शेवटपर्यंत नेऊं इच्छिणाऱ्यांनीं जपान्यांशीं तडजोड करण्याचें नाकारलें. युद्धसमाप्तीनंतर अमेरिकेच्या मदतीनें फ्रेंच पुन्हां इंडोचायनांत आले. त्यांनीं आपल्या जुन्या साम्राज्यवादी धोरणाचा पाठपुरावा सुरू केला. नवीन जमाना ओळखण्याचें त्यांनीं नाकारलें तेव्हां इंडोचायनांतील जनतेनें शेवटचा निकराचा लढा दिला. दिन बिन फूच्या पराभवानें इंडोचायनांत १९५४ सालीं फ्रेंचांचें कंबरडेंच मोडलें आणि त्यांनीं उत्तर इंडोचायना खाली केला. दक्षिण भागांत अमेरिकेच्या मदतीवर फ्रेंचांनीं कांहीं काळ राहण्याचा अट्टाहास केला तरी त्यांना आतां तेथें स्थान उरलें नाहीं हें सिद्ध झालें. १९४० सालापासूनच्या या स्वातंत्र्यलढ्यांत डॉ. हो चि मिन्हच्या पक्षानें फार मोठी कामगिरी केली आहे.

चीनच्या प्रदेशावर पूर्णतः स्वामित्व मिळविणें आणि सिंगापूरपर्यंत पसरलेल्या जपानी साम्राज्याच्या बंदोबस्तासाठीं बचाव–योजना आंखणें या दोन कामांसाठीं जपान्यांनीं फ्रेंच इंडोचायनाचा प्रदेश युद्धकालांत वापरला.

शक्यता १९४५ सालीं दिसून येऊं लागली. अमेरिकेचे प्रत्यक्ष मदतीपेक्षा अप्रत्यक्ष सहानुभूतीचा त्यांनीं भरपूर उपयोग केला. १९४५ च्या ९ मार्चला जपान्यांनीं फ्रेंचांकडून इंडोचायनाचा कारभार आपल्या हातीं घेतला. परंतु त्यांना स्वत:कडे दैनंदिन कारभाराची ब्याद नको होती. जपान्यांनीं अनामचा बादशहा बाओ दाय यांस देशाचा राज्यकारभार स्वत: पाहण्यासाठीं आमंत्रण दिलें. जपान्यांचे आग्नेय आशिया प्रगतीयोजनेंत भागीदार होण्याचे बाओ दाय यानें ११ मार्च रोजीं जाहीर करून फ्रेंच सरकारबरोबरील आपले जुने करारमदार रद्द झाल्याचें जाहीर केलें. जपान्यांनीं एक प्रकारची स्वायत्तता इंडोचायनाला दिली. बाओ दायच्या नव्या सरकारनें आपल्या नव्या नोटाहि छापल्या आणि फ्रेंच सरकारचें कागदी चलन बाजारांतून बाद होऊं लागलें. तेव्हां फ्रान्सचें परागंदा असलेलें तात्पुरतें सरकार जागें झालें व त्यानें युद्धानंतर इंडोचायनाला स्वायत्तता देण्याचें जाहीर केलें. मात्र इंडोचायनांतील पांच घटक राज्यांचें एक फेडरेशन बनविण्यांत येऊन त्याचा अंतर्भाव फ्रेंच युनियनमध्यें करण्यांत येईल असें सांगण्यांत आलें. आणि या स्वायत्त इंडोचायना सरकारचे प्रमुख फ्रेंच गव्हर्नर जनरलच राहील, सर्व मंत्री त्याला जबाबदार राहतील अशी मेख या स्वातंत्र्यदानसनदेंत मारून परागंदा अवस्थेंतील फ्रेंच नामधारी सरकारनेंहि आपला जुना साम्राज्यवाद मेला नसल्याची खूण उघडी केली.

## इंडोचायनांतील निरनिराळे डावपेंच

युद्धाचे अखेरची इंडोचायनाची परिस्थिति मोठी विलक्षण झाली होती. व्हिएटमिन्ह संघटनेनें स्वतंत्र इंडोचायना राज्य उभारण्याची तयारी केल्यामुळें परागंदा फ्रेंच सरकारनें इंडोचायनाला फ्रेंच युनियनच्या पोटांत स्वायत्तता देऊं केली होती. चीनचे प्रमुख मार्शल चियांग कै शेक यांची इंडोचायनावर नजर होतीच. त्या दृष्टीनें त्यांनीं इंडोचायनांतील राष्ट्रवाद्यांना दक्षिण चीन मध्यें आसराहि दिला होता. त्यांचा प्रमुख म्हणून काम करणाऱ्या हो चि मिन्हचा ओढा कम्युनिझमकडे असला तरी त्यानें मॉस्कोच्या पुढाऱ्यांचे आपसांतले व चियांग कै शेकबरोबरचे हेवेदावे समक्ष पाहिले असल्यामुळें

मॉस्कोच्या ताटाखालचें मांजर होण्याची त्यास इच्छा नसणें स्वाभाविक होतें. इंडोचायनांतील राष्ट्रवाद्यांच्या सर्व पक्षोपपक्षांना एकत्र करून संपूर्ण इंडोचायनाचें स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याकडे त्याची मोहीम वाट चालत होती.

याच सुमारास विजयी राष्ट्रांनीं पॉट्स्डॅम येथें इंडोचायनाची सोळाव्या अक्षांशावर फाळणी केली. त्याचें कारण काय तें बाहेर आलें नाहीं. १६ अक्षांशांचे दक्षिणेकडील इंडोचायनांतील जपान्यांची शरणागति सायगांव येथें ब्रिटिश प्रतिनिधींनीं घ्यावी आणि सोळा अक्षांशांचे उत्तरेकडील विभागांतील जपान्यांची शरणागति अमेरिकन प्रतिनिधींनीं घ्यावी अशी मूळ योजना. त्याच वेळीं फरान्सच्या गुप्त आग्रहानुसार इंडोचायनाचा ताबा पुनश्च फरेंच सरकारला देण्याचें विजयी दोस्तांनीं ठरविलें असावें असा अंदाज नंतरच्या घटनांनीं खरा असल्याचें दाखविलें. ब्रिटिश लष्करी प्रतिनिधींनें दक्षिण इंडोचायनांतील जपान्यांचा ताबा ठरल्याप्रमाणें घेतला व फरेंच सरकारचे प्रतिनिधींना ब्रिटिश सैन्याचें साहाय्यहि देऊं केलें. उत्तर इंडोचायनांत २२ ऑगस्ट १९४५ ला हॅनोई विमानतळावर प्रथम अमेरिकन उतरले. त्यांनीं आपल्याबरोबर फरेंच सरकारचा प्रतिनिधी आणला होता. पण जपान्यांच्याकागदी शरणागतीपेक्षां फरेंच व अमेरिकन प्रतिनिधींनीं कांहींच केलें नाहीं. जपान्यांना निःशस्त्र करून त्यांना जपानकडे धाडण्याची व्यवस्था करण्यासाठीं चियांग कै शेकचे हजारों चिनी सैनिक सप्टेंबरमध्यें उत्तर इंडोचायनांत येऊन दाखल झाले.

चियांग कै शेकचें धोरण आणखी एका घटनेनें स्पष्ट झालें. बाओ डायला जपान्यांनीं मार्च १९४५ मध्यें स्वायत्तता देऊन इंडोचायनाचा कारभार पाहण्यास सांगितलें. त्याच सुमारास चियांग कै शेकच्या पुरस्कारानें कुनमिंग येथें इंडोचायनांतील कार्यकर्त्यांची एक संयुक्त बैठक भरविण्यांत आली. या बैठकीस हो हजर होता व त्याचींच माणसें जपानव्याप्त इंडोचायनांत यशस्वी रीतीनें भूमिगत राहून चळवळ करीत असल्यामुळें भावी चढाईचीं सूत्रें त्याच्याच आधीन करण्यांत आलीं. त्या कामासाठीं

चीन–इंडोचायनाचे सरहद्दीवरील एका पट्टयांतील जपानी सैनिकांना हलविण्यांत येऊन हो चि मिन्हच्या भावी राज्याची अशा रीतीनें प्रतिष्ठापनाच करण्यांत आली.

परागंदा फ्रेंच सरकारचा इंडोचायनांतील प्रतिनिधी जीन सेंतेनी यांजबरोबर हो नें चियांगविरुद्ध संधान बांधलें आणि फरेंच युनियनमध्येंच इंडोचायनाला रहावयाचें आहे असेंहि त्यांस सुचविलें. हो चें हें धोरण जीनिव्हा परिषदेपर्यंतहि होतें. कम्युनिस्ट रशिया किंवा त्याहूनहि नजीकचा कम्युनिस्ट चीन यांच्या मदतीवर हो नें १९४५ ते १९५४ पर्यंतचा आपला स्वातंत्र्यलढा यशस्वी रीतीनें चालविला असला तरी इंडोचायनाला चीनचा एक सुभा बनून राहण्याची इच्छा नाहीं हें हो ओळखून आहे. आशियांतील चीनमध्यें कम्युनिझम प्रभावी ठरला तरी इतर स्वतंत्र राष्ट्रांनाहि स्थान आहे असें भारताचे पं. नेहरू सांगत असतात. त्याच धोरणाचा पुरस्कार करून आशियांत स्वतंत्र तटस्थ राष्ट्रांची उभारणी करण्याच्या योजनेस हो चि मिन्हचा पुढील काळांत मोठा पाठिंबा मिळूं शकेल असें हो चें अमेरिकन टीकाकार आशावादीपणें सांगतात. त्यांत पूर्ण सत्य नसलें तरी चीनचा एक सुभा बनण्याची हो ची इच्छा नाहीं ही गोष्ट १९४५ सालींच कशी स्पष्ट झाली हें पुढील कांहीं महत्त्वाच्या घटनांवरून दिसून येतें.

## लोकशाही प्रजासत्ताक सरकारचा जाहीरनामा

फ्रेंच प्रतिनिधी जीन सेंतेनी यांस फ्रेंच युनियनचा पुरस्कार सुचवितांना हो नें आपल्या जुन्या कम्युनिझमचा वास नवीन सहकाऱ्यांना येऊं नये यासाठीं आपलें नांव बदलून हो चि मिन्ह (संपूर्णत्वाला गेलेली व्यक्ति या अर्थाचें) असें नांव घेतलें असें सांगण्यांत येतें. हा प्रवाद खरा असो वा नसो पण हो नें आपलें नांव या सुमारास बदललें ही गोष्ट मात्र खरी.

१५ ऑगस्टला जपान शरण आल्यानंतर २० ऑगस्टला बाओ दायनें फ्रेंच प्रमुख जनरल द गूल यांजकडे इंडोचायनाच्या संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. जपाननें १० ऑगस्टला शरणागतीची भाषा केली असें समजतांच १३ ऑगस्टला इंडोचायनांतील व्हिटमिन्ह केंद्रानें जपान्यांना

१८००९ २९।९।४८

शस्त्रें खालीं ठेवण्यास सांगितलें. १६ ऑगस्टला ६० विविध गटांची संयुक्त बैठक तान त्रिएन गांवीं होऊन व्हिएटनामचे लोकशाही प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्याचें ठरविण्यांत आलें. तात्पुरत्या सरकारचीहि नेमणूक करण्यांत आली. १७ ऑगस्टला हॅनोई येथें व इतरत्र राष्ट्रवाद्यांनीं मोठीं निदर्शनें केलीं. त्याच दिवशीं फ्रेंच सरकारनें इंडोचायनासाठीं फरेंच हायकमिशनर म्हणून व्हाइस-अॅडमिरल थिएरी दार्जेलिदची नेमणूकहि केली. १९ ऑगस्टला व्हिटमिन्हांनीं क्रांतिदिन साजरा केला व तात्पुरतें सरकार घोषित केलें. २४ ऑगस्ट १९४५ ला अनामचा बादशहा बाओ दाय यानें राज्यत्याग केला आणि त्यानें आपले राज्याधिकार इंडोचायनाच्या लोकशाही प्रजासत्ताक सरकारच्या स्वाधीन केले. बाओ दायनें या सरकारचा सल्लागार म्हणून राहण्याचें ठरविलें. या घोषणेंत बाओ दायनें लोकांना विनविलें कीं, त्यांनीं एकजुटीनें आपल्या प्रजासत्ताकला पाठिंबा द्यावा. १० सप्टेंबरला बाओ दायला प्रजासत्ताकचा सल्लागार नेमण्यांत आलें. पुढें मात्र त्याचा विचार फिरला आणि तो चुंकिंगमार्गें १९४६ मध्यें हाँगकाँगला गेला.

व्हिटमिन्ह प्रजासत्ताकच्या वतीनें सायगांव येथेंहि मोठीं निदर्शनें करण्यांत आलीं. जागोजाग लोकसमित्यांच्या नेमणुकीहि करण्यांत आल्या. दोन सप्टेंबरला हॅनोई येथें इंडोचायनांतून जमा झालेल्या पांच लक्ष लोकांच्या प्रचंड सभेंत व्हिटनामच्या हंगामी सरकारचे अध्यक्ष म्हणून हो चि मिन्ह यांनीं इंडोचायना स्वतंत्र झाल्याचें घोषित करून लोकशाही प्रजासत्ताक व्हिएटनाम सरकारचा जाहीरनामा प्रकट केला. या जाहीरनाम्यांत अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा व फरेंच राज्यक्रांतीनंतर पुरस्कारिलेल्या मानवी हक्कांची सनद यांतील उतारे समाविष्ट केले होते. जनतेचें स्वातंत्र्य व सुख यांच्या प्रस्थापनेसाठीं हें सरकार शेवटपर्यंत लढा देईल असें सांगण्यांत आलें. ८० वर्षांच्या जुलमी फरेंच राजवटींतील अपकृत्यांची आठवण करून देऊन जाहीरनाम्यांत सांगण्यांत आलें होतें कीं, "आम्ही फ्रेंचांपासून सत्तादान घेतलें नसून फरेंचांना जिकणाऱ्या जपान्यांकडून लढ्यानें स्वातंत्र्य मिळविलें आहे. शंभर वर्षांच्या गुलामगिरीच्या बेड्या तोडून आम्ही आतां स्वतंत्र झालों आहोंत. शेंकडों वर्षें चालत आलेल्या राजेशाहीला

आम्हीं नेस्तनाबूद केलें असून त्याऐवजीं आम्ही लोकशाही प्रजासत्ताक स्थापन केलें आहे. हंगामी सरकारच्या वतीनें हें सरकार जाहीर करीत आहे कीं आतां इंडोचायनांतील फरेंच साम्राज्यवाद नष्ट करण्यांत आला असून त्यांच्या कारवायांना यापुढें येथें स्थान नाहीं. तेहरान परिषदेंत व यूनो स्थापनेच्या सॅनफ्रॅन्सिस्को परिषदेंत विजयी दोस्तांनीं राष्ट्रांची समता मान्य केली आहे. तीं दोस्त राष्ट्रें व्हिएटनामच्या स्वातंत्र्याचे लढ्यास निश्चित मान्यता देतील असा आमचा दृढ विश्वास आहे." "ज्या जनतेनें ८० वर्षें फरेंच वसाहतवादांशीं निकराचा सामना दिला, गेल्या कित्येक वर्षांत दोस्तांच्या बाजूनें सोटेशाही आक्रमकांशीं धैर्यानें लढा दिला ती जनता स्वातंत्र्य मिळविणारच. व्हिएटनामला स्वतंत्र होण्याचा हक्क आहे आणि आतां आम्हीं तें स्वातंत्र्य मिळवून आम्ही स्वतंत्र राष्ट्र बनलों आहोंत हें जगाला आम्ही उद्घोषित करतो" अशा शब्दांत या जाहीरनाम्याचा शेवट करण्यांत आला होता.

दुसऱ्या महायुद्धाचे अखेरीस इंडोचायनांतील स्वातंत्र्यलढ्यांत फार निकराची मोहीम हो चि मिन्हनें अंगावर घेऊं नये असा सल्ला मॉस्कोतील प्रमुखांनीं दिला असतां तो न मानतां हो नें निर्वाणीनें स्वातंत्र्यलढा देण्याचा निर्धार केला आणि हो चें धोरणच योग्य होतें असें गेल्या वर्षीं काळानेंच जाहीर केलें. मात्र १९४५ ते १९५४ पर्यंतच्या दहा वर्षांतील घनघोर युद्धामुळें तांदळाचें कोठार असलेला लाल नदीच्या सुपीक खोऱ्यांतील उत्तर व्हिएटनामचा प्रदेश आतां दुष्काळी भाग झाला आहे. फरान्समध्यें फरेंच सरकारशीं व इंडोचायनांत त्यांच्या प्रतिनिधींशीं जमवून घेण्यासाठीं हो चि मिन्हनें खूप खटपट केली. आपल्या सहकाऱ्यांना नापसंत होईल एवढा मवाळपणाहि त्यानें या वाटाघाटींत दाखविला होता. परंतु हिटलर–जपाननें दुसऱ्या महायुद्धांत पंगु केलेल्या फरान्सनें अमेरिकेच्या खांद्यावर बसून तिच्याकडून अपरंपार लष्करी व आर्थिक मदत घेऊन दहा वर्षें इंडोचायनावर फरेंच साम्राज्यशाहीचें जोखड लादण्याचा अट्टाहास केला. कोरियायुद्ध संपल्यानंतर इंडोचायनांत अमेरिकेनें चतुरंग शस्त्रसाहित्याची फ्रेंचांना मदत दिली असताहि इंडोचायनांतील स्वातंत्र्यवादी जनतेचा लढा यशस्वी करून

दाखविण्यांत हो व त्याचे सहकारी यांनीं कमालीचें शौर्य व मुत्सद्दीपणा दाखविला. फ्रेंच व हो यांच्या दरम्यानच्या वाटाघाटी, राजे बाओ दाय यांचा फ्रेंच गोटांतील आरामविराम यांचा इतिहास मोठा लांबलचक आहे. दिन बिन फूचा लढा जिंकून हो च्या देशभक्त सैनिकांनीं फ्रेंच साम्राज्य-वादाला अतिपूर्वेकडे कायमची मूठमाती दिली आहे. त्याची वळवळ आणखी थोडा वेळ दक्षिण व्हिएटनाममध्यें अमेरिकन मदतीवर चालली तरी जीनिव्हा करारानुसार होणाऱ्या अखंड इंडोचायनांतील निवडणुकीच्या निकालानंतर फ्रेंचांना आपला गाशा गुंडाळावा लागणार यांत शंका नाहीं.

उत्तर व दक्षिण व्हिएटनामच्या कारभाऱ्यांत द्वेषभाव माजविण्याचे व इंडोचायनाची कृत्रिम फाळणी टिकविण्याचे परक्यांचे प्रयत्न कांहीं कालांतच विफल ठरतील असा आशावाद गेल्या पंधरा वर्षांतील इंडोचायनाचा लढा जवळून पाहणारे निरीक्षक प्रकट करीत आहेत.

## हो चि मिन्हची कार्यकुशलता

व्हिएटमिन्हांचा किंवा इंडोचायनांतील स्वातंत्र्याच्या लढ्यांतील १९४० ते १९५५ हा पंधरा वर्षांचा काल तेथील सर्व पक्षांच्या लहानथोर कार्य-कर्त्यांच्या स्वार्थत्यागाच्या प्रचंड कृत्यांनीं गजबजून गेलेला दिसतो. त्यांतल्या-त्यांत हो चि मिन्हनें आपलें जीवनसर्वस्व म्हणून हा लढा चालविण्यांत आपली सर्व शक्ति, बुद्धि, संघटनाकुशलता, समजूतदारपणा, मुत्सद्देगिरी पणास लावली होती. मॉस्कोच्या कम्युनिस्टांच्या शाळांत अनुभवांतून शिक्षण घेऊन, आशियायुरोपांतील अनेक देशांतील भूमिगत केंद्रांतील संघ-टनांत काम करून हो नें जी कार्यकुशलता संपादन केली होती ती त्यानें देशासाठीं वापरली आणि आतां उत्तर व्हिएटनाम स्वतंत्र झाल्यानंतर तेथें कोणताहि अत्याचार न करतां नवीन नीतिमान आयुष्यक्रम सर्वसामान्य जनतेच्या जीवनांत कसा निर्माण करतां येईल यासाठीं तो व त्याचे सर्व सहकारी सर्वस्वानें कष्ट करीत आहेत. हो ला स्वतःचें व्यक्तिगत फायद्याचें कोणतेंच उद्दिष्ट नाहीं. साधी राहणी पण कठोर कर्तव्याचरण यामुळें हो खरा लोकनेता बनला. तो दिसावयास असा आहे कीं हमालमजुरांत

मिसळला तर निराळा दिसणारहि नाहीं. त्याची अंगकाठी तो नेहमीं वापरत असलेल्या जंगलांतील बांबूसारखीच सरळ-हाडकुळी, वजन शंभर पौंडांच्या आसपास परंतु मन पूर्ण खंबीर. हो जसा हिशोबी तसा क्रूर असा कांहींचा त्याच्यावर आरोप आहे. फ्रेंचांना त्यांनीं बजाविलें होतें कीं, तुम्ही आमचीं दहा माणसें ठार मारलींत तर आम्ही तुमचा एकतरी माणूस ठार करूच करूं. तो कोमल प्रवृत्तीचा कवी असला तरी रणांगणांतील रणचंडीच्या रौद्र नाचांतहि त्यास पूर्ण आपुलकी वाटली आहे.

हो चि मिन्हनें नुकतीच चीन-रशियाची सफर करून आल्यानंतर जाहीर केलें कीं, व्हिटमिन राज्याची सर्वांगीण प्रगति करण्यासाठीं चीन व रशिया आम्हांस सहकार्य व मदत देण्यास तयार आहेत. चीनचे अध्यक्ष मौ त्से तुंग यांनीं त्याचें पेकिंगमध्यें जें अगत्याचें स्वागत केलें त्यावरून चीनचे पुढारी हो चि मिन्हला आश्रित न मानता बरोबरीचेच मानतात हें सिद्ध झालें आहे.

जगांतील ब्रिटन-अमेरिका या मोठ्या राष्ट्रांना ठिकठिकाणच्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांची सोडवणूक करतां येईनाशी झाली कीं फाळणीच्या धोरणाचा तीं अंगीकार करीत असतात. अखंड हिंदुस्थानची ब्रिटननें आणि कोरियाची फाळणी करण्यांत अमेरिकेंत जो स्वार्थ सध्यां तरी साधला आहे, त्याचीच पुनरावृत्ति फ्रान्स अमेरिकेनें इंडोचायनांत सुरू केली आहे. दक्षिण इंडोचायनांचे सध्यांचे पंतप्रधान दियम परक्यांच्या या धोरणास बळी पडले आहेत. दक्षिण इंडोचायनाचे राजधानीचे सायगांव शहरांत त्यामुळें जी अशांतता निर्माण झालेली दिसते ती वरवरची नसून त्या देशांतील निर्भेळ स्वातंत्र्यवादी आणि परक्यांच्या ओंजळीनें पाणी पिणारे यांचा तो खरा झगडा आहे आणि उत्तर इंडोचायनांतील हो चें धोरण दक्षिण भागांतील जनतेला अखंड इंडोचायनाचे ध्वजाखालीं एकत्रित आणण्यास यशस्वी होईल असें मत कांहीं अमेरिकन निरीक्षकांनींहि व्यक्त केलें आहे.

# ४ फील्ड मार्शल लुआंग पिबुन संग्राम

‘ स्वतंत्र राष्ट्रा ’चे शेजारी

आग्नेय आशियांतील धान्याचें कोठार असलेल्या सयाम उर्फ थायलंड या देशाभोंवतीं कम्युनिस्ट आणि कम्युनिस्ट--विरोधक असलेल्या देशांनीं अनेक राजकारणी व अर्थकारणी जाळीं विणण्याचा उद्योग गेलीं दोन तपें चालविला आहे. परक्यांच्या कारवायांपासून स्वदेशाचा बचाव करून थायलंडचें ‘ स्वतंत्र राष्ट्र ’ हें नामाभिधान (थाय याचा अर्थ स्वतंत्र असा आहे ) सार्थ करण्यासाठीं अनेक वर्षें सतत कष्ट करणारा फील्ड मार्शल लुआंग पिबुन संग्राम सध्यां जगांतील एक महत्वाची व्यक्ति बनली आहे. मार्शल पिबुन संग्राम थायलंडमधील मध्यम वर्गांतील आहे आणि थायलंडमधील नेत्यांची खोलवर जाऊन पाहणी केली तर असें दिसतें कीं त्या देशांतील कारभाराची महत्त्वाची



जबाबदारी सध्यां मध्यमवर्गांतील मंडळी पार पाडीत आहेत. १९५० सालच्या गणनसंख्येप्रमाणें थायलंडची वस्ती १,८६,००,००० असून तींत तीस लक्ष चिनी, सहा लक्ष मलायी आणि अर्धा लक्ष व्हिएटनामी लोक होते. थाय-

लंडमधील चिनी लोक मुख्यतः व्यापारधंद्यांत असून राजधानीच्या बँकॉक शहरांतच त्यांची मुख्य वस्ती आहे. रबराच्या मळयांचे व टिनच्या खाणींचे कारभारी म्हणून अनेक चिनी देशाच्या दक्षिण व पश्चिम भागीं विखुरलेले आहेत. या चिन्यांचा ओढा पेंकिंग सरकारकडे मोठ्या प्रमाणांत आहे. थायलंडला दक्षिणेस जोडलेल्या मलायांतील क्रांतिकारक दोन्ही देशांच्या सरहद्दीवरील जंगलाचा आसरा घेत असतात. कांहीं मलायी थायलंडमध्यें कायम वस्तीला आले असले तरी त्यांचें महत्व फारसें नाहीं.

थायलंडच्या उत्तरेस व पूर्वेस पसरलेल्या इंडोचायनाचे प्रदेशांत गेल्या वर्षी कम्युनिस्टपंथीय व्हिटनामची निर्मिति होण्याची शक्यता जीनिव्हा करारांत ( १९५४) अंतर्भूत असल्यामुळें थायलंडच्या कारभाऱ्यांना इंडोचायनांतील घडामोडींविषयीं विशेष जागरूकता ठेवावी लागत आहे. इंडोचायनाचे प्रदेशांतून पंचमस्तंभीयांचा शिरकाव थायलंडचे भूमींत होऊं नये म्हणून दोन्ही देशांच्या दरम्यानची सरहद्द अधूनमधून बंद करण्यांत येत असते. पिबुन सरकारनें अनेक व्हिटनामींना सरहद्दीवरच्या जिल्ह्यांतून हलवून दक्षिणेकडील भागांत त्यांची वस्ती करविलेली आहे.

## मॅनिला कराराची योजना

थायलंडच्या स्थानाचें भौगोलिक, राजकीयदृष्टया फार महत्त्व आहे. पूर्वेस व उत्तरेस व्हिटमिन्हांचें सरकार जन्मास आल्याचें वर सांगितले आहेच. पश्चिमेस १९४८ सालीं स्वतंत्र झालेल्या ब्रम्हदेशांतील बंडाळया अद्याप पूर्णपणें थांबल्या नसल्यामुळें त्या भागांतील सरहद्दीविषयीं थायलंडच्या कारभाऱ्यांना जागरूक रहावें लागतें. दक्षिणेस चिंचोळया भूच्या संयोगीभूमीनें जोडलेला व पहाडी जंगलमय सरहद्दीच्या पलीकडे स्वातंत्र्याकांक्षीं मलायाच्या उठावणीनें भरलेला मलाया थायलंडच्या कारभाऱ्यांचा माथेशूळ अधूनमधून उठत आला आहे. थायलंडनें गेल्या वर्षी आग्नेय आशिया संरक्षक करारांत मोठ्या प्रमाणांत भाग घेतला. कम्युनिस्ट चीनचें प्रभावी राजकारण आणि इंडोचायनांतील कम्युनिस्टांची सरशी यामुळें फिलिपाईन्स, ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड या आशियाचे मुख्य भूमीपासून दूर असलेल्या देशांना भीति निर्माण झाली. आणि त्यांच्यापासून पूर्वेस ६-७

हजार मैल दूर असलेल्या अमेरिकेलाहि आग्नेय आशियांतील नवजागृतीमुळें आपल्या पश्चिम पॅसिफिकमधील वर्चस्वाला शह लागला अशी भावना झाली. त्यामुळें या चारी राष्ट्रांनीं आग्नेय आशिया संरक्षण कराराची प्रतिष्ठापना फिलिपाईन्सच्या राजधानीच्या मॅनिला शहरीं गेल्या वर्षी केली. आग्नेय आशियांतील म्हणता येईल असें फक्त एकच राष्ट्र–थायलंड या करारांत भागीदार झालें आहे आणि लष्करी मदतीसाठीं अमेरिकेशीं करार करणाऱ्या पाकिस्ताननेंहि या करारांत सामील होण्याचें ठरविलें. आग्नेय आशियाच्या संरक्षणाची ही योजना मॅनिला येथें तयार करण्यांत आली तरी ती अमेरिकेचीच आहे.

त्या योजनेंत आग्नेय आशियांतील इंडोनेशिया, इंडोचायना, ब्रह्मदेश हीं महत्त्वाचीं राष्ट्रें सामील नाहींत. यावरून आग्नेय आशिया संरक्षण कराराच्या निमित्तानें थायलंडला पुढें करून त्या भूभागांत आपलें सैनिकदल पुढें रेटण्याचा अमेरिका-प्रभृतींचा हा उपक्रम आहे अशी आशंका घेणाऱ्यांचें समाधान मॅनिला–कराराचे पुरस्कर्ते करूं शकले नाहींत. मॅनिला कराराच्या योजना कार्यवाहींत आणण्यासाठीं प्रमुख कार्यालय थायलंडची राजधानी बँकॉक येथें ठेवण्यांत आलें आहे. त्या शहरीं संरक्षण करारांतील भागीदार राष्ट्रांच्या सैनिकी प्रमुखांचीहि बैठक झाली. थायलंडच्या राजधानीच्या शहरास आणखी एका दृष्टीनें महत्त्व आलें आहे दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर स्थापन करण्यांत आलेल्या राष्ट्रसंघाचें–यूनोचें अतिपूर्वेकडील कार्यालय बँकॉक येथें असून यूनोच्या कांहीं महत्त्वाच्या संघटनांचीं कार्यालयेंहि तेथेंच आहेत. अतिपूर्वेकडे जाणाऱ्या व अतिपूर्वेकडून येणाऱ्या विमान वहातूक कंपन्यांचे बँकॉक हें एक मोठें केंद्र आहे व जाणारीयेणारी बहुतेक विमानें येथील विमानतळावर उतरतात.

बँकॉक शहराचें आंतरराष्ट्रीय महत्त्व आधुनिक युगांतील आहे, असें नव्हे. हजारों वर्षें आग्नेय आशियांतील महत्त्वाच्या सांस्कृतिक घडामोडी मलाया–थायलंडचेच भागांत झालेल्या आहेत. दर्यावर्दीपणा व धाडस हे गुण या भागांतील जनतेच्या अंगांत जुन्या काळापासूनच बाणलेले आहेत.

## थायलंडच्या भूमिकेवरील टीका

थायलंडमध्य भरपूर पाऊस, उष्ण हवा, सुपीक जमीन यामुळें तांदळाचें फार मोठें पीक येतें आणि आसपासच्या अनेक देशांतील उपाशी लोकांना थायलंडनें शेंकडों वर्षें अन्न पोचविलें आहे. तांदळाच्या खालोखाल सागवानाचेंहि मोठें पीक जंगली भागांत येतें. आधुनिक कारखानदारीसाठीं लागणारें रबर व टिन थायलंडमध्यें मुबलक प्रमाणांत उपलब्ध होत असल्यामुळें थायलंडच्या या दोन वस्तूंचें महत्त्व कमालीचें वाढलें. जगांतील मुख्य राष्ट्रें आगामी महायुद्धासाठीं लागणाऱ्या कच्च्या मालाचा सांठा दुसरें महायुद्ध संपल्यापासूनच करूं लागलीं असल्यामुळें आगामी जागतिक संग्रामाच्या दृष्टिकोनांतून थायलंडचें महत्त्व अनन्यसाधारण असल्याचें दिसून येतें. थायलंडच्या प्रदेशांतील रेल्वेचें जाळें भारत व चीन यांतील रेल्वेशीं जोडणें फारसें अवघड नसल्यामुळें भारत, चीन व आग्नेय आशिया यांचें एकरूपत्व सिद्ध करण्यांत थायलंडचें कर्तृत्व दिसून येईल. मलायाच्या दक्षिण टोकास असलेल्या ब्रिटिशांच्या ताब्यातील सिंगापूरच्या नाविक तळाचें महत्त्व कमी करण्यासाठीं थायलंड–मलायाला जोडणाऱ्या क्राच्या संयोगभूमींत ५० मैल लांबीचा कालवा खोदण्याची कल्पना फार जुनी आहे.

चीन, भारत, ब्रह्मदेश, इंडोचायना, इंडोनेशिया व मलाया यांतील जनतेचें स्वातंत्र्य व स्वास्थ्य रक्षिण्यासाठीं थायलंडचें स्वातंत्र्य अबाधित राहणें आवश्यक आहे व त्यासाठीं जूटच करावयाची असेल तर याच राष्ट्रांची व्हावयास हवी ही गोष्ट उघड आहे. आग्नेय आशियाबाहेरच्या राष्ट्रांशीं मॅनिला करारानें संरक्षण–योजना निर्माण करण्यांत थायलंडच्या मार्शल पिबुन संग्रामनें पुढाकार घेतला असला तरी तो पुढाकार दुसऱ्या महायुद्धकालांत स्वदेशाचें जास्तींत जास्त संरक्षण करण्यासाठीं जपान्यांशीं दोस्ती जोडण्याच्या त्याच्या धोरणाशीं जुळणारा आहे एवढेंच म्हणता येईल. आशियांतील इतर जनतेप्रमाणेंच थाय लोक कमालीचे सोशिक व थंड्या रक्ताचे आहेत; परंतु आपल्या हितावर निखारे ठेवून परकी राष्ट्रें स्वतःच्या पोळ्या भाजून घेत आहेत अशी खात्री पटतांच आशियांतील इतर राष्ट्रां-

प्रमाणेंच थायलंडमधील स्वातंत्र्यप्रेमी नागरिक व त्यांचें सरकार परक्यांच्या उद्योगाचे हे तवे त्यांच्याच अंगावर ढकलून देऊन त्यांना चांगली अद्दल घडवितील अशी कांहीं निरीक्षकांनीं केलेली टीका अस्थानीं वाटत नाहीं.

## तेराव्या शतकांतील जनतेच्या न्यायाची घंटा

थायलंडची संस्कृति, कला आणि साहित्य यांच्यावर भारतीय आणि चिनी संस्कृति, कला व साहित्य यांचा फार मोठा परिणाम झालेला आहे. आपल्या परंपरा व समाजजीवन कायम राखण्याची थायलंडच्या जनतेची इच्छा आहे. तेथील बहुसंख्य जनता बौद्धधर्मी असून तेथील देवळें बौद्धपंथीय आहेत. थायलंडवर शेंकडों वर्षे राजे लोकांनीं अनियंत्रित रीतीनें राज्य केलें. तथापि प्रजेच्या अडीअडचणींकडे राजांचें नेहमींच लक्ष असें. प्रजेवर कोणी अन्याय करूं नये याची दक्षता जुन्या काळचे राजे लोक घेत आले आहेत. तेराव्या शतकांत थायलंडवर राज्य करणाऱ्या रामकेमहाएंग नांवाच्या राजानें आपल्या राजवाड्याच्या प्रवेशद्वाराच्या बाहेरचे बाजूस एक मोठी घंटा लावून ठेवली होती. राज्यांतील प्रजाजनांवर अन्याय झाल्यास त्यानें ती घंटा दिवसा अगर रात्रीं केव्हांहि वाजविण्यास हरकत नसे. प्रजापालनकर्त्या राजांच्या अंमलाखालीं नांदणाऱ्या प्रजेचेंहि आपल्या कारभाऱ्यांवर मोठें प्रेम असे. १९ व्या शतकांत राजा मोंगकुट व त्याचा मुलगा छुलालंगकर्ण या दोघांनीं कालवे काढून शेतीचें उत्पन्न वाढविलें, विद्यालयें बांधून शिक्षणप्रसारास मदत केली आणि वहातुकीची नवीन साधनें–रस्ते तयार करून प्रजेचा दुवा घेतला. याच राजांच्या कारकीर्दीत शेंकडों तरुणांना परदेशी शिक्षणासाठीं पाठविण्यांत आलें होतें. लोकशाही, राष्ट्रवाद, समाजवाद या निरनिराळ्या मतप्रणालींचा अभ्यास करून पुष्कळ जण परतले; त्यांना अनियंत्रित राज्यसत्तेचें वावडें वाटूं लागलें. त्यांतूनच १९३२ ची रक्तशून्य राज्यक्रांति थायलंडमध्यें घडून आली.

१९३२ सालापर्यंत अनियंत्रित कारभार पाहणाऱ्या राजांवर लोकांचें नियंत्रण दडपण नव्हतें.त्या वर्षी थायलंडमध्यें आधुनिक स्वरूपाची क्रांति झाली. राजघराण्याची सत्ता मर्यादित करून आधुनिक लोकशाही निर्माण करण्याच्या

उद्दिष्टानें मध्यम वर्गातील पुढाऱ्यांनीं संरक्षकदलांतील जाणत्यांशीं संगनमत करून २४ जून १९३२ रोजीं उठावणी केली व त्या उठावणींतून पुढें आलेल्यांपैकीं आजचे पंतप्रधान मार्शल पिबुन संग्राम हे एक अव्वल दर्जाचे पुढारी व मुत्सद्दी म्हणून गाजले. त्या वेळीं जागतिक आर्थिक मंदीच्या लाटेंतून थायलंडला आपली सोडवणूक करणें शक्य नव्हतें. त्यामुळें कारभाराचा डोईजड खर्च तिजोरीला झेपेनासा झाला. साहजिकच सरकारी नोकरांवर कपातीची संक्रांत कोसळली. या आपत्तींतून मुक्तता करून घेण्यासाठीं संरक्षकदलाच्या घटकांनीं कारभारांत हस्तक्षेप करण्याचें ठरविलें. त्या काळांत परकीयांबरोबरच्या चालू असलेल्या अनेक सवलतींच्या तहनाम्यां-मुळें थाय लोकांच्या जीवनावर व व्यवहारावर बरींच बंधनें निर्माण झालीं होतीं. त्यांतून मुक्त होण्याचा एक उपाय राजवटींत बदल करणें हा होता. थाय लोक अति सोशीक असल्यानें अडचणींना सांभाळूनहि व्यवहार चालवीत. म्हणून क्रांतीचें स्वरूप भडक होणें शक्य नव्हतें. घातपाताशिवाय त्यांना राजसत्तेचें स्वरूप बदलता आलें. बाहेरच्यांनीं हस्तक्षेप केला नाहीं तर आशियांतील जनता आपसांत समजूनउमजून व्यवहार करून अडचणींचा निरास करते याचें एक प्रात्यक्षिक १९३२ सालीं थायलंडमध्यें झालेल्या रक्तशून्य राज्यक्रांतींतून जगापुढें आलें.

## पिबुन संग्रामची लोकप्रियता

१९३२ सालीं लुआंग प्रदिस्त मनुधर्म या वकिलानें कांहीं लष्करी व नाविक अधिकाऱ्यांच्या मदतीनें त्या वेळचे राजे प्रजादीपक यांना जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठीं लोकशाही राजवट–विधिमंडळ व त्यांस जबाब-दार असणारें मंत्रिमंडळ–स्थापण्यास भाग पाडलें. बँकॉक येथील सर्वश्रेष्ठ न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ति फ्या मनोपकर्ण यांस पंतप्रधान करण्यांत आलें. त्यानें नवीन राजवटीचा कायदाहि तयार केला. परंतु तो हिकमती राजका-रणी नसल्यामुळें १९३३ सालीं त्यानें स्वतःच घटना तहकूब केली. त्याच्या कृत्यानें लोकक्षोभ होतांच तो परागंदा झाला. त्यानंतर सत्तासंपादनासाठीं झगडे सुरू झाले. प्रथम फ्या फाहोल फलप्यायूह यानें मंत्रिमंडळ बनविलें. १९३३ सालीं राजघराण्यांतील जनरल बवरादेज यानें

बंड केलें. पण तें लष्करानें अयशस्वी ठरविलें. त्या वेळच्या लष्करांतील प्रमुख अधिकारी कर्नल लुआंग पिबुन संग्राम यानें सत्तारूढ कारभाऱ्यांस मदत दिली. हेच कर्नल आजचे पंतप्रधान होत. १९३८ सालीं लुआंग पिबुन संग्राम थायलंडचे पंतप्रधान झाले. १९३७ व १९३८ या दोन वर्षांत थायलंडनें परराष्ट्रांशीं वाटाघाटी करून जुन्या जांचक सवलती व निर्बंध नष्ट करून थायलंडचें नांव–स्वतंत्र लोकांचा देश–सार्थ केलें. परक्यांच्या सवलती रद्द करण्यांत पिबुन संग्राम यशस्वी झाल्यामुळें त्यांची लोकप्रियता वाढली. त्यांनींच देशाचें पूर्वींचें सयाम हें नांव बदलून 'थायलंड' हें नवें नांव स्वदेशाला दिलें व आंतरराष्ट्रीय व्यवहारांत तें रूढ करण्याची खटपटहि केली. ब्रिटिश नमुन्याबरहुकुम नियंत्रित राजसत्ता व लोकशाही यांचा कारभार थायलंडमध्यें सुरू करण्याची मूळ कल्पना होती. देशांतील बहुसंख्य लोक शेतीचे व्यवसायांत गुंतलेले, व्यापार बहुतेक बाहेरच्या चिनी लोकांच्या हातीं; तेव्हां मध्यम वर्ग म्हटल्या जाणाऱ्या अत्यंत लहान गटाच्या हातींच सर्व कारभार आपोआप आला. त्या वर्गांतूनच मुलकी व संरक्षकदलांतील अधिकाऱ्यांची भरती होत असल्यामुळें थायलंडमध्यें अद्याप सारी सत्ता त्याच वर्गाच्या हातीं आहे.

१९३४ सालीं राजे प्रजादीपक प्रकृतिस्वास्थ्यासाठीं इंग्लंडला गेले व तेथूनच त्यांनीं १९३५ सालीं राज्यत्याग करून गादीचा वारसा स्वित्झर्लंड-मध्यें शिकत असलेला आपला पुतण्या आनंद महीदल यांस दिला. आनंद महीदल फार काळ परदेशांत राहिल्यामुळें देशांतील कारभार मार्शल पिबुन संग्रामसारख्यांच्या हातीं राहिला. राजे महिदल बँकॉकला येऊन कारभार पाहूं लागल्यानंतर युद्धोत्तरकाळीं ९ जून १९४६ ला त्यांचा बिछान्यांतच खून झाला. त्या वेळीं मार्शल पिबुन संग्राम पंतप्रधान नव्हते. प्रिदी पंतप्रधान होता. दुसऱ्या जागतिक महायुद्धकाळीं मार्शल पिबुन संग्रामनें देशाची धूळधाण होऊं नये व जपान्यांकडून थाय जनतेला उपद्रव कमी व्हावा या हेतूनें जपान्यांबरोबर सहकार्य केलें होतें. जपानी बादशहांनीं त्याबद्दल मार्शल संग्राम यांचा टोकियो येथें सत्कारहि केला. युद्धकालांतील या वागणुकीबद्दल युद्धानंतर मार्शल संग्रामची खास चौकशी

करण्यांत आली. तींत त्यांची निर्दोष म्हणून मुक्तता करण्यांत आली. तथापि ते लष्करांतून सेवानिवृत्त झाले. राजे महीदलच्या खुनानंतर त्यांचे धाकटे बंधु फुमिफन अदुलडेट गादीवर बसले. १९४६ च्या जून महिन्यांतील बंडाळी कांहीं काळ चालली. नवीन राजे परदेशांतच असल्यामुळें कारभाराचा अखत्यार लष्करी नेत्यांच्या नियंत्रणाखालीं राहिला. १९४७ सालीं सेनाधिकाऱ्यांनीं उठावणी करून कारभार पूर्णपणें आपल्या ताब्यांत घेतला तेव्हां मार्शल पिबुन यांनीं सरसेनापतिपद स्वीकारलें. तीन महिन्यांनंतर राष्ट्रहितरक्षणार्थ ते पंतप्रधानहि झाले.

## जपानी वृत्तपत्रांतील मार्शल संग्राम यांचें चरित्र

टोकियो येथें प्रसिद्ध होणाऱ्या 'निप्पॉन टाइम्स' या इंग्रजी दैनिकाचे १४ जुलै १९४३ च्या अंकांत त्या पत्राच्या खास बातमीदारानें धाडलेलें मार्शल पिबुन संग्राम यांचें चरित्र पुढीलप्रमाणें प्रसिद्ध करण्यांत आलें होतें.

फील्ड मार्शल पंतप्रधान प्लॅक पिबुन संग्राम यांचा जन्म १४जुलै१८९७ रोजीं बँकॉकनजीक अंफुन बांगकाने जिल्ह्यांत वडिलांच्या शेतीवर झाला. त्यांचे वडील थायलंडचे गृहखात्यांत नोकरीस होते. दुय्यम शिक्षणानंतर पिबुननें बँकॉक येथील ज्यूनियर कॅडेट स्कूलमध्यें १२ मे १९०९ रोजीं प्रवेश केला. त्या ठिकाणीं सहा वर्षे शिक्षण घेऊन १२ मे १९१५ रोजीं तोफखान्यांतील सब लेफ्टनंटचा दर्जा घेऊन तो बाहेर पडला. १९२० सालीं त्यांस लेफ्टनंट करण्यांत आलें. पुढील वर्षी लष्करी अधिकाऱ्यांच्या जनरल-स्टाफ ट्रेनिंग स्कूलमध्यें ले. पिबुन जाऊं लागला. १९२३ सालीं तेथील शिक्षण संपविल्यानंतर ले. पिबुननें फ्रान्समध्यें जाऊन फ्रेंच भाषा व गणित यांचा अभ्यास केला. त्यानंतर तोफखान्याचें अधिक शिक्षण घेण्यासाठीं फ्रेंच फौजेंतील तोफखाना डिव्हिजनमध्यें त्यानें अधिकाऱ्याची नोकरी पत्करली फाँतेव्लू येथील फ्रेंच तोफखान्याचे शिक्षणाच्या शाळेंत त्यानें १९२६मध्यें आपला अभ्यास पुरा केला. १९२७ च्या सप्टेंबरांत तो बँकॉकला परत आला.

१९२७ च्या ऑक्टोबरच्या एक तारखेस त्यांस कॅप्टन व १ एप्रिल १९३० रोजीं त्यांस मेजर हे हुद्दे देण्यांत आले. २४ जून १९३२ ला रक्तशून्य

राज्यक्रांति झाली. त्या वर्षी पिबुननें तोफखाना डिव्हिजनच्या कमांडरचा दुय्यम म्हणून काम केलें. त्यानंतर त्यास थाय मंत्रिमंडळांत एक जागा देण्यांत आली व संरक्षणखात्याच्या जनरल डिफेन्स कमिटीचा एक सभासद म्हणून त्याची नेमणूक झाली.

२२ सप्टेंबर १९३४ रोजीं त्यांस संरक्षणमंत्री म्हणून नेमण्यांत आलें. त्यापूर्वी त्यास थाय लष्कराच्या सरसेनापतीचा दुय्यम नेमण्यांत आलें होतें. १६ डिसेंबर १९३८ रोजीं कर्नल संग्राम थायलंडचा पंतप्रधान झाला. त्याच वेळीं तो संरक्षणमंत्री, गृहमंत्री व थाय लष्कराचा सेनापतीहि होता. १४ जुलै १९३९ रोजीं त्यानें परराष्ट्रखातेंहि स्वत:कडेच घेतलें. २७ ऑगस्ट १९४१ रोजीं त्यास थाय लष्कराचा सरसेनापति आणि थाय नौदल व हवाईदल यांचा स्पेशल कमांडर नेमण्यांत आलें. थोड्याच दिवसांत तो थाय संरक्षकदलांचा सर्वोच्च सेनापति झाला. २४ जानेवारी १९४२ रोजीं थायलंडच्या पीपल्स असेंब्लीनें एकमतानें पंतप्रधान संग्राम यांस राष्ट्रनेता म्हणून नेमून टाकलें. थायलंडच्या लोकसभेच्या निवडणुकी दर चार वर्षांनीं करण्याची पद्धति होती. १९४१ सालीं आग्नेय आशियांत युद्धास तोंड लागलें तेव्हां युद्धकालांत निवडणुकी तहकूब ठेवण्याचा ठराव त्या वेळच्या लोकसभेनें करून पंतप्रधान संग्रामला सर्वाधिकारी नेमून टाकलें. १९४१ सालीं संग्रामला लष्करांत मेजर जनरल करण्यांत आलें होतें. १९४१ सालीं त्याच्या देशसेवेबद्दल व लष्करी संघटनेच्या नैपुण्याबद्दल थायलंडचे राजेसाहेबांनीं त्यास फील्ड मार्शलचा किताब बहाल केला. २८ जुलै १९४१ रोजीं त्यांस फील्डमार्शल, फ्लीट अॅडमिरल आणि एअर-मार्शल असे तिन्ही हुद्दे देण्यांत आले. संरक्षणदलांतील सर्वोच्च मानाबरोबरच मुलकी कारभारांतील बहुतेक महत्त्वाच्या समित्यांचें सूत्रचालकत्व त्यांचेकडेच देण्यांत आलें थायलंडचे राजानें मार्शल संग्राम यांस सर्वोच्च पदव्या देऊन त्यांचा सन्मान केला. त्याचप्रमाणें जपानी बादशहानें त्यांस प्रथम 'फर्स्ट क्लास ऑर्डर ऑफ द रायझिंग सन' व नंतर 'ग्रँड कॉर्डन ऑफ द रायझिंग सन' हा मोठा मान बहाल केला. जर्मनी, इटली व फ्रान्स या देशांच्या सरकारांनींहि मार्शल संग्राम यांस उच्च किताब देऊन त्यांचा सन्मान केला. युद्ध चालू असतांना लष्कराप्रमाणेंच फील्ड पोलिसांवरील सर्वाधिकारहि त्यांचेकडेच सुपूर्त करण्यांत आला.

आपल्या प्राणापेक्षांहि अधिक प्रेम आपल्या देशावर करणारा पंत-प्रधान संग्राम हा थायलंडचा अव्वल दर्जाचा देशभक्त आहे. उच्चपदीं असतांहि त्याची प्रवृत्ति अगदीं नम्र भावाची असते. सारा दिवस तो कामांत असतो. सर्व कामांवर त्याची जातीनें कडक देखरेख असून रोजचें दप्तरी काम सांभाळून अनेक बैठकींना तो हजर राहतो. त्याचप्रमाणें थाय व परदेशी पाहुण्यांचीहि वास्तपुस्त काळजीपूर्वक करीत असतो. मार्शल संग्राम यांस एकवार भेटणाऱ्यासहि त्याची कार्यकुशलता व प्रेमळ स्वभाव यांची साक्ष पटते व त्यास संग्रामविषयीं प्रेम वाटूं लागतें. मार्शल संग्राम यांस खेळांची खूप आवड आहे आणि कामाच्या रणगाड्यांतून उसंत मिळतांच तो टेनिसचे एकदोन डाव खेळतो किंवा घोडदौडीस जातो.

मार्शल संग्राम जन्मजात सैनिक आहे. शौर्याचे कामीं त्याचा पाय नेहमीं पुढें असतो. त्याच्या कोशांत 'नाहीं' अगर 'अशक्य' हे शब्दच नाहींत. त्याचप्रमाणें कामापासून विश्रांति लागते हें त्यांस मान्य नाहीं. एकदा तो आजारी पडला असता डॉक्टरांनीं त्यांस विश्रांति घेण्यास सांगितलें. विश्रांति पुरेशी घेतली नाहीं तर दुखणें विकोपास जाईल असेंहि डॉक्टरांनीं सुचविलें. तेव्हां मार्शल संग्राम एकदम म्हणाले: "काम करण्याचें थांबविण्यापेक्षां काम करतां करतां मृत्यु आला तरी तो मला आवडेल!" अशा माणसांपुढें कोण काय सुचविणार? जो माणूस आपलें काम व्यवस्थित करीत नाहीं तो केवळ भूमीला भारच होय, तो जन्मला नसता तरी बरें झालें असतें अशी भाषा मार्शल संग्रामनें अनेक वेळा बोलून दाखविली.

मार्शल संग्राम यांचें कुटुंबसौख्य उत्तम प्रकारचें आहे. सर्व मुलामुलींचें शिक्षण चांगलें झालें असून दोन मुलगे व एक मुलगी या तिघांना शिक्षणासाठीं परदेशींहि धाडण्यांत आलें होतें. मार्शल संग्राम यांची पत्नी महिलावर्गातील जागृतीचें काम चांगल्या प्रकारचें करीत आहे. तिची संग्राम यांना नेहमींच मोठी मदत होत असते.

लष्करी, राजकीय व आर्थिक प्रश्नांप्रमाणेंच मार्शल संग्राम यांचा साहित्य व संस्कृति या क्षेत्रांतील पराक्रम मोठा आहे. इतिहासाचा त्यांचा

अभ्यास सखोल असून अनेक लेखहि त्यांनीं लिहिले आहेत. लोकमताला मान देण्याची मार्शल संग्राम यांची नेहमींचीच रीत असल्यामुळें सर्वसामान्य जनता त्यांच्या पाठीशीं सदैव खडी असते. लेखनाप्रमाणेंच वृत्तपत्रवाचनहि मार्शल संग्राम रोजचे रोज काळजीपूर्वक करतात. थाय प्रेस असोसिएशन काढण्यास त्यांनीं उत्तेजन दिलें व ते स्वत: त्या संस्थेचे एक आश्रयदाते झाले.

आपल्या देशबांधवांची सर्व क्षेत्रांत सातत्यानें प्रगति कशी होईल हाच एक निदिध्यास मार्शल संग्राम यांना लागलेला असतो. जनतेसाठींच्या योजनांचें काम करीत असतां वैयक्तिक सोयीगैरसोयी किंवा सुखदु:ख यांकडे ते कधींच लक्ष देत नाहींत. युद्धकाळांतहि आपल्या देशाची प्रगति खुंटू नये यासाठीं मार्शल संग्राम नित्य नव्या गोष्टींचा विचार करून जनहिताच्या योजना अंमलांत आणीत असत. देशहितरक्षणार्थ थायलंडच्या संरक्षक-दलाच्या घटकांनीं केलेल्या त्यागाचें योग्य तें कौतुक ते तत्परतेनें करतात; त्यामुळें त्यांच्यावर या घटकांचें पित्याप्रमाणें प्रेम आहे. देशांत दौऱ्यावर असतांना संरक्षणकेंद्रांना भेटी देऊन कामावर असलेल्यांच्या सोयी-गैरसोयींची मार्शल संग्राम जातीनें चौकशी करीत असल्यामुळें सर्व सैनिक नि:संकोचपणें अवघड कामांतहि आघाडीवर जाण्यास उत्सुक असतात. लोकांचें ज्ञान वाढविण्यासाठीं वृत्तपत्रांप्रमाणें नभोवाणीचें महत्त्वहि त्यांस पटलें असून नभोवाणीचा अधिकाधिक प्रसार कसा होईल याविषयीं त्यांची खटपट असते.

## नौदल—समारंभांतून बंडखोरांनीं पळविलें

देशहितदक्ष व्यक्तींनाहि अनेक शत्रू असतात.तसेंच मार्शल संग्राम यांनाहि आहेत. स्वकीय आणि परकीय लोकांच्या पुरस्कारानें त्यांच्यावर अनेक वेळां मारेकरी घालण्यांत आले. परंतु त्या सर्वांतून ते सुखरूप बचावले आहेत. त्यांच्या देशहितदक्ष पण कठोर धोरणानें लहानमोठे कार्यकर्ते व नोकर कधींकधीं त्यांच्यावर रुष्ट होतात. त्यापैकीं कांहीं असंतुष्ट नौदल सैनिक अधिकाऱ्यांनीं २९ जून १९५१ रोजीं एका सार्वजनिक समारंभांतून मार्शल संग्राम यांना विजेच्या चपळाईनें पळवून नेलें. परंतु कौशल्यानें व धैर्यानें त्या प्रसंगांतून त्यांनीं आपली सुटका करून घेतली.

अमेरिकन सरकारनें थाय सरकारला खाडी–नदीच्या पात्रांतील गाळ व वाळू बाहेर काढणारें एक जहाज भेट म्हणून दिलें होतें. हें ड्रेजर जहाज स्वीकारण्याचा समारंभ २९ जून १९५१ रोजीं सायंकाळचा ठरला. समारंभासाठीं हजारों नागरिक, पोलीस अधिकारी, देशी व परदेशी पाहुणे असा सर्व थाट जमला होता. या समारंभांतील जहाजाचा स्वीकार करण्याकरितां मार्शल संग्राम हातांत सुवासिक पुष्पांची माला घेऊन त्या जहाजावर जाऊं लागतांच त्यांच्यावर बंडखोर नौदल सैनिकांनीं बंदुका रोखून त्यास गिरफदार केलें आणि क्षणार्धांत एका लहान होडींतून त्यांना पळविलेंहि ! कादंबरीला लाजविणारा हा चमत्कार अनुभवूनहि मार्शल शांत राहिले. सरकारी अधिकाऱ्यांनीं बंडखोरांचा बंदोबस्त करण्यासाठीं कडक उपाय योजिले. भूदल व हवाईदलाचे सैनिकांनीं तत्परतेनें नौदलाचे सैनिकांस वेढा देऊन तोफाहि डागल्या. मार्शल संग्राम ज्या होडींत होते तिच्यांतून त्यांनीं शिताफीनें उडी मारून पोहत जाऊन आपला बचाव केला. पुन्हां अधिकार हातीं घेतांच मार्शल संग्रामनें नाविकदलांतील सर्व बंडखोरांचा पूर्ण बंदोबस्त दोनच दिवसांत केला. थायलंडचा समुद्रकिनारा खूप लांबलचक आणि जुनी दर्यावर्दी परंपरा यामुळें नौदलाचें महत्त्व थायलंडमध्यें फार जुनें आहे. मार्शल संग्राम यांनीं एकमुखी संरक्षण योजना आंखल्यामुळें नौदलाचा सर्वाधिकार त्यांना आपल्या हातीं घ्यावा लागला. त्यामुळें रुष्ट झालेल्या नौदल अधिकाऱ्यांना मार्शलचा कांटा आपल्या मार्गांतून काढावयाचा होता. त्यासाठीं त्यांनीं असंतुष्टांना हाताशीं धरलें. शेवटीं नौदलबंड अयशस्वी ठरतांच मार्शल संग्रामनें नौदलप्रमुख ॲडमिरल लुआंग सिंधुसंग्राम व आठ व्हाइस ॲडमिरल आणि बारा इतर अधिकारी यांना सेवानिवृत्त केलें आणि थायलंडचें संरक्षणदल एकदिलानें देशसंरक्षणार्थ कायमचें दक्ष राहील अशी पक्की व्यवस्था करून टाकली.

## थायलंडपुढील नवीन प्रश्न

आग्नेय आशियांतील मोक्याचे जागीं असलेल्या आणि अन्न व रणसाहित्योपयोगी वस्तूंचा सांठा असलेल्या थायलंडच्या मार्शल पिबुन संग्रा-

मच्या जीवनांतील प्रमुख घटना आतांपर्यंत आपण पाहिल्या. देशहितासाठीं स्वहिताकडे दुर्लक्ष करणारा, सतत देशहिताचें काम करणारा संग्रामसारखा नेता जोपर्यंत थायलंडचा मुखिया राहील तोपर्यंत खुद्द त्या देशाला आणि त्याच्या शेजाऱ्यांना फार मोठा धोका निर्माण होणार नाहीं असें आतांपर्यंतचा इतिहास सांगत आहे. मॅनिला करारान्वयें सिद्ध करण्यांत आलेल्या आग्नेय आशिया लष्करी कराराचें केंद्रकार्यालय थायलंडच्या राजधानीच्या बँकॉक शहरांत राहूं देण्यास मार्शल संग्रामनें संमति दिली. अमेरिकेच्या सल्ल्यानुसार यूनोच्या निरीक्षकांना थायलंड-इंडोचायना सीमेवरील पंचमस्तंभ्यांच्या कारवायांवर देखरेख ठेवण्यासहि त्यानें पाचारण केलें. चिनी कम्युनिस्ट नेत्यांच्या पुरस्कारानें थायलंडच्या उत्तर सीमेपलीकडे चीनचे प्रदेशांत सिबसोंगपन्ना भागांतील कांहीं थाय व इतर टोळ्यांची संघटना करून जें "थाय लोकांचें स्वायत्त सरकार स्थापन झालें आहे त्याचें नेतृत्व थायलंडचा भूतपूर्व पंतप्रधान प्रिदी करीत आहे" असा प्रचार कांहीं अमेरिकन पुढाऱ्यांनीं करून मार्शल संग्रामला चीन-इंडोचायना-ब्रह्मदेशांपासून स्वतंत्र दूर ओढण्याचा प्रयत्न चालविला आहे. पूर्वीं एकवार देशसंरक्षणार्थ जपान्यांच्या योजनेंत भागीदार होण्यात मार्शल संग्रामनें जी भूमिका दाखविली होती तिचीच सुधारून वाढविलेली आवृत्ति मॅनिला करारांतील भागीदारींत मार्शल संग्रामनें काढली असेल तर त्यांत आश्चर्यकारक कांहीं नाहीं. चीन व इंडोचायना यांतील सत्ताधाऱ्यांना थायलंडचा घांस घेण्यापेक्षां स्वतंत्र थायलंड शेजारीं असणें अधिक आवडण्याची शक्यता आहे ही गोष्ट दूरदृष्टीचा मार्शल संग्राम डोळ्याआड करील असा त्यांचा आजपर्यंतचा इतिहास तरी खास सांगत नाहीं.

# ५ चीनचे राष्ट्रपति मौ त्से-तुंग

## नवचीनचें स्वप्न साकार होऊं लागलें

लंडन येथील "टाईम्स", पत्राच्या बातमीदारानें चीनचे सध्यांचे राष्ट्राध्यक्ष मौ त्से--तुंग यांना चीनमधील क्रांति यशस्वी होण्यापूर्वी त्यांच्या उद्दिष्टांविषयीं विचारलें होतें. तेव्हां त्यांनीं आपलें उद्दिष्ट पुढील-प्रमाणें सांगितलें होतें: "प्रत्येक माणसाला पोटभर अन्न व अंगभर वस्त्र



मिळालें पाहिजे. प्रत्येकाला नागरिकत्वाचे हक्क व कर्तव्यें यांची समजूत पटली पाहिजे. शिक्षण घेण्याची संधि व करमणूक करण्याची सोय मिळावयास हवी. विवाहपद्धतींत सुधारणा, नवीन रस्त्यांची आंखणी-बांधणी, कारखान्यांची वाढ व सहा तासांचा कामगारांचा दिवस आम्हांस प्रत्यक्षांत घडवून आणावयाचा आहे. कोणाहि माणसास दुसऱ्यावर जुलूम व जबरदस्ती करणें अशक्य झालें पाहिजे. समता, स्वातंत्र्य व बंधुभाव निर्माण करावा लागेल. सर्वजण मिळून जागतिक शांतता निर्माण करूं अशी धमक नागरिकांत निर्माण करावयाची आहे." भारतांत "रामराज्य" निर्माण करणाऱ्यांच्या मनांत अशाच कांहीतरी कल्पना तरळत असल्याचें त्यांच्या लेखनांत व वक्तव्यांत अधूनमधून दिसतें. चीनच्या मुख्य भूमीवर प्रजासत्ताक राज्याची

प्रस्थापना करणाऱ्या चिनी कम्युनिस्ट पक्षानें मौ त्से-तुंग यांच्या प्रमुखत्वाखालीं वर सुचविलेल्या गोष्टी बऱ्याच मोठ्या प्रमाणांत प्रत्यक्षांत आणावयाचयास सुरुवात केली आहे.

शेकडों वर्षे राजे व त्यांचे सरदार यांच्या जुलमी कारभाराखालीं संत्रस्त झालेल्या चीनच्या विशाल प्रदेशांतील कोटयवधि चिनी जनतेला एकोणिसाव्या शतकाचे मध्यापासून पुढें शंभर वर्षेपर्यंत पाश्चात्य राष्ट्रांतील महत्त्वाकांक्षी राजकारणी-अर्थकारण्यांच्या लूटमारीला बळी पडावें लागलें. झोपीं गेलेल्या चिनी राष्ट्रपुरुषाला जागृत करण्यासाठीं १९११ सालीं डॉ. सन्यत्सेनप्रभृति क्रांतिकारकांनीं मोठी उसळी मारली आणि मध्ययुगीन मांच्यू घराण्याची राजवट धुळीला मिळविली. तथापि देशांतील सर्वसामान्य जनता-शेतकरी-या क्रांतींत मोठ्या प्रमाणांत संघटित होऊन भागीदार झालेकी नसल्यामुळें या राष्ट्रव्यापी क्रांतीच्या अखेरीस मोठाले जमीनदार व खाजगी फौजफांटा ठेवून मन मानेल तसा प्रांतिक कारभार करणारे सरदार यांनीं चिनी प्रजेची भरमसाट पिळवणूक चालूच ठेवली. त्यांना अधूनमधून परक्या राष्ट्रांच्या स्वार्थी व्यापाऱ्यांचें भरपूर साहाय्य होत असें. चिनी जनतेची स्वत्वाची भावना जागृत करावी आणि समाजासाठीं स्वार्थत्याग करण्याची, स्वतःचा देह खर्ची घालण्याची इच्छा निर्माण व्हावी यासाठीं प्रयत्न करणारे अनेक देशभक्त चीनमधील निरनिराळ्या पक्षांत होते. त्या सर्वांची एकी होऊन जपानच्या १९३१ सालच्या मांचुरियावरील स्वारीला एकमुखी विरोध होऊं शकला नाहीं. त्यामुळेंच प्रभावी स्वतंत्र सार्वभौम चीनची प्रतिष्ठापना होण्यास १९४९ साल उजाडावें लागलें.

## चिनी प्रजासत्ताकाचे मान्यतेचा प्रश्न

चीनचे भूमीवर कुओमिटांग पक्षाचे प्रमुख मार्शल चियांग कै शेक आणि कम्युनिस्ट पक्षाचे मौ त्से-तुंग व चौ एन लाय यांचें सहकार्य, १९२७ सालीं चियांगनें केलेल्या कम्युनिस्टाचे कत्तलीनें नष्ट झालें नसतें तर चीनच्या भूमीवर पाय ठेवणेंहि जपान्यांना मुष्किल झालें असतें. तथापि चीनसारख्या महाप्रचंड व अति प्राचीन राष्ट्राच्या अस्मितेचा लढा शेवटीं यशस्वी होतांना त्यास

दुर्दैवानें दुहीचें गालबोट लागणें आवश्यक ठरलें. मार्शल चियांगनें व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठीं गेलीं वीस वर्षें जो लढा ( प्रथम चीनच्या मुख्य भूमीवर व १९४९ नंतर फोर्मोसांतून अमेरिकेच्या मदतीवर विसंबून ) चालविला त्याची समाप्ति अजून झाली नाहीं. मुख्य भूमीवर स्थापन झालेल्या चीनच्या प्रजासत्ताक राज्यास मान्यता नाकारणाऱ्या आणि पिटुकल्या फोर्मोसा बेटावर आश्रयार्थ पळून आलेल्या चियांग कै शेकला पैसा व लष्करी साहित्य पोचविणाऱ्या व त्याला नौदलाचें सरक्षण देणाऱ्या अमेरिकेच्या धोरणामुळें अतिपूर्वेकडील राष्ट्रांत व पश्चिम पॅसिफिकमध्यें गेलीं सहा वर्षें वरीच अशांतता माजली आहे. या काळांत कोरिया व इंडोचायना या दोन देशांत यादवी युद्धें झालीं. त्यांतील कांहीं घटनांमुळें नवचीनच्या सामर्थ्याची जगाला खात्री पटली. चीनच्या मुख्य भूमीवरील ६० कोटी चिनी जनतेचें प्रतिनिधित्व करणाऱ्या पिकिंग येथील चिनी सरकारला अमेरिका आणि पर्यायानें अमेरिकेच्या तंत्रानें चालणारीं इतर राष्ट्रें व राष्ट्रसंघ मान्यता देत नाहींत; त्यांत अमेरिका आपल्याच जुन्या धोरणाची पायमल्ली करीत आहे. या प्रकरणीं १९११ सालच्या चिनी क्रांतीचे वेळची एक गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे. १९१२ सालीं चिनी लोकसत्ताक स्थापन करणाऱ्या डॉ. सन्यत्सेन यांनीं त्या वेळचे अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. विल्सन यांना चीन सरकारला मान्यता देण्याविषयीं विनंति केली होती. तेव्हां त्या वेळचे अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री वुइल्यम जेनिग्ज यांनीं परराष्ट्रांना मान्यता देण्याबाबतचे अमेरिकेचें धोरण कोणत्या तत्त्वांवर आधारलेलें आहे याची विचारणा आपल्या खात्याकडे केली. उप–परराष्ट्रमंत्री अल्वे ए. अॅडी यांनीं सांगितलें कीं ज्या सरकारास मान्यता द्यावयाची त्या नव्या सरकारचा आपल्या देशांतील कारभारावर ताबा असला पाहिजे, तो ताबा त्या देशांतील जनतेनें मानला पाहिजे आणि तें सरकार आंतरराष्ट्रीय व रूढ करारमदार पाळण्यास तयार असलें पाहिजे. त्या सरकारचें स्वरूप काय आहे ही गोष्ट गौण मानण्यांत यावी.

१९४९ सालीं पिकिंग येथें स्थापन झालेल्या चिनी प्रजासत्ताक राज्याचें स्वरूप कम्युनिस्ट पद्धतीचें आहे असें म्हणून त्या सरकारास अमेरिकेनें

अद्याप मान्यता दिलेली नाहीं. मात्र रशिया, भारत-ब्रिटनप्रभृति अनेक राष्ट्रांनीं मान्यता दिली आहे. परंतु कोरिया-युद्धाचे अखेरीस व इंडोचायनांतील यादवी-युद्धाचा विचार जीनिव्हा परिषदेंत झाला त्या वेळीं अमेरिकन मुत्सद्यांनीं चीनच्या या सरकारचे प्रतिनिधींबरोबर वाटाघाटी व करारमदार करण्यास फारशी खळखळ केलेली नाहीं.

## दोन प्रजासत्ताकांच्या दरम्यानच्या उलाढाली

चीनचे राष्ट्रपति मौ त्से-तुंग यांच्या कर्तबगारीची कल्पना येण्यासाठीं डॉ. सन्यत्सेन यांनीं १९१२ सालीं स्थापन केलेल्या चिनी प्रजासत्ताकापासून १९४९ सालीं पिकिंग येथें दुसरें प्रजासत्ताक स्थापन होईपर्यंतच्या काळांतील अगदीं महत्त्वाच्या घडामोडींचा धांवता आढावा घेणें जरूरीचें आहे. मांच्यू राजघराण्याला पदच्युत करून प्रजासत्ताक स्थापणाऱ्या डॉ. सन्यत्सेननें राष्ट्रीयत्व, लोकशाही व लोकोपजीवन (समाजवाद) या तीन तत्त्वांवर क्रांतीचा कार्यक्रम आंखला होता. सोव्हिएट रशियाच्या स्थापनेपासून त्याच्या पुढाऱ्यांनीं चिनी क्रांतीविषयीं आपुलकी दाखविली होती. १९२१ सालीं चीनमध्यें कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यांत येऊन कामगार संघटनेचें काम या पक्षानें हातीं घेतलें. हा क्रांतिकार्यक्रम पार पाडण्यासाठीं सन्यत्सेननें कुओमिटांग पक्षाची पुनर्घटना करण्यासाठीं १९२४ मध्यें परिषद बोलविली. नवीन जाहीरनाम्यांत जमिनीची समान वांटणी, मोठ्या व लोकोपयोगी उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण, सरकारी मालकीच्या भांडवलाला उत्तेजन, विषमतामूलक तह रद्द करणें, भाषणस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य, किसान-कामगार-संघटना, चीनमधील घटक प्रांतांना स्वयंनिर्णयाचा हक्क या गोष्टी नमूद करण्यांत आल्या होत्या. कुओमिटांगला सल्लामसलत देण्यासाठीं १९२७सालापर्यंत रशियन सल्लागारहि होते. परंतु या पक्षांत दोन मोठे-डावे व उजवे-गट प्रभावी होऊन पक्ष फुटण्यापर्यंत पाळी गेली. उजव्या गटाचे नेते चियांग कैशेक व डावा गट कम्युनिस्टांचे वतीचा. त्यामुळें त्या दोघांत फारच वैमनस्य निर्माण होऊन चियांग विरुद्ध कम्युनिस्ट लढा सुरू झाला तो अद्यापि चालू आहे. फक्त मध्यंतरी दुसऱ्या महायुद्ध-कालांत कांहीं काळ अमेरिकेच्या आग्रहाखातर त्यानें कम्युनिस्टांशीं सलोखा राखला होता. अमेरिकेनें यादवी-

युद्धांत शेकडों तज्ज्ञ लष्करी अधिकारी आणि चतुरंग दल सिद्ध करण्याइतकें भरपूर रणसाहित्य मार्शल चियांग कैशेकला अव्याहतपणें पुरविलें असतांहि कम्युनिस्टांबरोबरच्या लढयांत त्यांस हार खावी लागून जीव बचाविण्यासाठीं मुख्य भूमीवरून परागंदा होऊन फोर्मोसा बेटांत पळ काढावा लागला.

## मौ त्से-तुंगचें बालपण

चीनच्या हुनान प्रांतांतील शौशान या लहानशा खेडयांत मौ त्से-तुंगचा जन्म १८९३ सालीं झाला. त्याचे वडील मौजेन-शेंग सुरुवातीस छोटे गरीब शेतकरी होते. परंतु काटकसरीची राहणी आणि कष्ट यामुळें त्यांनीं पुढें खूप कमाई केली. धान्याच्या व्यापारांतहि त्यांनीं पैसा मिळविला व पुष्कळ जमीन खरेदी केली. मौ चे वडिलांनीं बरींच वर्षें लष्करांतहि नोकरी केली. मौ च्या आईचें माहेरचें नांव वेन शि-मेई असें होतें. मौ दहा वर्षांचा झाला तेव्हां त्यांच्या घरीं वडील, आई, आजोबा, धाकटा भाऊ व मौ असे पांचजण होते व ही सर्व मंडळी घरच्या शेतांवर कामें करीत. हंगामाचे वेळीं एकदोन रोजगारी नोकरहि लावले जात. मौ ला सहाव्या वर्षांपासूनच शेतावर राबावें लागलें आहे. वयाचे आठवे वर्षी मौ गांवच्या शाळेंत जाऊं लागला. तेराव्या वर्षांपर्यंत तो तेथें होता. पहांटे, सकाळीं आणि रात्रीं शेतावर काम करावें आणि दुपारीं शाळेंत जाऊन कॉन्फ्युशियसचीं पुस्तकें अभ्यासावीं असा आयुष्यक्रम चालू होता. मौ नें शाळेंतील एक आठवण पुढीलप्रमाणें सांगितली आहे: माझ्या शाळेंतील मास्तर फार मारकुटा असल्यामुळें दहा वर्षांचा असतां मी एक दिवस शाळेंतून पळून गेलों. शाळा व घर दोन्ही नको म्हणून मी खूपखूप भटकलों परंतु दुसऱ्या गांवाचा रस्ता पक्का माहींत नसल्यामुळें तीन दिवस अहोरात्र माझा शोध घेणाऱ्या वडिलांच्या हातीं सांपडलों. गांवापासून मी तीन मैलांपेक्षां दूर गेलोंच नव्हतों. फरारी होण्याचा माझा प्रयत्न अगदींच फुकट गेला नाहीं. मास्तर आणि वडील यांनीं त्यानंतर मला फारसें बडविलें नाहीं!

आपल्या आई-वडिलांविषयीं मौ लिहितात कीं "मला चार अक्षरें लिहितां-वाचतां येऊं लागतांच मी घरचा जमाखर्च ठेवावा असा लकडा

वडिलांनीं माझ्या मागें लावला. काम चोपून कसें घ्यावें हें त्यांना चांगलें समजे. मी अभ्यास करीत नसलों कीं ते मला शेतीच्या कामाला जुंपीत त्यांचा स्वभाव फार तापट होता. त्यामुळें मला व माझ्या भावासहि ते अनेक वेळां ठोकून काढीत. आम्हांला खाऊसाठीं ते कधींहि पैसे देत नसत. अन्नहि पोटभर दिलें जात नसें. शेतावरच्या कामगारांना आमचे वडील पंधरवड्यांतून एकदा भाताबरोबर अंडीं देत, मांस देत नसत. परंतु मला मात्र अंडीं अगर मांस भाताबरोबर केव्हांच दिलें नाहीं. माझी आई स्वभावानें प्रेमळ होती. ती आम्हां भावंडांबरोबर व गडीमाणसांशीं प्रेमानें वागे. दुष्काळामुळें गरीब लोक भीक मागण्यासाठीं अधूनमधून आमच्या दारीं आले कीं आई त्यांना तांदूळ देई. परंतु आईचें हें वागणें वडिलांना नापसंत असें. कोणासहि भीक घालू नये असा त्यांचा आग्रह; त्यामुळें घरांत या प्रश्नांवर भांडणें होत."

मौ चे आपल्या वडिलांबरोबर अधूनमधून खटके उडत. तेरा वर्षांचा असतां एकदा त्याचे वडील पाहुण्यांसमोर त्याला टाकून बोलल्यामुळें तो घर सोडून निघून गेला. त्याच्या आईनें त्याचेमागें धांवत जाऊन त्याला परत आणलें. मौ नें वडिलांची क्षमा मागितली व वडिलांनीहि त्यास पुन्हां टाकून बोलणार नाहीं व मारणार नाहीं असें कबूल केलें. हा तटा मिटून संपला तरी मौ ला वडिलांच्याविषयीं अढी बसली ती कायमची.

## शहरांत धान्य आहे, दंगे कां !

शाळेंतील अभ्यासांत झटपट प्रगति दाखविणाऱ्या मौ ला तेथील जग लहान वाटूं लागलें. शाळेंतील पुस्तकांबरोबरच मौ चिनी पुराणांतील गोष्टींची व काव्यांचीं पुस्तकें वाचूं लागला. त्यांतील बंडखोर त्याला आवडले. सोबत्यांनाहि तो या गोष्टी सांगे. मास्तरांचा विरोध असला तर चोरून असलीं पुस्तकें मौ वाचीत असे.

या साऱ्या कथांमध्यें नायक म्हणून कोणीच शेतकरी नाहीं याबद्दल मौ ला खेद होई. याच वेळीं त्यास एक " इशाऱ्याचे बोल " नांवाचें पुस्तक वाचावयास मिळालें. रेल्वे, टेलिफोन, तार इत्यादि पाश्चात्य जगां-

अनुक्र. ... विभाग ... क्र. ... दि. ...

तील सुधारणा चीनमध्यें अंमलांत आणण्यांत चिनी लोक पुढाकार घेत नसल्यामुळ चीन राष्ट्र मागें पडत आहे असें त्यांत लिहिलें होतें. या पुस्तकामुळें पाश्चात्य शास्त्रांचें शिक्षण घेण्याची मौला इच्छा झाली. वडिलांची इच्छा त्यानें मुलकी वकील होऊन व्यापारधंद्यांत मदत करावी अशी होती. तेराव्या वर्षी स्थानिक शाळेंतील अभ्यासक्रम संपवून मौ दिवसभर शेतीचें काम पाहूं लागला. त्याचें वाचन चालूच होतें. अधिक शिकण्यासाठीं दुसऱ्या मोठ्या गांवीं धाडण्यास वडील तयार नसल्यामुळें मौ घर सोडून निघाला.एका बेकार मित्राचे घरीं राहून त्यानें सहा महिने अभ्यास केला. त्यानंतर एका चिनी पंडिताकडे राहून त्यानें पुष्कळ जुनें चिनी वाङमय व नवीन ग्रंथ वाचले.

याच सुमारास भुकेनें उपासमार झाल्यामुळें अगतिक झालेल्या जनतेच्या– शेतकऱ्यांच्या उठावणीच्या दोन घटना मौ च्या नजरेस पडल्या आणि त्यांचा त्याचे मनावर खूप खोल परिणाम झाला. कडक दुष्काळामुळें पुष्कळ शेतकऱ्यांना व चांगशा शहरांतील कामगारांना उपासमारीस तोंड देण्याची पाळी आली. चांगशा शहरांत हजारों लोकांना चोवीस तासांत एकदाहि दोन घांस मिळण्याची मारामार पडूं लागली. दुष्काळपीडित लोकांनीं एक शिष्टमंडळ प्रमुख मुलकी कारभाऱ्यांकडे नेलें. तेव्हां त्या कारभाऱ्यानें उद्दामपणें उत्तर दिलें कीं, शहरांत भरपूर धान्य आहे आणि मला तिन्हींत्रिकाळ हवें तेवढें अन्न मिळूं शकतें ! अधिकाऱ्यांच्या या उद्दामपणाबद्दल लोकांनीं दंगे केले. बाहेरच्या व्यापाऱ्यांनीं शहरांतून पळ काढला. अन्नासाठीं दंगल करणाऱ्यांनीं शहरांतील मांच्यूंचा ध्वजस्तंभ कापून टाकला व प्रमुख कारभाऱ्यास हांकलून दिलें. या उठावणीचें कारण जाणणाऱ्या चँग नांवाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानें लोकांना मदत देण्याचें आश्वासन दिलें; तेव्हां चीनच्या मांच्यू घराण्याच्या बादशहानें चँगवर बंडखोरीचा आरोप ठेवून त्यांस कामावरून दूर केलें. नव्यानें आलेल्या वरिष्ठाधिकाऱ्यानें सैनिकांच्या जोरावर बंड मोडलें. बंडाच्या पुढाऱ्यांना पकडून जाहीरपणें फांशीं देऊन बंडखोरांना जरब बसविण्याचा प्रयत्न केला.

खुद्द मौ च्या जन्मगांवींच जमीनदार व शेतकऱ्यांचा एक गट यांच्या दरम्यान झगडा होऊन अखेरीस जमीनदार–विरोधी गटाला डोंगराचा आश्रय

करावा लागला. त्यांच्या प्रमुख बंडखोराला पकडून आणून फांशीं देण्यांत आलें. या बंडांतील प्रकरणाची चर्चा-चिकित्सा शाळकरी पोरांतहि झाली. आणि उपासमारीनें पीडिलेल्या शेतकऱ्यांचे बाजूनेंच सर्वसामान्य लोकांचा कल असल्याचें दिसलें. देशांतील शासनकर्त्यांना गरीब रयतेची पर्वा नाहीं आणि भुकेनें व्याकूळ झालेल्यांना फांसावर चढविण्यांतच शासनकर्ते भूषण-मोठेपणा-मानतात याबद्दल मौ व त्याच्या अनेक मित्रांना चीड आली.

## गुलामीचें लक्षण असणारी लांब शेंडी कापली

खेड्यांतील शिक्षण संपविल्यानंतर प्रांतिक राजधानीच्या चांगशा शहरांत शिकण्यास जाण्याची मौ ची खूप इच्छा होती. त्याचे वडील या गोष्टीस तयार होईनात, अखेरीस मौ नें चांगशाचें प्रस्थान ठेविलें. सुमारें ४०-४५ मैल अंतर तो चालत गेला. तेथील एका मोठ्या शाळेंत त्यास प्रवेशहि मिळाला. या ठिकाणीं प्रथमच मौ ला 'लोक-शक्ति' नांवाचें वृत्तपत्र वाचावयास मिळालें. मांच्यु घराण्याविरुद्धच्या कँटन शहरांतील बडाळीचें वर्णन या राष्ट्रीय क्रांतिवादी पत्रांत त्यानें वाचलें. याच वेळीं डॉ. सन्यत्सेन यांचेविषयीं मौ त्से-तुंगला माहिती मिळाली. चीनमधील पहिल्या क्रांतीचे ते दिवस होते. देशांत सर्वत्र उठावणी व्हावी यासाठीं राष्ट्रीय क्रांतिवादी खटपट करीत होते. मौ लाहि स्फूर्ति आली व त्यानें एक हस्तलिखित वृत्तपत्र लिहून काढून तें शाळेंतील भिंतीवर चिकटवून आपलीं राजकीय मतें जाहीर केलीं.

या वेळीं झेच्युआन-हँको रेल्वेसाठीं वापरण्यांत येणारें परकीय भांडवल व लोकसभेची मागणी यामुळें मोठें राजकीय आंदोलन सुरू होणार असें वाटूं लागलें. मांच्यु बादशहानें लोकसभा स्थापन करण्याची मागणी झिडकारून फक्त एक सल्लागार मंडळ नेमण्याचें मान्य केलें. मांच्यु राजघराण्याच्या अंमलाविरुद्धची आपली भूमिका जाहीर रीतीनें प्रकट करण्याची समाजांतील निरनिराळ्या थरांत खटपट चालू होती. विद्यार्थीवर्गांतहि हें वारें शिरलें होतें. चिनी लोकांत लांब शेंडी ठेवण्याचा जुना प्रघात होता. परंतु मांच्यु घराण्यानेंच तो गुलामीची खूण म्हणून चिनी जनतेच्या माथीं

मारली आहे अशा प्रचार विद्यार्थीवर्गांत सुरू झाला. या गुलामीच्या खुणेला मूठमाती देण्याचा निर्धार मौ नें केला. तो व त्याचा आणखी एक स्नेही अशा दोघांनीं आपल्या लांब शेंड्या कापून टाकल्या. इतर विद्यार्थी सुरुवातीस मौ बरोबर बोलण्यापुरतें होते; परंतु प्रत्यक्ष कृतीची वेळ येताच त्यांनीं माघार घेतली. लांब शेंडी कापून टाकावी कीं नाहीं याबद्दल विद्यार्थ्यांच्या गटागटांत कडाक्याची चर्चा होऊं लागली.

## लष्करांत नोकरी व स्वतंत्र वाचन

वुहानमधील क्रांतीच्या वेळीं लष्करी कायदा पुकारण्यांत आला. त्या वेळीं एका क्रांतिकारकानें मौ च्या शाळेंत येऊन आवेशयुक्त भाषण करून क्रांतीसाठीं लष्करभरतीची आवश्यकता प्रतिपादिली. या उठावणीचें पुढारीपण करणाऱ्या ली युआन हुंगचे फौजेंत मौ व त्याचे कांहीं दोस्त भरती झाले. या वेळीं त्यांस दरमहा सात चिनी डॉलर पगार मिळे. जेवणखाण्याचा खर्च काटकसरीनें करून उरलेल्या पैशांत तो वर्तमानपत्रें विकत घेई. या पत्रांत त्या वेळीं समाजवादाची चर्चा केली जाई. समाजवादी तत्वज्ञानावरचीं कांहीं पत्रकेंहि या काळांत मौ नें वाचलीं. कुओमिटांगचे नेतृत्वाबद्दल झगडे चालू होते व दोन गटांत चकमकी उडण्यापर्यंत मतभेद विकोपास गेले. परंतु सन्यत्सेन व युआन शी काई यांचें एकमत होऊन उत्तर-दक्षिणेंतील पुढारी एक होऊ शकले. तेव्हां मौ नें सहा महिन्यांतच लष्करी नोकरीचा राजीनामा दिला. शाळेंत न जातांच अभ्यास करण्याचें त्यानें आतां ठरविलें. या वेळीं तो नियमितपणें सहा महिनें हुनान प्रांतिक वाचनालयांत जात असे. कोठल्यातरी शाळेंत गेल्याखेरीज खर्चासाठीं घरून पैसे मिळणार नाहींत. असें पाहिल्यावर मौ नें हुनान नॉर्मल स्कूलमध्यें आपलें नांव घातलें. तेथें पांच वर्षें अभ्यास करून शाळेची शेवटची परीक्षा देऊन त्यानें पदवी मिळविली. याच वेळीं. तुंग मिग हुई या क्रांतिकारक गुप्त मंडळाची माहिती त्यास मिन् पाव-( लोकपत्र ) नांवाच्या वृत्तपत्राच्या जुन्या अंकांत वाचण्यास मिळाली. अशाच तऱ्हेनें एक मंडळ आपण काढावें असें मौ ला वाटूं लागलें व त्यानें लोकशिक्षण मंडळ. नांवाचें. एक तरुणांचें मंडळ स्थापन केलें.

हुनान प्रांतिक वाचनालयांत जात असतांना मौ त्से-तुंगनें अॅडाम स्मिथचें 'वेल्थ ऑफ नेशन्श,' डार्विनचें 'ऑरिजिन ऑफ दि स्पेसीज' हीं पुस्तकें वाचलीं. त्याशिवाय जॉन स्टुअर्ट मिल, रूसो, स्पेन्सर, माँतेस्क्यू यांचेहि ग्रंथ त्यानें वाचले. प्राचीन ग्रीकच्या कथा आणि रशिया, अमेरिका, इंग्लंड, फरान्स आदि राष्ट्रांचे इतिहास व भूगोल यांचाहि त्यानें खूप अभ्यास केला.

अमेरिकन क्रांतींतील जॉर्ज वॉशिंग्टन या सेनानीनें किती कष्टमय वातावरणांत आपलें अंगीकृत कार्य यशस्वी रीतीनें पार पाडलें याचा ठसा मौ च्या हृदयावर बराच खोल गेला असें त्यांचे चरित्रकार सांगतात. "आठ वर्षांच्या कठीण युद्धकालानंतर अखेरीस वॉशिंग्टननें विजयश्री मिळवून राष्ट्राची उभारणी केली" हें अमेरिकन इतिहासांतील वाक्य मौ त्से-तुंगला आपल्या अंगीकृत कार्यांत अत्यंत उत्साहवर्धक वाटलें. दीर्घ प्रयत्नांशिवाय व असीम कष्टाविना नवराष्ट्रनिर्मितीचें ध्येय प्रत्यक्षांत आणतां येत नाहीं हा महत्त्वाचा सिद्धांत मौपुढें सातत्यानें असल्यामुळेंच कितीहि अडचणी आल्या व कष्ट पडले तरी अंगीकृत कार्यापासून तसूभरहि ढळावयाचें नाहीं हें सूत्र मौ त्से-तुंगनें आपल्या नित्याच्या वागणुकीनें केवळ आपल्या सहकाऱ्यांनाच नव्हे तर साऱ्या जगाला दाखविलें.

## भावी आयुष्यासाठीं कणखर तयारी

आपल्यासारखेच देशनिष्ठ व क्रांतिकारक विचाराचे मित्र गोळा करण्यासाठीं मौ त्से-तुंगनें चांगशा येथील एका वृत्तपत्रांत जाहिरात दिली कीं, 'देशहिताचे कामांत पडूं इच्छिणाऱ्या तरुणांनीं मला येऊन भेटावें.' या जाहिरातीनुसार तीनच तरुण मौ चे भेटीस आले. तरी न डगमगता मौ नें तरुण मंडळींचा गट वाढविण्याचें काम सतत चालू ठेविलें. सहवास व चर्चा या दोन साधनांचा त्यानें उपयोग केला. ही मंडळी नेहमीं भारदस्त व गंभीर विषयांविषयीं बोलत व चर्चा करीत. कौटुंबिक गोष्टी किंवा प्रेमप्रकरणांची चर्चा करण्यास त्यांस वेळ नव्हता. मौ चौदा वर्षांचा अस-

तांना त्याच्या आईवडिलांनीं एका वीस वर्षे वयाच्या मुलीशीं मौ चें लग्न लावून दिलें होतें. परंतु मौ नें त्या मुलीबरोबर वैवाहिक जीवन कधींच कंठिलें नाहीं.

देशकार्यांत पडल्यावर कोणत्या वेळीं कसला प्रसंग येईल याचा नियम नसल्यामुळें सर्व हवामानांत व परिस्थितींत आपलें शरीर कणखर राखण्याचा कठोर अभ्यास या तरुण मंडळींनीं सुरू केला. मुसळधार पाऊस पडत असता अंगांतले कपडे काढून उघड्या अंगानें फिरणें, कडक उन्हाळ्यांत तसेंच फिरणें, बर्फ पडत असतांना उघड्यावर झोपणें, कडक हिवाळ्यांत नदीच्या गार पाण्यांत पोहणें, तटबंदीवर व डोंगरावर भटकणें असे या मंडळींचे नित्याचे उद्योग असत. १९१७ सालीं मौ नें स्थापन केलेल्या या तरुण मंडळाचे ८० सभासद होते व त्यांपैकीं अनेकांनीं पुढें कम्युनिस्ट पक्षांत अत्यंत महत्त्वाचीं कामें केली. मौ च्या तरुण मंडळासारखीं मंडळें पिकिंग, शांघाय, हँकौ वगैरे बहुतेक मोठ्या शहरांत सुरू झालीं. या सर्व मंडळांना 'नव जवान' (संपादक चेन तू सू) नांवाच्या मासिकाकडून स्फूर्ति मिळत असे.

## खुल्या जगांत अनिर्बंध संचार

हुनान नॉर्मल स्कूलचा अभ्यासक्रम संपल्यानंतर १९१९ ला मौ त्से-तुंग शांघायला गेले. त्या वेळीं त्याजपाशीं प्रवासापुरतेहि पैसे नव्हते. 'काम करून शिकणें' योजनेनुसार फ्रान्सला गेलेल्या विद्यार्थ्यांना निरोप देऊन मौ चांगशाला परतले व विद्यार्थ्यांच्या संघटनेची चळवळ सुरू केली. ते शिआंग-चिआंग या नियतकालिकाचे संपादकहि झाले. या विद्यार्थीसंघटनेनें हुनानच्या जुलमी अधिकाऱ्यांविरुद्धच्या चळवळीचें लोण पिकिंगपर्यंत पोचविलें. त्याचा परिणाम नियतकालिक बंद होण्यांत झाला. १९१९ सालीं मौ पुन्हा शांघाय येथें गेले त्या वेळीं त्यांनीं कम्युनिस्ट पुढारी चेन तू सू व इतर लोकांची भेट घेऊन विद्यार्थीचळवळीस त्यांचा पाठिंबा मिळविला. हुनान प्रांत-पुनर्घटनेसाठीं त्यांनीं नवीन संघ चांगशाला काढण्याचें ठरविलें. चांगशा येथे शिक्षकाची नोकरी पत्करून ते या कार्यांत सर्वस्वानें पडले.

या स्वातंत्र्यवाद्यांनीं हुनानच्या पार्लमेंटच्या इमारतीवर हल्ला करून सरकारी ध्वज खाली ओढला. १९२० सालीं रशियन क्रांति-वर्षदिनाची मिरवणूक पोलिसांनीं उधळली. १९२० सालीं राजकीय भूमिकेवरून कामगार-संघटना करण्याचे मार्ग मौ लागले. याच सुमारास त्यांनीं 'कम्युनिस्ट जाहीरनामा,' 'वर्ग कलह' व समाजवादाचा इतिहास हीं पुस्तकें वाचलीं. या वाचनानें ते मार्क्सवादी बनले. याच सुमारास त्यांनीं यांग कायी हुई नांवाच्या पेकिंग विद्यापीठांतील विद्यार्थिनीशीं लग्न केलें.

१९२१ सालीं शांघाय येथें चिनी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यांत आली. या सभेस मौ त्से-तुंग हजर होते. १९२१ च्या ऑक्टोबरमध्यें हुनान प्रांतिक कम्युनिस्ट पक्षशाखा सुरू करण्यांत आली. मौ तिचे सभासद झाले. याच सुमारास फ्रान्स-जर्मनींत शिकण्यास गेलेल्या चिनी विद्यार्थ्यांनीं कम्युनिस्ट पक्ष स्थापन केले. १९२२ च्या मेमध्यें मौ हुनान कम्युनिस्ट पक्षशाखेचे चिटणीस झाले. १९२३ मध्यें कँटन येथें कम्युनिस्ट पक्षाची तिसरी कॉंग्रेस झाली. तींत कुओमिटांगबरोबर सहकार्य करण्याचा व उत्तरेकडील लष्करशाहीविरोधी संयुक्त आघाडी उघडण्याचा ठराव करण्यांत आला. १९२४ च्या कँटन येथील कुओमिटांग पक्षाच्या पहिल्या कॉंग्रेसला मौ हजर होते. त्यानंतर मौ नें कम्युनिस्ट पक्ष कार्यकारी मंडळाचा सभासद व कुओमिटांग पक्ष कार्यकारी मंडळाचा सभासद अशा नात्यानें संयुक्त आघाडीच्या प्रचाराचें कामास सुरुवात केली. शांघायला विश्रांतीसाठीं थोडा वेळ जाऊन लगेच हुनानमधील शेतकरी संघटनेच्या मागें ते लागले. कम्युनिस्टांचे शेतकरीसंघटनेस जमीनदारांचा विरोध होता. मौ ला पकडण्यासाठीं लष्करी पथक येतांच पळून ते कँटनला गेले. तेथें त्यांस कुओमिटांग राजकीय खात्याच्या साप्ताहिकाच्या संपादकाचें काम देण्यांत आलें. किसान कार्यकर्त्यांच्या वर्गाचे शिक्षणाचें कामहि ते करीत. या वर्गास चीनमधील २१ प्रांतांतील शेतकरी संघांचे प्रतिनिधी आले होते.

## किसान संघटनांची उभारणी

कामगाराइतकें शेतकरी जागृत झालेले नसले तरी कामगारांप्रमाणेंच किंबहुना त्याहूनहि अधिक मोठ्या प्रमाणांत शेतकऱ्यांचें संघटन करण्यांत

आलें पाहिजे अशी मौ ची भूमिका होती. कामगारसंघटनेवर संतुष्ट राहणाऱ्या कित्येक कम्युनिस्ट नेत्याना हा नवीन विचार शंभर टक्के मान्य होत नव्हता. तथापि या विचारास बगल देणें अशक्य होतें. कम्युनिस्ट पक्षानें किसानसंघटनेची सारी जबाबदारी मौ वर टाकली. हुनानी शेतकरी संघटनेंतील अनुभवानुसार मौ नें "चिनी समाजांतील वर्गाचें पृथक्करण" हें पत्रक प्रसिद्ध केलें. किसानसंघटनेचें काम १९२७ पर्यंत हुपे, क्वांगसीं, फुकीन व हुनान या प्रांतांत इतकें प्रचंड वाढलें कीं कुओमिटांगला त्यांचें भय वाटूं लागलें. आतांपर्यंत कम्युनिस्ट पक्षाशीं सहकार्यानें वागणाऱ्या कुओमिटांगच्या चियांग कैशेकनें कम्युनिस्टांशीं १९२७ पासून उभा दावा सुरू केला. कम्युनिस्ट पक्षानें डॉ. सन्यत्सेनच्या लोकसत्तात्मक कार्यक्रमाचा पुरस्कार करून आपलीं स्वतंत्र सोव्हिएटें (स्वायत्त पंचायत राज्यें) स्थापन करण्याचें ठरविलें. त्यासाठीं कुओमिटांगमधील लष्कराच्या कांहीं तुकडयांचें लाल सेनेंत रूपांतर करून बंडाची तयारी केली. १ ऑगस्ट १९२७ ला बंडाचा उठाव नानचान येथें केला. वहुतेक मोठ्या शहरांत चियांग कैशेकनें कम्युनिस्टांच्या अनुयायांच्या कत्तली केल्या.

कुओमिटांगचा संबंध तोडणें, किसानकामगारांचें सैन्य उभारणें, जमीनदारांची मालमत्ता जप्त करणें, स्वतंत्र कम्युनिस्ट सत्ता हुनान प्रांतांत स्थापणें, खेड्यापाड्यांतून पंच-राज्यें स्थापणें अशा पांचकलमी कार्यक्रमाची उठावणी करण्यासाठीं कम्युनिस्ट पक्षानें मौ यांस चांगशाकडे पाठविलें. त्यानें हुनान प्रांतांत सैन्य-तुकड्या खड्या केल्या. या कामीं मौ ला अनेक नामवंत चिनी नेत्यांचें सहकार्य लाभलें. त्यांतच सध्यांचा चीनचा सरसेनापति च्यू लेह होता. चीनच्या इतर भागांतहि लाल फौजा उभारण्यांत आल्या. या सैन्यानें कुओमिटांगच्या लष्कराशीं अनेक लढाया दिल्या. त्यांत चिंगकानशान डोंगरानजीकच्या लढाया महत्त्वाच्या होत्या. या ठिकाणीं लाल फौज मोठ्या प्रमाणांत एकत्रित करण्यांत आल्यामुळें तिची उपासमार होऊं लागली. "भांडवलशाहीचा नाश करा व भुस्सा खा" अशी घोषणा त्यामुळें लाल सेनेंत त्या वेळीं प्रचलित झाली होती.

## लाल सैन्याचें तंत्र व कडक शिस्त

सुरुवातीस लाल सैन्यांत भरती होणाऱ्यांची विशेष तपासणी होत नसे. कामगार-किसानांतील उत्साही तरुणांस भरती करण्यांत येई. त्यामुळें प्रथम प्रथम गबाळेपणा दिसे. पण पुढें कडक शिस्त निर्माण करण्याचें धोरण मौ प्रभृति पुढाऱ्यांनीं अंगिकारिलें. शुद्ध चारित्र्य व शिस्त आवश्यक झाली. १९२९ च्या डिसेंबरांतील कम्युनिस्ट पक्षाचे परिषदेंत या विषयाची विशेष चर्चा झाली. लाल लष्कराचे ताब्यांत आलेल्या प्रदेशांत पुनश्च विरोधी कुओमिटांग फौज विजयी झालीच तर त्या फौजेची ससेहोलपट होईल इतकी जागृति किसानांत करण्यांत आली. १९२७ सालीं उभारण्यांत आलेल्या या फौजेची संख्या १९३० च्या सुमारास ६२००० वर गेली. या फौजेला आपल्या पांचदहा पट मोठ्या कुओमिटांग फौजेबरोबर सामना देण्याची वेळ भावी काळांत आली असतां या फौजेनें कच खाल्ली नाहीं याचें कारण या फौजेंतील कडक शिस्तींत होतें. गनिमी काव्यानें लढाई हे लाल फौजेचें मुख्य सूत्र असें. शत्रूच्या फौजा अंगावर घेत घेत मागें हटावयाचें व मग एकदम उलटून त्यांचा धुव्वा उडवावयाचा हें तंत्र फायद्याचें ठरे. युद्ध-भागांतील किसानांची सहानुभूति लाल सैन्याकडे असल्यामुळें पंचमस्तंभी धोक्याचें प्रमाण अत्यल्प असें.

लाल फौज स्वयंस्फूर्त जनतेची होती. तींत भाडोत्रीपणा नव्हता. खेड्यांत तिच्या पथकांचा मुक्काम पडल्यास खेडुतांना सैनिकांचा त्रास नसे. गांवकरी स्वागतच करीत. गरीब प्रजेला कोणत्याहि परिस्थितींत लाल फौजेनें लुटावयाचें नाहीं अशी कडक शिस्त होती. जमीनदारांची मालमत्ता ताब्यांत घेतल्यानंतर तिच्या वांटपाची व्यवस्था सेनानायकांकडे दिलेली असे व ती पूर्वयोजनेनुसार होई. शेतकऱ्यांचीं घरें लाल सैनिकांनीं वापरलीं तर घर सोडतांना शेतकऱ्यांचें नुकसान करूं नये, त्यांच्याशीं प्रामाणिकपणें व्यवहार करावा अशा कडक हुकुमाखालीं लाल सैनिक वावरत. सर्व प्रकारच्या पिळवणुकीपासून जनतेला मुक्त करून जनतेचें खरें राज्य स्थापन करण्या-करितां लाल सैनिक लढत आहेत अशी खात्री जनतेला वाटावी यासाठीं सर्व

सेनानींचा अट्टाहास असे. लाल सैन्यापाशीं लष्करी साधनसामुग्री तोकडी असली तरी जनतेचा खंबीर पाठिंबा असल्यामुळेंच चियांग कैशेकच्या प्रचंड व शस्त्रास्त्रसंपन्न सेनांना लाल सैन्य तोंड देऊं शकलें.

## वायकोस व बहिणींस शत्रूनें फांशीं दिलें

कियांगसी व युनान प्रांतांतील कम्युनिस्टांच्या भक्कम संघटनेमुळें चियांग कैशेक चिडून गेला. मौ त्से-तुंगनें केलेल्या शेतकऱ्यांच्या जागृतीबद्दल त्याला खाऊं कीं गिळूं असें चियांगला झालें. जो कोणी मौ त्से-तुंगला ( जिवंत अगर मेलेला ) पकडून देईल त्यास दोन लक्ष पन्नास हजार चिनी डॉलर बक्षिस मिळतील असें चियांग कैशेकनें जाहीर केलें. चौ एन लाय-प्रभृति आणखी कित्येक कम्युनिस्ट पुढाऱ्यांना पकडून देण्यासाठींहि अशींच मोठीं बक्षिसें जाहीर करण्यांत आलीं. कम्युनिस्टांच्या जमिनी जप्त करण्यांत आल्या आणि त्या नेत्यांचे जे नातवाईक चियांगच्या हातीं सांपडले त्यांचाहि छळ करण्यांत आला. कांहींना तर ठारहि करण्यांत आलें. चियांगच्या कुओमिटांग सरकारनें मौ त्से-तुंगची जमीन जप्त केली. त्याच्या बायकोला, मुलाला, बहिणीला व बायकोच्या दोघां भावांना पकडलें. बायकोला व बहिणीला नंतर फांशीं देण्यांत आलें. तथापि असल्या वैयक्तिक नुकसानीची कम्युनिस्ट जनता व तिचे नेते यांनीं पर्वा केली नाहीं. चियांगनें कम्युनिस्टांविरुद्ध लागोपाठ लक्षावधि सैनिकांच्या तुकड्या धाडल्या आणि या यादवी युद्धांत हजारों सैनिक व नागरिक ठार होऊन अपरिमित आर्थिक हानि झाली.

१९३१ च्या सप्टेंबरमध्यें जपाननें चीनच्या राज्यांतील मांच्युरियाचे प्रदेशावर हल्ला चढविला. मांच्युरियाचा घांस घेतल्यानंतर चीनचे लचके तोडल्याशिवाय जपान राहणार नाहीं अशी खात्री पटल्यामुळें कम्युनिस्ट नेत्यांनी चियांग कैशेकबरोबर सहकार्य करण्याची तयारी दाखविली. चिनी जनतेनें एकजूट होऊन परक्या जपान्यांशीं टक्कर द्यावी ही त्यांची सूचना चियांगनें धुडकावून लावली. चीनच्या भूमीवरील शेवटचा कम्युनिस्ट तुरुंगांत टाकीपर्यंत किंवा ठार मारीपर्यंत कम्युनिस्टांविरुद्धची मोहीम थांबविणार नाहीं असें मार्शल चियांग कैशेकनें जाहीर केलें.

१९३१ सालीं दक्षिण व मध्य चीनमध्यें बऱ्याच ठिकाणीं सोव्हिएटें स्थापण्यांत आलीं होतीं. मुख्य ठाणें कियांगसी प्रांतांत होतें. याच भागांत मौ त्से-तुंगच्या हाताखालीं मुख्य फौज होती. दुसरें केंद्र हुनान प्रांतांत होतें. १९३१ च्या डिसेंबरमध्यें चीनमधील सोव्हिएट लोकसत्ताक राज्याची पहिली कॉंग्रेस भरविण्यांत आली. सोव्हिएट सत्तेची संघटना, कामगार-वर्गाविषयींचे कायदे, जमीनवांटप, आर्थिक धोरण, अल्पसंख्य जमातींना संरक्षण, लाल फौजेची उभारणी व शिस्त या गोष्टींचा या कॉंग्रेसमध्यें विचार झाला. थोडक्यांत म्हणजे चीनमध्यें कम्युनिस्टांनीं स्वतंत्र लोकसत्ताक सोव्हिएट चीन स्थापन केलें. या कॉंग्रेसमध्यें मौ त्से-तुंगला मध्यवर्ति समितीचा अध्यक्ष नेमण्यांत आलें व त्याला पक्षाच्या मध्यवर्ति समितीचा चिटणीसहि निवडण्यांत आलें. १९३२ च्या एप्रिलमध्यें चिनी सोव्हिएट सरकारनें जपानविरुद्ध युद्ध पुकारलें.

## ३६८ दिवसांत ६००० मैलांची दौड

मार्शल चियांग कैशेकच्या नवनव्या मोहीमांमुळें कम्युनिस्टांनीं कियांगसी-हुनान प्रांतांतील आपलें मुख्य ठाणें हलवून चीनच्या वायव्य प्रदेशांतील शन्सी प्रांतांत नेण्याचें ठरविलें. शेन्सीची राजधानी येनान शहर सुमारें ६००० मैल अंतरावर होतें. हें अंतर एक वर्षांत गांठावयाचें असें मौ त्से-तुंगप्रभृति नेत्यांनीं ठरविलें. तिकडे जाण्याचा रस्ता दुर्गम पहाडांतून, जंगली लोकांच्या प्रदेशांतून, दुर्लंघ्य महानदांनीं व्यापलेल्या भागांतून जाणारा होता. ही दौड पायींच करावयाची होती. जातांना वाटेंतील सर्व प्रांतांतील जनतेचा संबंध कायम राखावयाचा होता. प्रवासांत चियांगच्या लष्करी पथकांबरोबर घनघोर युद्धें करावीं लागणार होतीं. बरोबर रेडिओ, छापखाना, लष्करी कारखाने न्यावयाचे होते. दौड गुप्तपणें १६ ऑक्टोबर १९३४ ला सुरू झाली. या दौडीचा कार्यक्रम मौ त्से-तुंगप्रभृति नेत्यांनीं निश्चित केला. या दौडीचे वेळीं सुरुवातीच्या एक लक्ष सैनिकांना किती भयंकर प्रसंगांस तोंड द्यावें लागले, किती हाल सोसावे लागले याचीं रोमहर्षक वर्णनें मुळांतूनच वाचावयास हवींत. लाल फौजेच्या मुख्य पलटणीं-

खेरीज वृद्ध, तरुण, स्त्री–पुरुष मुलें, शेतकरी अशीं हजारों माणसें दौडींत होतीं. ही दौड २० ऑक्टोबर १९३५ रोजीं संपली. ३६८ दिवसांच्या या दौडींत २३५ दिवस, दिवसा चाल झाली. १८ रात्रीं चाल करण्यांत आली. विश्रांतीच्या शंभर दिवसांपैकीं फक्त ४४ दिवस विश्रांति ५००० मैलांचे चालींत घेतली गेली. म्हणजे साधारण ११४ मैल चाल केल्यावर एक दिवस विश्रांति पडली. रोज २४ मैल चाल होत असे. या दौडींत १८ पर्वत रांगा ( वर्फाच्छादित शिखरांच्या ) व २४ महानद्या ओलांडल्या. १२ प्रांतांतून जातांना ६२ शहरें व्यापावीं लागलीं. जंगली टोळ्यांचे सहा टापूंतून वाट-चाल करावी लागली. सुरुवातीच्या लक्ष सैन्यापैकीं शेवटपर्यंत तीस हजार सैनिक जाऊन पोचले. वाटेनें कांहीं जागोजाग सोडण्यांत आले तरी निम्मे सैनिक या दौडीमध्यें मरण पावले.

## तीस लाल ताऱ्यांचें अपूर्व शौर्य

या दौडींतील एक अपूर्व शौर्याचा प्रसंग सांगितल्याशिवाय पुढें जाणें शक्य नाहीं. आन जेन चँगपासून पश्चिमेस १२५ मैलांवर तातू नांवाची नदी खोल अरुंद दऱ्यांतून मोठ्या वेगानें वहाते. या नदीवरील पहाडी मुल-खांतील सांखळदंडाचा झुलता पूल ओलांडण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. मोठ्या कष्टानें लाल सैन्य पुलाच्या दक्षिण बाजूस पोहोचलें. पुलाच्या उत्तर बाजूस चियांग कैशेकच्या सैनिकांनीं मशीनगनचे मोर्चे चहूबाजूंस लावले होते. पुलाचे १०० यार्डापेक्षां थोडे लांब असे सोळा सांखळदंड नदीच्या दोन्ही तीरांवरील खडकांत चुनेगच्चींत अडकवून नदीवर लोंबत होते. त्या सांखळ-दंडावर लांकडी फळ्या होत्या. परंतु कम्युनिस्ट दक्षिण टोकाशीं पोचतात तों त्यांना दिसलें कीं दक्षिण भागाकडील अर्ध्या पुलावरील फळ्या काढून टाकलेल्या आहेत. तेथें फक्त सांखळदंड होते. थांबून विचार करण्यास वेळ नव्हता. पूल ओलांडलाच पाहिजे ही निकड होती. मौ त्से-तुंग व त्याचे सह-कारी यांनीं सैनिकांमध्यें निर्माण केलेल्या निष्ठेची ती कसोटी होती. शत्रूंच्या गोळ्या खात पुलावर कोण जाणार असें पुकारतांच पंचविशींतील तीस तरुण लाल सैनिक तत्काल पुढें आले. त्यांच्या पाठीवर हातबाँब व पिस्तुलें

बांधण्यांत आलीं आणि लगेच या सैनिकांनीं सांखळदंडांस लोंबकळून झपाझप पुलाच्या उत्तर बाजूकडे जाण्यास सुरुवात केली. त्या बाजूस सज्ज असलेल्या शत्रूसैनिकांनीं साखळदंडास लोंबणाऱ्या लाल सैनिकांवर गोळ्या झाडण्याचा धडाका सुरू केला. एक, दोन, तीन सैनिक गोळ्या लागून खाली दरींतील तातू नदीच्या खोल पाण्यांत कोसळले व धो धो वहाणाऱ्या पुरांत दिसेनासे झाले. पण उरलेल्यांनीं काय केलें ? सहकाऱ्यांचें भीषण भवितव्य बघूनहि काडीमात्र माघार न घेता उरलेल्या सैनिकांनीं गोळ्यांच्या पाव-सास न जुमानता अर्धा पूल आक्रमून फळ्या गांठल्या. तडाक्यानें ते एका-मागून एक फळ्यावर चढले व धांवत जाऊन त्यांनीं शत्रूंच्या सैनिकांवर हात-बॉंबचा जोराचा मारा केला. इतक्यांत चियांग कैशेकच्या सैन्यांतील अधि-काऱ्यांनीं पुलाच्या फळ्यांवर तेल ओतून त्या पेटविल्या. तरीहि त्या आगीं-तून पुढें घुसून लाल सैनिकांनीं शत्रूचा धुव्वा उडविला, पळणाऱ्या शत्रु-सैनिकांवर त्यांच्याच मशीनगन्स चालविल्या. कांहींनीं फळ्यांची आग विझविली आणि तावडतोब नवीन फळ्या आणून साऱ्या पुलावर बसविल्या. लगोलग लाल सैन्य नदीपार जाऊ लागलें. देशासाठीं असीम त्यागास स्वयंसिद्ध होणाऱ्या या तीस शूर वीरांना लाल लष्करांतील अत्युच्च लाल ताऱ्यांचा लष्करी सन्मान अर्पण करण्यांत आला.

## कम्युनिस्टांनीं चियांगला कैदेंतून सोडविला

जपान्यांच्या आक्रमणास चिनी जनतेनें एकजुटीनें विरोध करावा यासाठीं १ ऑगष्ट १९३५ रोजीं कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ति समितीनें एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. मार्शल चियांग कैशेकच्या कांहीं सेनापतींना ह्या भूमिका मान्य होती. कम्युनिस्टांचा नायनाट करण्याच्या मोहीमेवर मार्शल चियांग कैशेक सियान ( पश्चिम चीन ) येथें आला असता चिनी सेनापति चँग सू लियांगनें त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु तो फलद्रूप झाला नाहीं. तेव्हां त्यानें आपल्या सहकारी चिनी सेनानींशीं संगन-मत करून मार्शल चियांग कैशेकलाच कैद केला ! सेनापति चँग सू लियां-गनें कम्युनिस्ट प्रतिनिधी चौ एन लाय व मार्शल चियांग कैशेक यांची भेट

घडवून आणली. कम्युनिस्ट व कुओमिटांग या दोघांनीं एकोपा करून जपानला तोंड द्यावें यासाठीं खूप खटपट करण्यांत आली. परंतु चियांगनें ती फुकट घालविली. या वेळीं कम्युनिस्ट पक्षाचे प्रमुखांनीं मार्शल चियांग कैशेकचे सुरक्षिततेसाठीं व सुटकेसाठीं महत्त्वाचा अट्टाहास केला. सुटकेनंतर चियांग नानकिंगला गेला. त्यानें धोरणांत किंचित फरक दाखविला. कम्युनिस्टांनीं लाल फौज मोडून ती चिनी लष्करांत सामील करावी, सोव्हिएट प्रजासत्ताक बरखास्त करावें, कम्युनिस्ट प्रचार व वर्गकलह चळवळ थांबवावी अशा अटी कुओमिटांगनें कम्युनिस्टांना सुचविल्या. यादवी युद्ध कांहीं काल तहकूब ठेवण्याची तयारी चियांगनें दाखविली.

## कम्युनिस्टांची मजबुता

१९४३ पासून सोव्हिएट रशियाचें प्रत्यक्ष साहाय्य व तज्ञांची मदत वायव्य चीनमधील कम्युनिस्टांना मिळाली. मार्शल चियांग कैशेकला जपान्यांनीं चुंकिंगपर्यंत मागें रेटलें. महायुद्धकालांत चुंकिंग येथें अमेरिकन सेनानींनीं चियांग व कम्युनिस्ट या दोघांशीं जपानविरुद्ध सहकार्य केलें. युद्धसमाप्तीनंतर पुन्हां यादवी युद्धास सुरुवात झाली. अमेरिकेनें चियांगला कम्युनिस्टांविरुद्ध मदत करून यादवी युद्ध पेटवीत राहूं नये अशी मादाम सन्यत्सेननें १९४६ च्या जुलैंत केलेली विनंति फुकट गेली. अमेरिकेच्या आर्थिक व लष्करी मदतीच्या जोरावर मार्शल चियांग कैशेकनें कम्युनिस्टांशीं खूप जोराचा लढा देण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत यश न आल्यानें १९४९ सालीं त्यांस चीनची मुख्य भूमि सोडून फोर्मोसांत पळावें लागलें. तेथून तो अद्यापीहि अमेरिकेच्या मदतीवर पुन्हां चीनचे मुख्य भूमीवरील स्वारीची भाषा गुरकावीत असतो. तथापि चीनच्या मौ त्से-तुंग, चौ एन लाय आदि मुत्सद्यांनीं गेल्या दोन–तीन वर्षांत शांततेनें जमवून घेण्याचें धोरण अंगीकारल्यामुळें मार्शल चियांग कैशेकचें बुजगावणें अमेरिकादेखील फार काळ वापरील असें आतां दिसत नाहीं. वायव्य चीनमध्यें कम्युनिस्ट पुढाऱ्यांनीं नवसमाजरचनेच्या आपल्या कल्पना मर्यादित प्रदेशांत अंमलांत आणल्या आणि त्यांत यशस्वी ठरलेल्या योजना त्यांनीं आतां चीनच्या विशाल प्रदेशांत सर्वत्र अंमलांत आणण्यास सुरुवात केली आहे.

## ' मौ त्से-तुंगला हजार वर्षांचें आयुष्य! '

चीन प्रजासत्ताक राज्याचा प्रमुख मौ त्से–तुंग यांनीं आतांपर्यंत राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठीं केवढी प्रचंड कामगिरी केली आहे याची साक्ष त्यांचेविषयीं चिनी जनता दाखवीत असलेल्या आदरावरून पटते! मौ त्से-तुंगचे स्वागताच्या चिनी जनतेच्या कवनांत पुढील विचार प्रगट केलेले आहेत." पूर्वेस सूर्याचें लाल बिंब उदय पावत आहे. चीनमध्यें मौ त्से-तुंगच्या सूर्याचा उदय झाला. ते चिनी जनतेच्या सुखासाठीं कष्ट करीत आहेत. तेच जनतेचे उद्धारकर्ते होत! मौ त्से–तुंगला दहा हजार वर्षांचें आयुष्य लाभो!"

चिनी कम्युनिस्ट पक्षाचे पहिल्या बैठकीपासून आजपर्यंत मौ त्से–तुंगनें तनमनधनें देशसेवा केली. त्यांत वैयक्तिक स्वार्थ मुळींच नव्हता. देशाचें हित त्यानें कधींहि नजरेआड होऊं दिलें नाहीं. कम्युनिस्टांचा निःपात करण्याची प्रतिज्ञा भोगणाऱ्या मार्शल चियांगचा कांटा सियांगच्या अटकेंत सहज काढता आला असता. परंतु देशहितासाठीं कम्युनिस्ट–कुओमिटांगची संयुक्त आघाडी जपान्यांचे विरुद्ध उभारण्याची गोष्ट पहिल्या दर्जाची ठरवून मार्शल चियांगची मुक्तता होण्यास मौ नें सहाय्य केलें. पूर्वीं मौ लोकांत जितका वावरत असे तितका तो आतां वारंवार लोकांपुढें येत नाहीं. पिकिंग येथील त्याच्या खऱ्या निवासस्थानाचीहि जनतेला नक्की माहिती नाहीं. तथापि अद्यापीहि अहोरात्र नवचीनच्या प्रगतीच्या नवनव्या योजना कार्यवाहींत आणण्यासाठींच त्याचे प्रयत्न चाललेले आहेत. अगदीं आवश्यक तेवढ्या जाहीर समारंभांना तो उपस्थित असतो.

## मौ ची वैचारिक भूमिका

नवचीनच्या उभारणीची भूमिका कोणती असावी याविषयीं मौ नें अनेक लहानमोठीं पुस्तकें व पुस्तिका लिहिल्या आहेत. त्यांच्या लेख–व्याख्यानांतील कांहीं महत्त्वाचीं सूत्रें पुढीलप्रमाणें थोडक्यांत सांगता येतील. मौ त्से–तुंग म्हणतात कीं, " ज्या लोकांचें राष्ट्रीय स्वातंत्र्य हिरावून घेण्यांत

आलें होतें त्या चिनी राष्ट्रांतील क्रांतिकारकांना प्रथम समाजवादाची भाषा बोलण्याची जरूरी नव्हती. प्रथम स्वातंत्र्याचा लढा मुख्य होता. कम्युनिझमचा फैलाव करावयाचा प्रश्न दूरचा आहे. आमचाच देश आमचेपासून हिरावून नेण्यांत आला तर कम्युनिझमची कोरडी चर्चा करण्यांत काय अर्थ आहे ?"

एक ऑक्टोबर १९४९ रोजीं चिनी प्रजासत्ताक राज्याची घोषणा राजधानीच्या पीकिंग शहरांत करतांना राष्ट्रपति मौ त्से-तुंग यांनीं जाहीर केलें कीं "हेंच सरकार चिनी जनतेचें प्रातिनिधिक कायदेशीर सरकार आहे. जीं राष्ट्रें समानता, परस्पर–सन्मान व अनाक्रमण हीं तत्त्वें पाळण्यास तयार असतील त्यांच्या बरोबर राजनैतिक संबंध जोडण्याची आमची इच्छा आहे."

वयाच्या सत्तावन्नाव्या वर्षांपर्यंत मौ त्से–तुंगनें चीनची भूमि सोडली नव्हती. १९५० सालच्या फेब्रुवारींत ते रशिया–चीन तहासाठीं रशियाच्या राजधानीच्या मॉस्को शहरीं प्रथमच गेले. परस्पर मैत्रीचा व साहाय्याचा रशिया–चीन करार त्यांनीं तेथें केला. या तहाविषयीं मौ त्से–तुंगनीं १७ फेब्रुवारी १९५० रोजीं, मॉस्को सोडण्यापूर्वीं असें निवेदन केलें कीं चीन व रशिया या दोन महान् देशांतील जनतेची या तहानें निर्माण झालेली एकता चिरंतन राहील. ती अभेद्य ठरेल. या एकीमुळें केवळ चीन–रशियांतील जनतेचीच प्रगती होईल असें नसून मानवी प्रगतीचे पुढील टप्पे आम्ही गांठूं शकूं व सर्व जगांत न्याय व शांतता यांचेंच साम्राज्य निर्माण करूं.

मौ त्से–तुंगच्या धोरणाचें एका परदेशी निरीक्षकानें यादवी युद्धाचे वेळीं पुढीलप्रमाणें पृथक्करण केलें होतें: चिनी जनतेची प्रगती सत्तर टक्के; तडजोड वीस टक्के व जपान्यांचा प्रतिकार दहा टक्के. मौ त्से–तुंगनें तरुण वयांत केलेल्या वाचनानें व विचारामुळें त्यांच्या प्रवृत्तींत कणखरपणा आला. तो अत्यंत बुद्धिमान असला तरी गर्विष्ठ नाहीं. नवीन गोष्टी शिकण्याची त्यांची तयारी आहे.

## चीनच्या पूर्वेतिहासाची दखल

चिनी कम्युनिस्टांची सत्ताभिलाषा कोणत्या प्रकारची असेल याविषयीं मौ नें सांगितलें कीं, सोव्हिएट रशियांत एकपक्षीय सत्ता स्थापन करण्यांत आली, तशीच चिनी कम्युनिस्टहि करणार काय अशी कांहींची आशंका आहे. त्या लोकांस माझें असें सांगणें आहे कीं, चीनची परिस्थिती व पूर्वेतिहास पाहता रशियासारखी एका पक्षाची सर्वाधिकारी सत्ता येथें प्रस्थापित होणार नाहीं. रशियाच्या पूर्वेतिहासानें तेथील सत्तेचें स्वरूप निश्चित केलें. आमचा इतिहास येथील पद्धति ठरवील. येथें निश्चितपणें नवीन लोकशाही राज्यपद्धति निर्माण होईल.

मालमत्तेचें वांटपाविषयीं मौ नें पूर्वींच सांगितलें कीं गरीब शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या मध्ययुगीन जमीनदारांचा वर्ग आम्हांस नष्ट करावयाचा आहे. जमीनदार म्हणून जो चिनी नागरिक आहे त्याला नष्ट करावयाचा नाहीं. जमीनदारांची ही पिळवणूक एका रात्रींत अत्याचारानें नष्ट होणारी नाहीं. ज्या विभागांत आमची सत्ता दृढमूल झाली नसेल तेथें आम्ही एकदम जमीनविषयक सुधारणा अंमलांत आणीत नाहीं. परिस्थिति निवळली व बहुजनांची पुरेशी जागृति झाली अशी खात्री पटली म्हणजे मगच आम्ही मालमत्ता व जमीन यांच्या सामुदायिक वांटपाचें काम हातीं घेऊं.

राष्ट्रीय क्रांतीचीं तीन मूलभूत तत्त्वें मौ त्से-तुंगनें पुढीलप्रमाणें सांगितलीं.(१) जमीनदार वर्गाची जमीन जप्त करून तिची मालकी शेतकऱ्यांकडे देणें. (२) चियांग कैशेक, टी.व्ही. सूंग, एच. एच कुंग व चेन लि-फू या चार चिनी घराण्यांत एकत्रित झालेलें प्रचंड भांडवल जप्त करून तें नवीन लोकशाही सरकारच्या स्वाधीन करणें (३) राष्ट्रीय उद्योगधंदे व व्यापार यांचें संरक्षण.

मौ त्से-तुंगच्या राजकीय तत्त्वज्ञानांत व्यक्तीच्या स्वातंत्र्याला वाव नाहीं. लोकानुवर्ती हुकूमशाहीवर ( डेमोक्रॅटिक डिक्टेटरशिप ) जोर देऊन

मौ प्रतिपादितांत कीं वैयक्तिक हक्कांपेक्षा आम्ही जनतेच्या हक्कांना अधिक मानतो. वैयक्तिक हक्कांमुळें चीनमध्यें स्वार्थांधांचा सुळसुळाट झाला. त्यामुळें चीनचें आतांपर्यंत फार मोठें नुकसान झालें आहे.

## मौ त्से-तुंगचें व्यक्तिमत्व

मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष व्यवहारांत अवलंब करतांना परिस्थित्यनुसार कोणते बदल करावे लागतात याचें प्रात्यक्षिक मौ त्से-तुंगनें चीनमधील किसान संघटनेंत उत्कृष्ट रीतीनें दाखविलें. उद्योगप्रधान युरोपच्या भूमींत रुजणाऱ्या कम्युनिझमपेक्षां शेतीप्रधान, यंत्रशास्त्रदृष्टचा मागासलेल्या आणि विशाल तत्त्वज्ञानाचा पूर्वार्जित ठेवा असलेल्या चिनी जगतांत कोणता समष्टिवाद किती प्रमाणांत झेपेल याचा मौचा अंदाज यशस्वी ठरला आहे. मौ केवळ तत्त्वज्ञानी नाहीं. कुशल संघटकांप्रमाणें तो उत्कृष्ट सेनानीहि आहे हें 'बडचा दौडी' चे वेळीं सिद्ध झालें. मौ चांगला लेखक असून प्रसंगानुकूल विनोद करण्यांत पटाईत आहे. चिनी राष्ट्राची एकता कित्येक शतकांनीं त्यांनीं प्रत्यक्षांत आणून दाखविली. त्यासाठीं त्यांनीं वेळोवेळीं द्रष्टेपणा व कमालीचा संयम दाखविला. भारताबरोबर पंचशिलेच्या तत्त्वानुसार मैत्रीचे संबंध टिकविण्याचा चीनचा निर्धार दिसतो. मौ नें रशियाप्रभृति राष्ट्रांचें साहाय्य आपल्या मायदेशाच्या प्रगतीसाठीं आवश्यक तेवढें घेतलें तरी तत्त्वज्ञानांत अगर व्यवहारांत त्यानें उसनवारी केली नाहीं किंवा गुलामीहि पत्करली नाहीं. चीनच्या नवीन लोकशाही संस्कृतीविषयीं मौ त्से-तुंग लिहितात कीं, आमची नवीन लोकशाहीची संस्कृति शास्त्रशुद्ध आहे. त्यांत मध्ययुगीन व अंधश्रद्धेच्या कल्पना नाहींत. चीनच्या जुन्या संस्कृतींतून व इतिहासांतून नवीन संस्कृति निघत आहे. फक्त जुन्यांतील अंधश्रद्धा-पिळवणूक आतां नष्ट केली आहे. प्राचीन लोकशाही संस्कृतीचें पुनरुत्थान करतांना आम्ही सर्व जुन्या निरुपयोगी गोष्टींना मूठमाती दिली आहे. आमची दृष्टि भावी कालांतील विशाल लोकशाहीवरच खिळलेली आहे !

# ६ ब्रह्मी पंतप्रधान नू

## अत्याचाऱ्यांचें आव्हान स्वीकारलें

ब्रह्मदेशचे हंगामी प्रमुख मंत्री सेनापति आँग सान यांनीं १९ जुलै १९४७ रोजीं रंगून येथील सचिवालयांत आपल्या मंत्रिमंडळाची सभा बोलाविली होती. ही बैठक चालू असतां लष्करी गणवेश घातलेल्या शस्त्रधारी तरुणांनीं दारावरील पहारेकऱ्यांना दूर ढकलून कार्यालयांत प्रवेश केला. जवळच्या स्टेन गन्समधून त्यांनीं मंत्रिमंडळाच्या सभासदांवर अक्षरशः गोळ्यांचा पाऊस पाडला. सेनापति आँग सान, पुरवठा-मंत्री ऊ बा विन्, शिक्षण आणि राष्ट्रीय नियोजनखात्याचे मंत्रि अबदुल रझाक, व्यापार व मजूरखात्याचे मंत्रि मान बा खैन आणि अर्थमंत्रि थकीन म्या हे पांचजण जागच्या जागीं ठार झाले. प्रसिद्धीमंत्रि ऊ बा चो व पहाडी प्रदेशांतील प्रतिनिधि सावबा आणि इतर दोन असे चौघेजण मागाहून मरण



पावले. आँग सानच्या राजकीय विरोधकांनीं केलेल्या या अत्याचारानें केवळ ब्रह्मदेश नव्हे तर जगांतील सर्व पुढारलेलीं राष्ट्रें आश्चर्यानें थक्क झालीं. स्वातंत्र्याच्या मार्गावर असलेल्या ब्रह्मदेशला ब्रिटिशांबरोबर करावयाच्या

महत्त्वाच्या वाटाघाटींसाठीं आँग सानच्या तोलाचाच नवा पुढारी आवश्यक होता. एकजुटीच्या आँग सानच्या धोरणास उचलून धरणारे आणि ब्रह्मी घटना-समितीचे अध्यक्ष नू या प्रसंगीं मोठ्या धैर्यानें पुढें आले. त्यांनीं मंत्रिमंडळ बनविण्याचें गव्हर्नरचें निमंत्रण स्वीकारलें. नू व आँगसान कॉलेजापासून स्नेही होते आणि अनेक वर्षें सहकारीहि होते. पंतप्रधान नू यांनीं दाखविलेल्या धैर्या-मुळें विरोधक चमकले. नू मंत्रिमंडळानें स्वीकारलेल्या कणखर धोरणामुळें विरोधकांनीं आपला पवित्रा बदलला. देशांत अराजक माजवून आपला वर-चष्मा दाखविण्याची खटपट करणाऱ्यांना दहशत बसली. आँग सानप्रभृतींच्या मारेकऱ्यांची तडाक्यानें तपास-चौकशी झाल्यामुळें सर्वसामान्य ब्रह्मी जन-तेला नव्या मंत्रिमंडळाविषयीं विश्वास वाटूं लागला. आँगसान प्रभृतींच्या खुनामध्यें ब्रिटिशांचा हात नव्हता असें सिद्ध करण्यासाठीं सत्तात्यागाची घोषणा ब्रिटिश नेत्यांनींहि तत्परतेनें केली.

## स्पष्ट धोरणानें चमकाविलें

इंडोनेशियाच्या राजधानीच्या जाकर्ता शहरांत १९५५ च्या एप्रिल महिन्यांत भरावयाच्या आफ्रिका-आशियांतील राष्ट्रांच्या परिषदेसाठीं कोण-कोणत्या राष्ट्रांना निमंत्रणें द्यावयाची याची चर्चा करण्यासाठीं भारत, पाकिस्तान, ब्रह्मदेश, सीलोन व इंडोनेशिया या राष्ट्रांच्या पंतप्रधानांची बैठक भरली होती. त्या वेळीं पाकिस्तानचे पंतप्रधान महंमदअलींनीं असे उद्गार काढले कीं चीनची प्रवृत्ति कम्युनिस्ट आहे. रशियाबरोबर हात मिळवून आशियांतील राष्ट्रांना धोका निर्माण करण्याचें चीनचें धोरण दिसतें. अशा चीनला बांडुंग परिषदेस बोलाविणें इष्ट होणार नाहीं. त्यावर ब्रह्मी पंत-प्रधान नू यांनीं तेथल्या तेथें महंमदअल्लीस बजाविलें कीं चीन हें आशियां-तील एक प्रभावी व महत्त्वाचें राष्ट्र आहे. त्या राष्ट्राचें राजकीय तत्त्वज्ञान काय हा मुद्दा महत्त्वाचा नाहीं. चीनला बांडुंग परिषदेस बोलवावें अशी ब्रह्मदेशची सूचना आहे. ही मान्य होत नसल्यास ब्रह्मदेशच त्या परिषदेंत सहभागी होऊं शकणार नाहीं !'

पंतप्रधान नू यांच्या कणखर व स्पष्ट धोरणाचा इष्ट तो परिणाम झाला. आशियांतील नवोदित राष्ट्रांच्या स्वास्थ्यासाठीं व प्रगतीसाठीं पंतप्रधान

नेहरूंनीं पुरस्कारिलेल्या पंचशिलेच्या कार्यक्रमास ब्रह्मदेशतर्फे नू यांनीं मान्यता दिली आहे. ब्रह्मदेशांतील अंतर्गत बंडाळ्या अद्याप पूर्णतः थांबल्या नसल्या तरी आंतरराष्ट्रीय व्यवहार व राजकारण यामध्यें ब्रह्मदेशचा आवाज प्रभावी ठरावा इतका भरभक्कम पाठिंबा ब्रह्मी जनतेनें नू यांच्या मंत्रिमंडळाला दिलेला आहे.

## अमेरिकेबरोबरचे संबंध सलोख्याचे

मार्शल मदतयोजनेखालीं अमेरिकेनें ब्रह्मदेशला दरसाल आठ ते दहा कोटी डॉलर द्यावेत असा 'युनायटेड स्टेट्स-ब्रह्मदेश आर्थिक सहकार्य करार' दोन्ही देशांनीं १३ सप्टेंबर १९५० रोजीं केला होता. याच करारा-बरोबर दुसरा एक करार झाला होता. ब्रह्मदेशांतील इरावतीं नदीचे खोऱ्यांतील कांहीं भागांत अमेरिकेला खाणी सुरू करण्याचा मक्ता मिळावा यासाठीं अमेरिकेनें ब्रह्मदेशाला ३॥ कोटी डॉलर कर्जाऊ द्यावेत असें एक कलम त्या दुसऱ्या करारांत होतें. अमेरिकन प्रतिनिधी आपल्या सवलतीं-बाहेर जाताच ब्रह्मी सरकारने ३० जून १९५३ रोजीं १९५० चे दोन्ही करार रद्द केल्याचे जाहीर करून अमेरिकन मदत नाकारली. ब्रह्मदेशच्या राष्ट्रीय हिताविरुद्ध होणारें प्रत्येक कृत्य हाणून पाडावयाचें हें धोरण पंत-प्रधान नू यांनीं सतत अमलांत आणलें आहे. आफ्रिका-आशिया परिषदेंत प्रमुखपणे भागीदार होऊनहि, अमेरिकन सरकारनें १९५५ च्या जुलैंत बोला-विलें असतां पंतप्रधान नू यांनी नकार न देतां अमेरिकेचा दौरा केला. जुलै १९५५ मधील जागतिक देखावा बघण्यासारखा होता. भारताचे पंतप्रधान पं. नेहरूंचा दौरा रशियांत चालू असता त्याच सुमारास भारताच्या शेजारच्या ब्रह्मदेशचे पंतप्रधान नूंचा दौरा अमेरिकेंत सुरू होता. नेहरू-बुल्गानिन संयुक्त पत्रकाप्रमाणेंच नू-आयसेनहॉवर संयुक्त पत्रकहि जाहीर करण्यात आलें.

## फाळणीचा स्वार्थ अंगाशीं आला

हिंदी फौजांचे मदतानें १९ व्या शतकांत ब्रिटिश सरकारनें ब्रह्मदेश जिंकून घतला. त्या वेळीं तो देश अत्यंत मागासलेला होता. कारभाराच्या

सोयीसाठीं ब्रिटिशांनीं ब्रह्मदेश हिंदुस्थानला जोडून टाकला. एकोणिसाव्या शतकाचे अखेरीस हिंदुस्थानांत सुरू झालेल्या स्वातंत्र्याचे चळवळीचें लोण हळूहळू कां होईना पण ब्रह्मदेशापर्यंत जाऊन पोचलें होतें. ब्रह्मदेशांतील तेलाच्या विहिरी आणि दुर्मिळ धातूंच्या खाणी ब्रिटिशांना महत्वाच्या वाटत होत्या. हिंदुस्थानांतील स्वातंत्र्यलढा जोरावला तेव्हां १९३५ च्या घटना-कायद्यांतच हिंदुस्थानापासून ब्रह्मदेश वेगळा करण्याचीं कलमें ब्रिटिशांनीं अंतर्भूत केलीं. तेव्हां त्यांचा विचार हा होता कीं पुढेंमागें हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याचा प्रसंग आला तरी मागासलेल्या ब्रह्मदेशांतील तेल व जंगलें ब्रिटिश साम्राज्याच्या वैभवासाठीं त्यापुढेंहि वापरतां यावींत. पण दैवाचा फांसा उलटा पडतो कधीं कधीं तसेंच झालें ब्रिटिशांचें ब्रह्मदेशाबाबत. दुसऱ्या महायुद्धानंतर आशियांत झालेल्या प्रचंड जागृतीमुळें भारत-ब्रह्मदेशप्रभृति राष्ट्रांना स्वातंत्र्य देणें ब्रिटिशांना भाग पडलें आणि भारत अद्यापि ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें राहिला असला तरी ब्रह्मदेशनें मात्र संपूर्ण स्वातंत्र्य पुकारून ब्रिटिश राष्ट्रकुल सोडून दिलें.

ब्रिटिश सरकारनें ब्रह्मदेशाला १९४८ सालीं स्वातंत्र्य दिलें हें खरें, परंतु तत्पूर्वी ब्रह्मदेशांतील सुमारें पावणेदोन कोटीच्या लोकवस्तींतील करेन, काचिन, शान, चिन, नागा, मॉन, लोलो, चिनी, ॲंग्लो-बर्मन अशा विविध अल्पसंख्यांना बहुसंख्य ब्रह्मींच्या विरुद्ध उठावणी देण्याच्या शक्य त्या कारवाया त्यांनीं केल्या. त्यामुळें ४ जानेवारी १९४८ ला स्थापन झालेल्या स्वतंत्र सार्वभौम ब्रह्मदेशचे पंतप्रधान नू यांना देशांतील बंडाळी मोडण्यासाठीं फार प्रयास पडले.

## विद्यार्थिसंघटनेचा प्रमुख नू

ब्रह्मदेशचे पंतप्रधान नू सध्यां फार धार्मिक प्रवृत्तीचे आहेत. सवड मिळाली तर एकाद्या मठांत जाऊन धर्मग्रंथांचा अभ्यास करण्यांत आयुष्य घालविणें त्यांस आवडेल. परंतु तरुणपणीं त्यांची प्रवृत्ति चळवळ्या संघट-काची होती. नू यांचा जन्म २५ मे १९०७ रोजीं म्याउंगम्या जिल्ह्यांतील वाकेमा गांवीं झाला. त्यांच्या वडिलांचें नांव सान हटून असें होतें. ते

अनुक्रम ९९.८० दिनांक

व्यापारी असून आपल्या भागांत चांगल्या लोकमान्यतेला पावलेले होते. नू लहानपणीं वडिलांचे दुकानांत बसे. परंतु त्याची वृत्ति बरीच स्वैर होती. रंगून येथील म्योमा नॅशनल बॉईज हायस्कूलमध्यें माध्यमिक शिक्षण झाल्या-नंतर त्यांनीं रंगूनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजांतून पदवीपरीक्षा दिली. त्यानंतर पांटानाव येथील नॅशनल हायस्कूलचे सुपरिंटेंडेंट म्हणून कांहीं काळ त्यांनीं काम केलें. त्यानंतर त्यांनीं कायद्याचा अभ्यास केला.

नू ची प्रवृत्ति बरीच साहित्यिक होती. तिला कॉलेजचें आयुष्यांत चांगलें खतपाणी मिळालें. कॉलेजांत अभ्यासाचे वेळीं नू यांनीं अनेक चांगलीं सुनीतें तयार केलीं. त्यांनीं ही प्रवृत्ति सतत वाढविली व ब्रम्ही साहित्यांत उत्कृष्ट भर घातली आहे. नाटचलेखनांत ते महशूर आहेत. ‘जनतेचा विजय’ ( दि पीपल विन थ्रू ) नांवाचें त्यांचें नाटक १९५२ सालच्या फेब्रुवारींत कॅलिफोर्नियांतील ( अमेरिका ) पॅसॅडेना थिएटरांत करण्यांत आले. तें अत्यंत यशस्वी झाल्याचें अमेरिकन टीकाकारांनीं सांगितलें.

तरुण नू ला यू बा चो नांवाचे नामवंत संपादकांचा सहवास लाभला. त्यांचे सहवासांत त्यांस बौद्धधर्माची गोडी लागली. कायद्याचे विद्यार्थी असतांना नू चें लक्ष देशाच्या दुःस्थितीकडे वळलें. ब्रिटिश युनियन जॅक जाळण्याच्या उपक्रमांत त्यांनीं भाग घेतला. ब्रह्मी जनतेच्या स्वातंत्र्याकांक्षा दडपणाऱ्या परक्या ब्रिटिशांविरुद्ध सुरू झालेल्या संघटनांकडे नू आकर्षिला गेला. रंगून विद्यापीठ विद्यार्थी संघटनेच्या कामांत नू गर्क झाला. या संघटनेचें अध्यक्षपदहि त्यांस देण्यांत आलें. याच वेळीं नू व आँग सान यांची दृढ मैत्री जमून आली. आँग सान विद्यार्थी संघटनेचे चिटणीस होते.

### “ब्रम्ही लोकच ब्रह्मदेशचे धनी”

१९३७ सालीं ब्रिटिश सरकारनें ब्रह्मदेश हिंदुस्थानपासून वेगळा केला. त्या वेळीं स्थानिक जनतेला राज्यकारभारांत कांहीं प्रमाणांत भागी-दारी देण्यांत आली. जुन्या पिढीच्या पुढाऱ्यांची कारभारी होण्यासाठीं चढाओढ सुरू झाली. डॉ. बा मॉ, यू सॉ प्रभृतींना मुख्य मंत्रिपदेंहि देण्यांत आलीं. तथापि या स्वायत्ततेंत खरें स्वराज्य नव्हतें याची जाणीव विद्यार्थ्यांत

व तरुण पिढींत जोरानें होऊं लागली. तेथें जहाल राष्ट्रवादी गट तयार होत होता. त्यांनीं 'निखिल ब्रह्मदेश विद्यार्थीसंघ' ही संघटना प्रभावी केली. तिच्या कार्यकर्त्यांस भारताचे पं. जवाहरलाल यांच्याविषयीं आपुलकी वाटे. तरुणांची राष्ट्रीय आघाडी निर्माण करण्यासाठीं स्थापन झालेल्या डोबामा अॅस्योन संस्थेंत नू सामील झाले.' ब्रह्मी लोकच ब्रह्मदेशचे मालक' असें या संस्थेचें मुख्य सूत्र होतें. थकीन म्हणजे धनी. त्यामुळें संस्थेच्या सभासदांचे नांवामागें 'थकीन' उपाधि लावण्याची सुरुवात झाली. त्यामुळें नू यास थकीन नू म्हणू लागले. (ब्रह्मी भाषेंत उ म्हणजे श्रीयुत असा अर्थ आहे. तेव्हां नू यास उ नू असेंहि म्हणतात.)

## राजकारणी नू च्या चळवळी

राजकारणाचे आखाड्यांत उडी घेतांच नू नें आपलें संघटनाकौशल्य विविध क्षेत्रांत दाखविलें. १९३६ सालीं सर्व ब्रह्मी विद्यार्थ्यांचा संप घडवून आणण्यांत त्यानें मोठा पुढाकार घेतला. तेव्हां त्यांस खरें पुढारीपण प्राप्त झालें तें अद्याप टिकून आहे. त्यांस त्याचे सहकारी त्या वेळीं 'कोग्यी नू' म्हणूं लागले. लंडन येथें 'लेफ्ट बुक क्लब' नांवाची संघटना आहे. त्याच स्वरूपाची नागानी (रेड ड्रॅगन) बुक क्लब नांवाची संघटना त्यांनीं कांहीं मित्रांचे मदतीनें सुरू केली. दुसऱ्या महायुद्धाचे पूर्वकालांत डोबामा अॅस्योन संघटनेला महत्त्व प्राप्त झालें होतें. आँग सान तिचे चिटणीस होते. दुसरें महायुद्ध सुरू होतांच या संघटनेचें खास अधिवेशन बोलाविण्यांत आलें. 'युद्धसमाप्तीनंतर ब्रम्हदेशला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याचें आश्वासन ब्रिटिश सरकार देत असेल तरच सरकारशीं सहकार्य करावें, नाहीं तर युद्धकालीं असहकार पुकारावा,' अशा आशयाचा ठराव नू यांनीं या बैठकींत मांडला. तो स्वीकृत करण्यांत आला. युद्धविरोधी उद्योगाचा आरोप ठेवून सरकारनें नू यांस अटक केली व त्यांस दोन वर्षांची शिक्षा ठोठावली. जपान्यांनीं ब्रह्मदेशांत चाल केल्यानंतर नू यांस ब्रिटिश सरकारनें निरनिराळ्या तुरुंगांत हलविलें व शेवटीं मंडाले येथील तुरुंगांतून मुक्त केलें. युद्धाचे सुरुवातीस ब्रिटिश सरकार भांबावून गेलें. जपान्यांशीं सहकार्य करण्याचे आरोपावरून युद्धापूर्वी एका काळीं मुख्य मंत्री असलेले डॉ. बा मॉ, यू सॉ यांनाहि सरकारनें तुरुंगांत टाकलें.

१९३९ सालापासून ब्रह्मदेशांत जपान्यांचा ब्रिटिशविरोधी प्रचार जोरांत चालू होता. जपान्यांचे मदतीनें ब्रह्मदेश स्वतंत्र करण्याच्या योजनेंत अनेक लहानमोठे ब्रह्मी पुढारी ओढले गेले. थकीन आँग सान, थकीन नू यांनीं क्रांतिकारक संघटना स्थापिली. तीस सहकाऱ्यांसह आँग सान गुप्तपणें जपानला गेले. तेथें त्यांनीं लष्करी शिक्षण घेतलें ब्रह्मी स्वातंत्र्याची घोषणा जपानी पंतप्रधान तोजो यानें जपानी पार्लमेंटांत केली. आँग सान यांनी आझाद ब्रह्मी सेना उभारली व तिनें जपानी सेनेबरोबर ब्रह्मदेशावर स्वारी केली.

C५६C

## युद्धकालांतील मंत्रिपद

ब्रिटिशांची पुरी हकालपट्टी होतांच जपान्यांनीं डॉ. बा मॉला पंत-प्रधानपद दिलें. तरुण गटाला स्वातंत्र्य दूर गेल्यासारखें वाटलें. तेव्हां आँग सान गटानें ब्रह्मी कम्युनिस्ट पक्ष, ब्रह्मी समाजवादी पक्ष, ईस्ट एशिया यूथ लीग वगैरे संस्थांच्या सहकार्यानें १९४४ च्या ऑगस्टमध्यें "अँटी-फॅसिस्ट पीपल्स फ्रीडम लीग" नांवाची संस्था स्थापन केली. या गटाच्या पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानांतील दोस्त राष्ट्रांच्या सेनानींशीं शस्त्रें पुरविण्याबाबत वाटाघाटी सुरू केल्या. थकीन नू यांनीं डोबामा अॅस्योनचें काम चालूं ठेविलें होतें. त्यांस पंतप्रधान डॉ. बा मॉ यांनीं आपल्या मंत्रिमंडळांत १९४३ सालीं परराष्ट्रमंत्री नेमिलें. पुढें १९४४ सालीं त्यांचेकडे प्रसिद्धी-प्रचार हें खातेंहि सोंपविण्यांत आलें. डॉ. बा मॉना जपानी वर्चस्व सुसह्य वाटत नसलें तरी त्यांना एकदम झिडकारणेंहि त्यांस शक्य नव्हतें. म्हणूनच थकीन संघटनेंतील नू सारख्या पुढाऱ्यांबरोबर संबंध राखण्याचें धोरण त्यांनीं कायम ठेविलें.

१९४५ सालीं जपान्यांच्या पिछेहाटीचे सुमारास आँग सानच्या संघटनेनें खूपच उठावणी केली. जपानी सत्तेचें उच्चाटन व ब्रह्मी स्वातंत्र्याची स्थापना असें दुहेरी सूत्र फ्रीडम लीगनें आपल्या प्रचारांत वापरलें होतें. युद्ध संपतांच फ्रीडम लीगची पुनर्घटना करण्यांत आली. ब्रह्मी स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या नवीन "फासापाला" संघटनेचें प्रमुखपद आँग सानला देण्यांत आलें. नू यांना या संघटनेचे उपाध्यक्षपद देण्यांत आलें.

## घटनापरिषदेचे अध्यक्ष नू

जगांतील फॅसिझमचा नायनाट करणें, ब्रम्ही जनतेचा स्वयंनिर्णयाचा हक्क प्रस्थापित करणें, लोकशाहीच्या मार्गानें ब्रह्मदेशची पुनर्रचना, ब्रह्मदेशांतील अल्पसंख्याक भिन्नवंशीय जनतेच्या मान्यतेवर आधारलेल्या ब्रम्ही संघराज्याची उभारणी अशीं चार उद्दिष्टें फासापाला संघटनेच्या पुढाऱ्यांनीं आपल्यापुढें ठेविलीं. परंतु हा एकसंघ पक्ष म्हणून काम चालविणें अंतस्थ मतभेदांमुळें अशक्य होऊं लागलें. युद्धापूर्वींचीं स्वायत्ततेची गुळमुळीत आश्वासनेंहि विसरून जाऊन ब्रिटिश पुढाऱ्यांनीं ब्रम्हदेशच्या फाळणीची नवीन योजना पुढें आणली. ब्रह्मदेशचें भवितव्य ठरविण्यासाठीं ब्रह्मी जनतेच्या सार्वत्रिक मतदानानें निवडलेल्या घटनासमितीची मागणी फासापाला संघटनेनें केली. ब्रिटिशांनीं ती नाकारतांच देशांत पोस्ट, रेल्वे, मुलकी खात्यांतील नोकर यांच्या संपांची लाट उसळली. ब्रम्ही पोलिसांनींहि संप करतांच ब्रिटिशांना धोरण बदलणें जरूर झालें. याच सुमारास इंग्लंडांत मजूर पक्ष अधिकारारुढ झाला. मजूर पक्षाचे पंतप्रधान अॅटलींनीं सेनापति सर ह्यूबर्ट रॅन्स यांस ब्रह्मदेशचा गव्हर्नर म्हणून पाठविलें. ब्रम्हदेशांतील कम्युनिस्ट मताच्या पक्षाचे दोन प्रमुख विभाग होते. अल्पसंख्यांकांचे पुढारीहि ब्रिटिशांच्या भेदनीतीमुळें अधूनमधून डोकें वर काढीत. समाजवादी मताच्या पुढाऱ्यांचा फासापाला संघटनेंत बराच वरचष्मा असल्यामुळें त्या पक्षाला पुढारीपणाचें कार्य करता आलें. आँग सान मूळ कम्युनिस्ट मताचा. परंतु युद्धकालानंतर त्यानें त्या पंथाचा त्याग केला. त्यानें अधिकृतपणें कोणताच पक्ष स्वीकारला नाहीं. तथापि समाजवादी पुढाऱ्यांशीं त्याचें बरेंच जुळतें असल्यामुळेंच तो सर्वसंग्राहक फासापाला संघटनेंत पुढाकार घेऊं शकला. त्यास ब्रह्मदेशचे ब्रिटिश गव्हर्नरांनीं ब्रह्मदेशचे कारभारासाठीं हंगामी कार्यकारी मंडळ नेमण्यास सांगितलें. १९४८ च्या जानेवारीअखेर ब्रह्मदेशास संपूर्ण स्वातंत्र्य देण्यांत यावें अशी मागणी फासापाला संस्थेनें ब्रिटिशांकडे केली. या मागणीस इतर पक्षांचा दुजोरा मिळाला. तेव्हां ब्रिटिश पंतप्रधान अॅटली यांनीं आँग सानप्रभृति ब्रम्ही पुढाऱ्यांना विचारविनिमयासाठीं लंडनला बोलाविलें. त्या वेळीं झालेल्या वाटाघाटींतून अॅटली–आँग सान योजना जन्मास आली.

त्यानुसार ब्रह्मी कार्यकारी मंडळास 'मध्यंतर सरकार' ठरविण्यांत आलें व १९४७ च्या एप्रिलच्या निवडणुकींत घटनापरिषद स्थापन करण्याचें ठरलें. त्यानुसार झालेल्या घटनापरिषदेच्या निवडणुकींत फासापाला पक्षास बहुमत मिळालें. १९४७ च्या मे महिन्यांत घटनेचा मसुदा मंजूर करण्यांत आला. त्यांत प्रजासत्ताक घटनेचीं मूलभूत तत्त्वें व रूपरेषा सांगण्यात आली होती. फासापालाचे उपाध्यक्ष थकीन नू यांस घटनापरिषदेचे कायमचे अध्यक्ष १९४७ च्या मे महिन्यांत निवडण्यांत आले. त्यानंतर घटनेच्या उद्दिष्टां-विषयींचा ठरावहि घटनापरिषदेनें मंजूर केला.

## पंतप्रधान नू

ॲटली–आँग सान योजनेंत निःसंशयपणें ब्रह्मी स्वातंत्र्य अंतर्भूत करण्यांत आलें नाहीं असा काही विरोधकांचा आक्षेप होता. ब्रह्मी घटनापरिषदेचें काम चालू असतांनाच हिंदुस्थानांतील सत्तासंक्रमण ३१ जून १९४८ एवजी १५ ऑगस्ट १९४७ ला करण्यात येईल असें वृत्त आले. त्यामुळे ब्रह्मी स्वातंत्र्यची योजना अशाच तऱ्हेनें निश्चित व्हावी अशी आकांक्षा ब्रह्मी पुढाऱ्यांत निर्माण झाली. ब्रिटिश पुढाऱ्यांबरोबर वाटाघाटी करण्यासाठी घटनापरिषदेचे अध्यक्ष थकीन नू याच्या नेतृत्वाखालीं लंडनला शिष्टमंडळ धाडण्यांत आलें. थकीन नूंच्या वाटाघाटींना यश आलें. ब्रह्मदेशांतील सत्तांतराची योजना घेऊनच थकीन नू ब्रम्हदेशास परत आले.

ॲटली–नू करारास ब्रम्ही मध्यंतर सरकारनें मान्यता देतांच तो प्रसिद्ध करण्यात येऊन त्याच्या अमलबजावणीस सुरुवात व्हावयाची होती. या कराराचा विचार करण्यासाठीं भरलेल्या १९ जुलै १९४७ च्या आँग सानच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीवरच अत्याचाऱ्यांनी गोळ्या झाडून आँग सानप्रभृति सात मंत्र्यांचे खून केल्यामुळें ब्रम्ही जनता क्षणमात्र थक्क झाली. परंतु याच वेळी ब्रम्हदेशाच्या गव्हर्नरनें घटनापरिषदेचे अध्यक्ष थकीन नू याना राज्यकारभार हातीं घेण्यासाठी विनंति केली. सात सहकाऱ्यां-वरील भीषण प्रसंगानें न डगमगता थकीन नू यांनीं नवीन जबाबदारी ताबडतोब पत्करली. अत्याचारी खुनींची धरपकड व तपास सुरू करण्यांत

आला. आँग सानच्या खुनांत आपला हात नसल्याचें ब्रिटिश सरकारतर्फें जाहीर करण्यांत आलें. २३ जुलैला थकीन नू-अॅटली करारहि ब्रिटिश सरकारनें प्रसिद्ध करून ब्रम्ही मध्यंतर सरकारचें रूपांतर तात्पुरत्या मंत्रिमंडळांत केलें. घटनापरिषदेंत मान्य होणाऱ्या घटनेनुसार सत्तात्याग करण्यासाठीं आवश्यक तो कायदा ब्रिटिश पार्लमेंटमध्यें मंजूर करून घेण्यांत येईल आणि संरक्षण, आर्थिक बाबी व इतर प्रश्नांविषयीं करारमदार करण्यासाठीं अॅटली-नू करारानुसार शिष्टमंडळें धाडण्यांत येतील असें ब्रिटिश सरकारनें जाहीर केलें.

पंतप्रधान थकीन नू यांनीं ब्रम्ही घटनापरिषदेचें काम नवीन अध्यक्ष साव श्वे थैक याच्या नेतृत्वाखालीं लवकर पुरें होईल अशी व्यवस्था केली. स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक ब्रम्ही संघराज्य या घटनेनें निश्चित केलें. अखंड स्वतंत्र ब्रम्हदेशचें कार्यकर्त्यांचें स्वप्न साकार झालें ! ४ जानेवारी १९५० रोजीं ब्रम्हदेश स्वतंत्र झाल्याचें घोषित करण्यात आलें. १८८५ पासून ब्रम्हदेशांत फडकणारें ब्रिटिश साम्राज्याचें युनियन जॅक खाली उतरविण्यात येऊन त्याचे जागीं स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक ब्रम्हदेशचा राष्ट्रध्वज फडकविण्यांत आला.

## नू शिष्टमंडळाचें भारतांत आगमन

नवोदित ब्रम्ही प्रजासत्ताकाला धाडलेल्या शुभेच्छासंदेशांत भारताचे पंतप्रधान पं. नेहरू यांनी म्हटलें होतें की "ब्रम्हदेशाची स्वातंत्र्यप्राप्ति ही अखिल आशियावासी जनतेच्या दृष्टीनें अत्यन्त महत्त्वपूर्ण अशी घटना आहे. परंतु त्यांतल्या त्यांत हिंदुस्थानच्या दृष्टीनें या घटनला विशेष महत्त्व आहे. कारण भूतकाळापासून या दोन्ही देशांचे संबंध अत्यंत निकटचे असल्यामुळें, त्या दोहोंपैका कोणत्याहि एका देशामधील घटनेचे पडसाद दुसऱ्या देशांत उमटणे अपरिहार्य आहे. ब्रम्हदेश व हिंदुस्थान या देशांतील जनतेमध्यें वसत असलेल्या भावना एकच आहेत. म्हणूनच या दोन्ही देशांत स्नेह व सहकार्य राहीलच. परंतु त्याहीपेक्षां आणखी एक गोष्ट महत्वाची आहे. आज जगामध्यें विशेषतः आशियांतील विविध घडामोडी लक्षांत घेता हिंदी-ब्रह्मी स्नेहाची आवश्यकता अधिकच पटते."

हिंदुस्थान व ब्रह्मदेश यांच्यांत चिरस्थायी स्नेहसंबंध प्रस्थापित होण्यासाठीं ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांचे प्रश्न उभयतांस सोयीस्कर रीतीनें सुटणें आवश्यक होतें. ब्रिटिश अंमदानींत ब्रह्मदेशांत भारतीयांचा व्यापार, सावकारी व जमीनमालकी फार मोठ्या प्रमाणावर होती. स्वतंत्र ब्रह्म--देशाला त्यांवर नियंत्रणें घालणें आवश्यक वाटलें. त्या दिशेनें हिंदुस्थान सरकारशीं बोलणें करण्यासाठीं पंतप्रधान नू यांच्या नेतृत्वाखालीं ब्रह्मी शिष्टमंडळ भारतांत आलें व त्यांनीं नेहरूंशीं चर्चा केली. या वाटाघाटीं विषयींचा सर्वसामान्य ब्रह्मी जनतेचा दृष्टिकोन त्या वेळीं ब्रह्मी वृत्तपत्रांत पुढीलप्रमाणें प्रसिद्ध करण्यांत आला होता. "आर्थिकदृष्ट्या ब्रह्मदेश व हिंदुस्थानवर परस्परपूरक आहेत. संरक्षणाच्या दृष्टीनें विचार करतां, पूर्वे-कडून हिंदुस्थावर हल्ला झाल्यास, त्याचा प्रतिकार करण्याच्या कामीं ब्रह्मदेश हीच हिंदुस्थानची पहिली आघाडी ठरेल. या दोन्ही देशांत स्नेहाची भावना नांदणें व त्यांच्या सर्व क्षेत्रांतील ध्येयधोरणांत एकसूत्री-पणा असणें अवश्य आहे."

## ब्रह्मदेशचे प्रश्न सोडविण्याची नू यांची भूमिका

"ब्रह्मदेश समृद्ध राष्ट्र असलें तरी ब्रह्मी जनता दरिद्री आहे. परक्या भांडवलदारांना हांकलतांना त्यांचे जागीं जनताच मालक होईल अशी खटपट आम्ही करूं" अशी आपली भूमिका समाजवादी प्रवृत्तीचे पंतप्रधान नू यांनीं ब्रह्मी घटनासमितींत मांडली होती.

ब्रह्मदेशच्या आर्थिक पुनर्घटनेसंबंधींच्या नूंच्या योजनेवर साम्यवादी गट नाखूष होता. त्यानें बंडाळी सुरू केली. तेव्हां १३ जून १९४८ ला पंतप्रधान नू यांनीं एक पंधरा कलमी योजना जाहीर केली. या योजनेंतील समाजवादी धोरणामुळें ब्रिटन-अमेरिकेंत खळबळ उडाली. ही योजना फासा-पाला पक्षांतील सर्व गटांना पसंत पडली नाहीं. त्यांतील असंतुष्टांनीं नू यांचेविरुद्ध मोहीम करण्याचें ठरविलें. कांहीं अल्पसंख्यांकांचीं फुटीरपणाचीं बंडे सुरू होतींच. या बंडखोरांपैकीं करीनांनीं १९४९च्या जूनमध्यें तांगू येथें स्वतंत्र सार्वभौम करीन राज्य स्थापल्याचें जाहीरहि केलें. ब्रह्मी भूमींत

सशस्त्र यादवी सुरू झाली. सर्व बंडखोरांचे मिळून सुमारें सोळा हजार सैनिक सरकारविरुद्ध लढूं लागले. सरकारी भूदल, नौदल व हवाई दल विशेष बलवान् नव्हतें. तथापि ऑंग सानच्या दुसऱ्या पुण्यतिथीच्या १९ जुलै १९४९ ला पंतप्रधान नू यांनीं जाहीर केलें कीं 'एक वर्षाचे आंत ब्रह्मदेशांतील सर्व बंडाळी आम्ही मोडून टाकू.' ही मोहीम चालविण्यासाठीं प्रत्येक जिल्ह्यांत समिति स्थापण्यांत आली. सरकारनें आवश्यक तें रणसाहित्य ब्रिटन व भारत सरकारांकडून मिळविलें. सर्व बंडखोरांचा बंदोबस्त करून १९ जुलै १९५० ला नू यांनीं आपली वर्षापूर्वीची घोषणा पुरी करून देशांत शांतता प्रस्थापित केली. १९५२ सालांत ब्रह्मदेशांत सार्वत्रिक निवडणुकी घेण्यांत आल्या. पुन्हां समाजवादी प्रवृत्तीच्या फासापाला पक्षाचे प्रतिनिधी बहुसंख्येनें निवडून आले. पंतप्रधान नू हे आतां पूर्णतया लोकप्रतिनिधी म्हणून अधिकारावर आले. उजव्या अगर डाव्या अशा कोणत्याच गटाशीं अगर राष्ट्रांशीं एकरूप न होता स्वतंत्र धोरणानें अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यवहार नू चें सरकार करीत असतें. शांततामय व लोकशाही मार्गानेंच ब्रह्मदेशांत समाजवादी व्यवस्था स्थापन करण्यांत आपणांस यश मिळेल असा नू चा विश्वास आहे.

परक्या देशांतील स्फूर्तीवर जगणाऱ्या आपल्या देशबांधवांना उद्देशून त्यांनीं एकदा म्हटलें होतें कीं " घरच्या आईला लाथा मारून परक्या घरच्या मावशीचें आदेश मानणाऱ्यांना स्वदेश संपन्न व सुखी करतां येणार नाहीं !"

## बुद्धधर्मी नू

पंतप्रधान नू यांची प्रवृत्ति बरीच धार्मिक असून ब्रह्मदेशांतील बुद्धधर्मीय जनतेसाठीं त्यांनीं अनेक गोष्टी केल्या. सीलोन व हिंदुस्थान या देशांत असलेले बुद्धाचे अवशेष नू यांनीं आणून ब्रह्मदेशांतील वीस शहरांत वाटले. रंगूनपासून सात मैलांवर त्यांनीं एक शांततेचें धर्ममंदिर बांधलें आहे. नू रोज पहाटे ४ वाजतां उठून दोन तास प्रार्थना करीत असतात. पूर्वी ते शाकाहारी होते. परंतु आतां डोळे अधू झाल्यामुळें ते थोडेसे मासे खातात. डोक्यास ब्रह्मी टोपी, अंगांत डंगी व कमरेस लुंगी अशा पोशाखांत ते केवळ ब्रह्मदेशांतच वावरतात असें नसून परराष्ट्रांतहि तोच पोशाख ते कायम ठेवतात.

बा. क्र. ८५६

# सूचि


अनाम छोकरा ३५

अनाम महिलांची भूमिका ३७

अमेरिका '७१, ७४, ९०

अमेरिका–पाकिस्तान लष्करी करार १४

अमेरिका–ब्रह्मदेश करार ९७

अॅटली १०२

अँटी-फॅसिस्ट पीपल्स फ्रीडम लीग १०१

आग्नेय आशिया करार ७१

आनंद महीदल ६५

आँग सान ९५, १०१

इंडोचायनाची फाळणी ५३

इंडोनेशिया १५, २२, २३, २४, २५ ३०, ३१, ३३

इंडोनेशिया–पंचशिला ३१

इंडोनेशिया राया २७

कलिंग युवराज २२

काँग्रेस अधिवेशनें १२, १६-१७

कुओमिटांग ७५, ८४

गांधी, महात्मा ९, १०, २०

चांगशा ८२

चिनी कम्युनिस्ट पक्ष ८३

चिनी क्रांति (१९११) ७३

चिनी क्रांतीचीं सूत्रें ९३

चिनी प्रजासत्ताक ७३, ९२

चियांग कैशेक, मार्शल ४७,५२,५३ ५४,५५

चीनची नवी लोकशाही ९४

चीन-रशिया सह ९२

चौ एन लाय १५

जपान ४९,५०,७३

जॉर्ज वॉशिंग्टन ८१

जीनिव्हा करार ६०

डोबामा अॅस्योन १००,१०१

तातू नदी पूल ८८

तीस लाल ताऱ्यांचें शौर्य ८८,८९

थकीन ९९

थायलंड ५९,६२,६३,७०,७१

दारुल इस्लाम ३३

दिन बिन फू ४९,५७

निप्पॉन टाइम्स ६६

नू–कडक धोरण ९६, घटनासमितीचे अध्यक्ष १०२, पूर्ववृत्त ९८-९९, पंतप्रधान १०४, बुद्धधर्मी १०६, भूमिका १०५, विद्यार्थिसंघटक ९८

नेहरू जवाहरलाल - अमरनाथ सहल १९, शिक्षण ५, काँग्रेस राजकारण ८-९, चीन-रशिया दौरा १६, तरुण पिढीला आवाहन १६-१७, 'तुरुंगवास' ६-७, निसर्गप्रेम ७-८, पंचशिला १५-१६, बालकांचे

काका १९, समाजवाद १२, सैनिकांचें कर्तव्य १८.
नेहरू मोतीलाल ५
प्रजादीपक ६४,६५
प्रदिस्त मनुधर्म ६४
प्रिदी ६५ ७१
पॉट्स्डॅम परिषद ५३
फोर्मोसा ४७,७६
फ्या मनोपकर्ण ६४
बाओ दाय ५२
बा मॉ, डॉ. १०१
बांडुंग परिषद २१,९६
ब्रह्मदेश-हिंदुस्थानची फाळणी ९८
ब्रह्मदेशांतील संप १०२
ब्रह्मी घटनासमिति १०३
ब्रुसेल्स परिषद ११
भगतसिंगांची फांशी १२
महमदअल्ली ९६
मॅनिला करार ६०-६१
मादाम सन्यत्सेन ९०
मिन् पाव ८०
मुसोलिनी ११
मौ त्से-तुंग- कम्युनिस्ट पक्ष सभासद ८२-८३, क्रांतीचें उद्दिष्ट ७२, बायकोबहिणींस फांशी ८६, भावी आयुष्याची कणखर तयारी ८१, रशिया-भेट ९२, स्वभाव व वैचारिक भूमिका ९१-९२, शेतकरी संघटना ८३
लाल दौड ८७
लाल सेना ८४,८५
लंडन टाइम्स ७३
विल्सन, प्रेसिडेंट ४४
वेस्टलिंग, कॅप्टन ३३
व्हिएटनाय प्रजासत्ताकचा जाहीरनामा ५४-५५
व्हिटमिन्हांची वागणूक. ३९,४०,४१
सन्सत्सेन ( डॉ. ) चीं तत्त्वें ७५
सैनिकी महाविद्यालय १,२
सोकार्नो अब्दुल रहमान, डॉ २१, तुरुंगवास २७, दिल्ली-भेट ३२, 'भीम' टोपणनांव २५, युद्ध-काळांतील भूमिका २८, राष्ट्रगीत व ध्वज २६.
संग्राम, लुआंग पिबुन, फील्ड मार्शल कामाची पद्धत ६८, क्रांतींतील भागीदारी ६४-६५, देशाचा सर्वाधिकारी ६७, नौदल समारंभांतून पळविलें ६९-७०
हिरोशिमा बाँबहल्ला ३५
हिंदुस्थानची फाळणी १३-१४
हो चि मिन्ह, डॉ.-इंग्लंड-फ्रान्समध्यें ४३-४४, कम्युनिस्टांचे सहवासांत ४५, प्रवृत्ति ४२, समाज सुधारणेचे हुकूम ३९, स्वभाव, कार्यकुशलता ५७-५८.

RFFBK-0008568